बंड-ट्रॅगनचे

– मधु गवई

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. 3948

REFBK-0024821

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचनाः—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५[८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

(क्र. मा. पहा)
५०००-३-८४

संदर्भ ग्रंथ
३७४६
२४८२१
१२।१।८६

बंड ड्रॅगनचे

० भारतीय राष्ट्राच्या हितार्थ, राजकीय, सामाजिक, आर्थिक लोकशाहीच्या पुनरुत्थानाचा मार्ग म्हणून १४ ऑक्टोबर १९५६ रोजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडवून आणलेल्या बौद्धधम्मक्रांतीच्या गतिशीलतेसाठी समर्पित. ०

REFBK-0024821

ड्रॅगन प्रकाशन वितरण

ड्रॅगन
प्रकाशन, वितरण

प्रकाशन दिन : १४ मे १९८५
आंतरराष्ट्रीय युवक वर्ष

प्रकाशक, वितरक, सर्वाधिकार
मधु गवई
अशोक भवन, ब्लॉक ए २९८, आंबेडकर नगर,
दहा चाळ, उल्हासनगर ४. (भारत)

विजयनगर, वार्ड नं. १०, बुलढाणा.

मुद्रक : चित्ररेखा प्रेस,
लालचक्की, उल्हासनगर ४.

मूल्य १५ रुपये

BAND–DRAGONCHE
(MARATHI)
MADHU GAWAI

लेखकाचे प्रकाशित साहित्य
ड्रॅगन पोएट्री (कवितासंग्रह)

आगामी :
'ड्रॅगन्स डेन' (२+२ = ४)
धर्मांतर : अर्थ–अनर्थ (वैचारिक)
उठाव (कादंबरी)

अनुक्रमणिका

	पृष्ठ क्रमांक
महायुद्ध	पाच
निकाय : एक	बारा
निकाय : दोन	तेवीस
निकाय : तीन	छत्तीस
निकाय : चार	चौरेचाळीस
निकाय : पाच	एक्कावन
निकाय : सहा	साठ
निकाय : सात	सत्तर
निकाय : आठ	शहाहत्तर
निकाय : नऊ	चौऱ्याऐंशी
निकाय : दहा	त्र्याणव
निकाय : अकरा	शंभर

"पददलित लोकांना हालअपेष्टांच्या आणि त्यागाच्या अग्निदिव्यातून गेल्यावाचून मोठेपण प्राप्त होणार नाही. आपला भविष्यकाळ घडविण्यासाठी त्यांनी वर्तमानातील सुखाचा आणि गरजांचाही त्याग करावयास पाहिजे. अस्पृश्यांचे कार्य अत्यंत उदात्त आहे. ज्या लोकांमध्ये आपला जन्म झाला त्यांचा उद्धार करणे आपले कर्तव्य आहे, 'अशी ज्यांना जाणीव आहे ते धन्य होत ! गुलामगिरीवर हल्ला चढविण्यासाठी जे आपले तन, मन, धन आणि तारूण्य कुरबान करतात ते धन्य होत ! आणि अस्पृश्यांना त्यांची माणूसकी पूर्णपणे मिळेपर्यंत जे बऱ्याची, वाईटाची, सुखाची, दुःखाची, संकटाची, वादळाची, मानाची अपमानाची पर्वा न करता एकसारखे झगडत राहतील ते धन्य होत ! "

डॉ. बाबासाहेब आंबेडकर.

धन्यवाद

सुधाकर गवई, आप्पा रणपिसे, चंद्रहास गंब्रे, ए. एम. कांबळे, जगन्नाथ सोनवणे, ॲड. सुनिल सोनवणे, अरूण साळवे, संपा. सुनील सोनवणे, नारायण सोनकांबळे, पी. जी. मोरे, एस. एस. खडाताळे, पी. डब्लू निकाम, तुकाराम जाधव, सुरेश नानिवडेकर, कंसूच प्रितम, पि. यु. मगर, राहुल हंडोरे, के. व्ही. एस. पै, भागवत भालेराव, भागवत बनसोडे, देना बँक.

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, संदर्भ विभाग, दादर, मुंबई.

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी आपल्या लाखो अनुयायांसह उन्नतीचा जीवन संवर्धनाचा मार्ग म्हणून धर्मांतर करून बौद्धधम्मक्रांती घडवून आणली आणि ती गतिशील करण्याची महान जबाबदारी आपल्या अनुयायांवर सोपविली.

२. त्या महान जबाबदारीकडे सोईस्करपणे दुर्लक्ष करून त्यांच्या अनुयायांची दिशाहीन वाटचाल सुरू असून विरोधकांनी तिच्या विरोधी आघाडीच उभारली आहे. त्याबाबत भारतीय जनतेची दिशाभूल करण्यात आज ते आघाडीवर आहेत.

३. विरोधक, आंबेडकर अनुयायी म्हणून मिरविणाऱ्यांच्या संघटनांचा आणि नेतृत्वाचा राजकीय खून घडवून आणण्यात यशस्वी ठरले आहेत. हे कटु सत्य असून त्यास आंबेडकर अनुयायातील बेजबाबदार वृत्ती कारण ठरली आहे. म्हणून ' जाऊ तिथं मार खाऊ ' हेच त्यांचे धोरण झाले आहे.

४. जे दलित संघटनाच्या बाबतीत तेच साहित्य चळवळी विषयी घडले असून ते घडवून आणण्यात विरोधक आघाडीवर आहेत आणि मुख्यता विरोधकांच्या मुळेच बौद्ध साहित्य चळवळीला विरोधी दलित साहित्य चळवळ वाढविल्या गेली व भारतीय पातळीवर दलित साहित्याचा प्रवाह समांतर साहित्य प्रवाहाच्या गंगोत्रिला मिळविण्याचे हेतुपुरस्सर प्रयत्न केले

जात असून दलित साहित्य वैचारिक व्यभिचारास बळी पडून त्यास कारण ठरत आहे.

५. विरोधकांनी आंबेडकरी चळवळ बदनाम करण्याचा घाट घातला असून त्याची प्रचिती दलित साहित्य व चळवळीत त्यांनी घातलेल्या धुड-घुसातून अनुभवास येत आहे. दलित क्रांतीची तर्कविसंगत कल्पना सुसंगतपणे मांडण्याचा केविलवाणा प्रयत्न दलितांच्या पुनरुत्थानासाठी केला जात आहे. एवढेच नव्हे तर दलित धर्माची कल्पना मांडून काही बालीश वृत्तीचे लोक स्वत:चे हसे करून घेत बागडत आहेत.

६. बौद्धधम्मक्रांती मार्गानुसार समाजाच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक जीवनात परिवर्तन घडवून राज्यसमाजवाद प्रस्थापित करणे आवश्यक असून त्यासाठी ज्यांनी देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही दलित, शोषित, पिडीत, उपेक्षित, सर्वहारा, कष्टकरी, अनुसूचीत जाती, जमाती, विमुक्त भटक्यांच्या झुंडी जिथल्या तिथं राहु दिल्या त्या प्रस्थापितांच्या विरोधी वंडखोरीचे तत्वज्ञान म्हणून जो बौद्धधम्म डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिला, तो तमाम जनतेच्या उन्नतीसाठी प्रत्यक्षात आणणे आवश्यक आहे. त्या आवश्यक्तेनुसार साहित्य निर्मिती करणे साहित्यिकांचे आद्य कर्तव्य आहे.

७. इथे हे लक्षात घेणे आवश्यक आहे की डॉ. बाबासाहेब आंबेड-करांनी बुद्ध मार्क्सला उत्तर देऊ शकतो हे स्पष्टपणे सूचीत करून बुद्धाचा मार्ग अनुसरून तो वारसा आपल्या अनुयायांस व भारतीय जनतेस दिलेला आहे. त्याबाबत विरोधकांची वाटचाल मात्र उलटी सुरू असून हचा चव-चालपणामुळे हानी मात्र त्यांचीच होत आहे. जागृत जनता अशांचे पितळ उघडे पाडून भंबेरी उडवत आहे आणि भारतीय समाज परिवर्तनाबाबतची मार्क्सवादाची व मार्क्सवाद्यांची असमर्थता सिद्ध झालेली आहे.

८. बौद्धधम्मक्रांतीस म्हणजेच आंबेडकरी ध्येयवादास आंबेडकर अनुयायांनी न्याय दिलेला नाही. न्याय देण्यापेक्षा बौद्धधम्माबाबत त्यांनी

अन्यायपूर्ण वर्तणूक ठेवली आहे आणि त्यामुळे समाजमनात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडवून आणलेल्या धर्मांतराबाबत संशयास्पद भावना वाढविण्यास विरोधकांना वाव मिळाला असून अधिकच चेव आलेला आहे. व सभोवती त्यांचे पेव फुटले असून त्याविरोधी धव फोडणे आवश्यक असून ही काळाची गरज आहे.

९. जग जिंकण्यास महंमद पैगंबराचे अनुयायी एका हातात कुराण आणि दुसऱ्या हातात तलवार घेऊन निघाले, ख्राईस्टचे अनुयायी एका हातात बायबल आणि दुसऱ्या हातात तलवार घेऊन निघाले, मार्क्सचे अनुयायी एका हातात कम्युनिष्ट जाहिरनामा आणि दुसऱ्या हातात लाल तलवार घेऊन निघाले, आज काही पंढरपुरी पुरोगामी एका हातात वेद आणि दुसऱ्या हातात भगवी तलवार घेऊन निघण्याबाबत प्रयत्नरत आहेत. कुराण, बायबल, वेद व मार्क्सवादाविषयी असलेल्या कडवेपणाच्या अनुषंगाने व्यक्त केलेले तर्कतिर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे विचार येथे उद्‌धृत केल्यास योग्य ठरेल, ते म्हणतात, " विश्व आणि मानवी समाज विज्ञानाच्या दृष्टीकोनातून तपासले तर सत्याचा शोध प्रगत पावू शकतो. वेद, बायबल वा कुराण यांच्यावर अनुक्रमे हिंदु, ख्रिश्चन व मुसलमान यांची जशी श्रद्धा असते तशी मार्क्सवाद्यांची मार्क्सवादावर अटळ श्रद्धा आहे हे वरील धर्मपंथ ज्याप्रमाणे धर्मग्रंथातील सिद्धान्त वैचारिक समीक्षेच्या बाहेर ठेवतात आणि वैचारिक समीक्षा ही पाखंड मानतात तशीच मार्क्सवाद्यांची गत आहे. मार्क्सवाद्यांच्या राज्यात मार्क्सवादावर टीका करणारा कारागृहवासाच्या शिक्षेस पात्र ठरतो वा हद्‌पारीस पात्र ठरतो. सामाजिक बंधमुक्तिचे विचार नैतिकदृष्टया कितीही श्रेष्ठ असले तरी त्याची मार्गदर्शकता तर्कशुद्ध युक्तिवादाच्या बाहेर त्यांना ठेवल्यास नष्ट होते. अंधश्रद्धेचा तो मार्ग ठरतो. तो अंधकार होतो. (लेखसंग्रह, प्रतावना भाग १ संपा : मधुकाका) आणि म्हणूनच भल्याभल्यांनी मार्क्सवादाचे दर्शन सरळ पण वर्तन मात्र उलटे दिसून येते, असा शेरा मारून ठेवला आहे. जाणकार यातील मर्म जाणतीलच. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर घडविणे म्हणजे

मार्क्सवादास नकार नव्हे काय ? समाजपरिवर्तनाचा मार्क्सवादी मार्ग आणि शासनसत्ता नाकारतच त्यांनी बौद्धधम्म स्विकारलेला आहे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

१०. तर आम्ही मात्र एका हातात भारतीय राज्यघटना आणि दुसऱ्या हातात 'बुद्ध आणि त्याचा धम्म' हा ग्रंथ घेऊन या देशात बौद्ध धम्म-क्रांतीच्या गतिशीलतेसाठी आगेकूच करीत आहोत. ही आवश्यक आगेकूच असून तिच्याशिवाय देश उन्नती करू शकणार नाही. ही वस्तुस्थिती तमाम आंबेडकर अनुयायांनी, विरोधकांनी व भारतीय जनतेनें लवकरात लवकर समजून घेणे देशहिताचे ठरणार आहे. समाज परिवर्तनाबाबत बौद्धधम्माचे महत्व विशद करून म. भि. चिटणीसांनी केलेले समर्पक विवेचन येथे लक्षात घेणे आवश्यक आहे, ते म्हणतात, " स्वातंत्र्य, बंधुता, न्याय ही जीची मूलतत्वे आहेत. ज्यात देवाच्या अस्तित्वाचा आणि कर्तृत्वाचा कुठेही नामोल्लेख नाही. अशी इहवादी राज्यघटना भारताने अंगीकारली आहे. बहुसंख्य भारतीयांच्या पारंपारिक श्रद्धा आणि विश्वास या मूलभूत तत्वाच्या विरोधी आहेत. भारताचे पहिले सामाजिक लोकशाहीचे पुरस्कर्ते म. ज्योतीबा फुले यांच्यापासून स्फुर्ती घेऊन आज जे समाजाच्या विरोधाला शरण न जाता समाज परिवर्तनाला गती देत आहेत, त्या कार्यकर्त्यांनी आणि बुद्धिमंतांनी बाबासाहेबांचे बुद्धधम्माविषयीचे विचार उपेक्षित ठेवण्यात हानी त्यांचीच आहे. त्यांचे ऐकोणिसशे छप्पन्नमधील धर्मांतरापूर्वीचे विचार व लढे तेवढे गौरवायचे आणि त्यांची तर्कशुद्ध परिणती ज्या बुद्धधम्म स्विकाराने झाली त्या घटनेची ती त्या थोर बुद्धीमंताचा पराभव म्हणून त्यांनी मांडलेल्या बुद्धधम्माचा सहानुभूतीपूर्वक अभ्यास न करता अवहेलना करावयाची ही गोष्ट बाबासाहेबांवर अन्याय केल्यासारखी आहे. बुद्धधम्म ही भारतीय संस्कृतीतील एक विस्मृत परंतु श्रेष्ठ विचारधारा आहे. ती मानवतावाद्यांची आद्य गंगोत्री आहे. भारतीय अस्मिता न सोडता जर भारताची नियती घडवू पाहणाऱ्या संविधानाची प्रतारणा करावयाची नसेल तर बाबासाहेबांनी मांडलेला बुद्धधम्म हाच भारतीयांचा मानसिक

पिंड बनला पाहिजे." (विचारयुगाचे प्रणेते पान १५ संपा. गंगाधर पानतावणे) या सर्व विवेचनातून दिसून येते की राजकीय लोकशाहीच्या यशस्वीतेसाठी सामाजिक व आर्थिक लोकशाहीची प्रस्थापना करणे आवश्यक असून त्यासाठी समर्थ असलेल्या बौद्धधम्माची न्याय्य दखल घेणे आवश्यक आहे. त्याशिवाय या देशातील त्रिविध लोकशाही धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही.

११. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडवून आणलेली बौद्धधम्माची चळवळ ही अखिल मानव जातीच्या पुनरूत्थानाची आंतरराष्ट्रीय चळवळ असून राष्ट्रीय जाणीवेतून ती विकसित होत जाते. राष्ट्रीय जाणीवेतून विकसित होणारे तिचे परराष्ट्रीय धोरण आंतरराष्ट्रीय घडामोडी बाबत जेवढे महत्वाचे आहे, तेवढेच ते राष्ट्रांतर्गत घडामोडीबाबत भारतीय राष्ट्राच्या विकासासाठी महत्वाचे आहे. हे लक्षात घेणे अत्यंत आवश्यक आहे.

१२. बुद्ध की युद्ध ह्या प्रश्नात अडकलेल्या तमाम जनतेस बुद्धासाठी आवश्यक ठरलेले महायुद्ध आम्ही घोषित करीत असून ते दलित, शोषित पिडीत, उपेक्षित, सर्वहारा, कष्टकरी, कामगार, अनुसूचीत जाती, जमाती विमुक्त, भटक्या अशा तमाम जनतेच्या न्याय्यहक्कासाठी तिच्या सर्वांगीण उन्नतीसाठी आहे. आमच्या सामर्थ्याची जाण आम्हाला पुरेपुर आहे. म्हणूनच चौफेर चढाई हे धोरण ठेवून आणि घोषित करून हे महायुद्ध आम्ही जिंकणार आहोत. आमच्या तथाकथित विरोधकांना हा आमचा जाहीर इशारा आहे.

१३. तुमच्याकडे समाज परिवर्तनाचा कार्यक्रम काय आहे ? आंबेडकर अनुयायांना असा सवाल करणाऱ्या तमाम लोकांना आमचे उत्तर आहे की राज्यसमाजवाद प्रस्थापित करणे हा आमचा कार्यक्रम असून तो प्रस्थापनेचा आमचा संसदीय मार्ग जगजाहीर आहे आणि त्यासाठी जाहीरपणे आम्ही वाटचाल करीत आहोत. आमच्या विरोधकांच्या कट कारस्थानांच्या करंटेपणावर वरवंटा फिरविल्याशिवाय आम्ही राहणार

नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ह्या देशाला अक्कल शिकविलेली आहे आणि ती प्रबुद्ध परंपरा आम्ही पुढे चालवीत आहोत. हे आम्ही येथे नमूद करू इच्छितो.

१४. प्रेसिडेंट केनेडींनी म्हटलेले आहे, " Ask not what your country can do for vou. Ask what you can do for your country. " पण इथे मात्र वेगळीच चिन्हे दिसून येत आहेत.

जातीय वेडाचार व फुटीरतावादी शक्ति राष्ट्रीय ऐक्यास व लोकशाही मूल्यांना, भौतिकवाद व विज्ञाननिष्ठेस आव्हान देताहेत नि यातूनच राष्ट्र महत्वाचे की धर्म महत्वाचा ? राष्ट्र महत्वाचे की संस्कृती महत्वाची ? राष्ट्र महत्वाचे की जात महत्वाची ? राष्ट्र महत्वाचे की संप्रदाय महत्वाचा ? राष्ट्र महत्वाचे की भांडवलशाही महत्वाची ? राष्ट्र महत्वाचे की सरंजामशाही महत्वाची ? राष्ट्र महत्वाचे की जमिनदारशाही महत्वाची ? राष्ट्र महत्वाचे की पोथीवाद महत्वाचा ? राष्ट्र महत्वाचे की पक्ष महत्वाचा ? राष्ट्र महत्वाचे की व्यक्ती महत्वाची ? राष्ट्र महत्वाचे की भाषावाद महत्वाचा ? राष्ट्र महत्वाचे की प्रान्तवाद महत्वाचा ? राष्ट्र महत्वाचे की साम्राज्यवाद महत्वाचा ? असले अनेक विध प्रश्न उग्र स्वरूप धारण करून भारतीय जनतेसमोर सातत्याने येताहेत. राष्ट्र महत्वाचे हेच उत्तर भारतीय जनतेस वेळोवेळी द्यावे लागणार आहे. आणि ह्या उत्तरातूनच अनेकविध प्रश्नांची तिला सोडवणूक करावयाची आहे. त्याशिवाय प्रगतीची वाटचाल ती समर्थपणे करू शकणार नाही. त्या प्रगतीसाठीच हिंदुत्वनिष्ठा महत्वाची की राष्ट्र महत्वाचे ? इस्लामीनिष्ठा महत्वाची की राष्ट्र महत्वाचे ? ख्रिस्ती निष्ठा महत्वाची की राष्ट्र महत्वाचे ? कम्युनिस्ट निष्ठा महत्वाची की राष्ट्र महत्वाचे ? ह्या आणि असल्या अनेकविध प्रश्नांची निर्णायक उत्तरं तिला द्यावयाची आहेत.

हिंदुस्थान, पाकिस्तान, खलिस्तान, दलितस्तान विषयक निष्ठेतून धर्मनिष्ठा राष्ट्राच्या प्रगतीआड आणल्या जात आहेत. आणि देवळी, साधुपूर, बेलछी, शेल्टी, मिनाक्षिपूरम, मराठवाडा अशा अगणित ठिकाणी

दलित, शोषित, पिडीत, उपेक्षित, बहिष्कृत, अनुसूचीत जाती, जमाती, विमुक्त, भटक्या जनतेच्या सरसहा कत्तली केल्या जात असतांना राष्ट्र म्हणजे तरी काय ह्याही प्रश्नाचे निर्णायक उत्तर भारतीय जनतेस द्यावयाचे आहे. आणि हे उत्तर देतांना राष्ट्रवाद हे अंतीम ध्येय ठरत नसून मानवतावादच अंतिम ध्येय असतो हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

१५. विरोधकांची व आंबेडकर अनुयायांची कान उघाडणी करणे आणि राष्ट्रहितार्थ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या बौद्धधम्माच्या क्रांतीकारी वारशाची महानता भारतीय जनतेस पटवून देणे व मानव जातीच्या उद्धाराची जबाबदारी स्पष्ट करणे आवश्यक असून त्यासाठीच ह्या आणि आगामी पुस्तकांचा प्रपंच आहे. ह्या प्रपंच्याचे स्वागत जनता उत्स्फुर्तपणे करेल ही आशा आहे.

– मधु गवई

निकाय : एक

१. भारतातील आणि जगातील दलितांचे दुःख दारिद्र्य पिळवणूक आणि त्याला कारण ठरणारी परिस्थिती अनुभवून आणि जाणून अंतःकरणाचे अग्निकुंड झालेल्या दलित साहित्यिकांची दलित साहित्याच्या व चळवळीच्या माध्यमातून त्या विरोधी विद्रोही भूमिका जाहीर करीत सम्यक परिवर्तन घडविण्याच्या हेतूने क्रांतीमय वाटचाल सुरू आहे.

२. दलित साहित्यिकांच्या विद्रोही भूमिकेमूळे दलित साहित्य क्रांतीदर्शी ठरले आहे. दलित साहित्याच्या ह्या क्रांतीदर्शीत्वास डॉ. बाबासाहेब आंबेडकर कारण ठरलेले आहेत. हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून प्रेरणा घेणाऱ्या सर्वच दलित साहित्यिकांना मान्य आहे. अशा ह्या क्रांतीदर्शी दलित साहित्यातून फक्त क्रांतीदर्शीत्वच प्रकट होत नाही तर बौद्धधम्मक्रांतीच्या विरोधी प्रतिक्रांतीचा विचारही मांडला जात आहे.

३. दलित क्रांतीच्या संदर्भात प्रसिद्ध दलित साहित्यिक बाबुराव बागूल म्हणतात, " दलित हे विशेषण सम्यक क्रांतीचे नाव आहे. क्रांतीचा साक्षात्कार आहे." (दलित साहित्य आजचे क्रांती विज्ञान पान २९) तसेच ह्या दलित असलेल्या सम्यक क्रांतीच्या आदर्श प्रतिमा व पुराण कथा बाबत ते म्हणतात, ' दलितांची क्रांती ही फक्त हया युगाची निर्मिती आहे. म्हणून तिचे आदर्श, तिच्या प्रतिमा, तिच्या पुराणकथा हयाच युगातल्या पाहिजेत. ' (दलित साहित्य आजचे क्रांतीविज्ञान पान १४७) असे

म्हणून ते थांबत नाहीत. थांबते तर ते दलित साहित्यिक कसले ? तर ते पुढे म्हणतात, "मानवाच्या मुक्तिसाठी जगाच्या पाठीवर लढलेले महापुरुष, त्यांची चरित्रे हे आमचे आदर्श " (दलित साहित्य आजचे क्रांतिविज्ञान पान १३०) तर जगाच्या पाठीवरील अगणित अशा महापुरुषांना आदर्श म्हणून स्विकारून त्यांना दलित असलेली सम्यक क्रांती करून कार्ल मार्क्सला अभिप्रेत असलेली आर्थिक क्रांती प्रस्थापित करावयाची आहे, वा ती होईल असा विश्वास वा आशावाद स्वत: बागूल व इतर दलित साहित्यिक आणि त्यांचे तमाम पंढरपूरी साथीदार व्यक्त करीत असतात.

४. दलित क्रांतीच्या यशस्वीतेसाठी त्यांनी जागतिक क्रांतीकारी साहित्य आणि दलित जनतेची बाजू घेणारे जगातील सर्व विचारवंत महापुरुष तसेच सर्व क्रांत्या आदर्श आणि आधारस्तंभ म्हणून स्विकारलेल्या आहेत. तसेच त्यांच्याच म्हणण्याप्रमाणे ह्या शतकाने दिलेली अनेक शस्त्रे त्यांनी धारण केली आहेत. खरे म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून प्रेरणा घेणारी कोणतीही सुज्ञ व्यक्ती अशा प्रकारचे तर्कविसंगत विचार मांडणार नाही. पण दलित साहित्यिकांनी तसे विचार मांडलेले आहेत. आणि मांडत आहेत. आणि त्यामुळेच डॉ. आंबेडकरांपासून प्रेरणा घेऊनही दलित व पुरोगामी साहित्यिकांची मार्क्सवादी दलित क्रांती आंबेडकरी ध्येयवादास म्हणजेच बौद्धधम्मक्रांतीस न्याय देऊ शकणार नाही, असे माझे ठाम मत झाले आहे.

५. दलित साहित्यिकांनी स्विकारलेल्या भूमिकेतून किव करण्या इतपत तारतम्य बुद्धिचा अभाव व्यक्त होत असून आंबेडकरी आंदोलन दिशाहीन करण्यास ते कारणीभूत झाले आहेत. म्हणूनच ते आंबेडकरी समाजाची शुद्ध फसवणूक करीत असून त्यांची जागतिक जीवन विषयक भाष्ये बेजबावदारपणाची भाष्ये ठरली आहेत. त्यांच्या दलित वैचारिकतेने वैचारिक व्यभिचार माजवत आंबेडकरी आंदोलकांची चळवळ फोडून साम्यवादी वणव्याची कास धरली आहे,

६. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी महत् प्रयासान जग आणि जीवन बदलणारी जगभूषण बौद्धधम्मक्रांती घडवून आणली आणि लक्तरातून दिसणारी हयांची इज्जत झाकली. युगायुगाच्या दारिद्रयानं केलेली धुळधाण थांबवली. ज्ञानाची महाद्वारे खुली करीत महा-रोग्यासारख्या झडलेल्या नि सडलेल्या हयांच्या जीवनाची किळस न करता महाकारूणिक बुद्धाच्या असिम करूणेनं आणि मार्गानं हयांची सेवा केली. ती करण्यासाठी त्यांनी सर्वस्वाचा त्याग केला. अखिल मानवजातीच्या उद्धा-राची काळजी वाहिली. त्यासाठीच त्यांचा लढा होता. हे जगानेही मान्य केले असून त्यांच्या विरोधकांनाही मान्य करावे लागले आहे. त्यांनी लढयाची निर्णायक, ठाम, निश्चित अशी प्रबुद्ध दिशा जगाला दिली आहे. तिची जाणीव करून देतांना त्यांनी म्हटले आहे, " मानवतेचे संपूर्ण संरक्षण होण्यासाठी साऱ्या जगाला बौद्धधर्माची कास धरावी लागेल ! जातीभेदाचे मुळ कायमचे उपटून टाकण्यासाठी आपण हिंदुधर्माचा त्याग करणे आवश्यक आहे. चैनीत असलेल्यांना पायाखाली काय कुजत आहे याची जाणीव येणार नाही. ही जातीभेदाची समाज रचनाच जर उलथून पाडावयाची असेल तर आपणास बौद्धधर्माचीच शिकवण अमलात आणली पाहिजे. ही गोष्ट मी निव्वळ गळयापासून बोलत नसून बेंबीच्या देठापासून बोलत आहे. " (भाषणे खंड १ पान १९२ संपा. मा. फ. गांजरे) त्यांचे हे बोल खरे ठरत आहेत. जगाला बौद्धधम्माचीच कास धरावी लागेल. याबद्दल माझ्या मनात कसलाही संदेह नाही. जग आणि जीवन बदलण्याचे सामर्थ्य त्यांच्या वैचारिकतेतून आणि कृतीशीलतेतून व्यक्त झालेले आहे. बौध्दधम्मक्रांती घडवून त्यांनी तसे जगास दाखवून दिले आहे. बौध्दधम्मक्रांतीच्या गतिमानतेच्या त्यांनी दिलेल्या कर्तव्याप्रती दलित साहित्यिकांची दलित वैचारिकता नि कृती-शीलता आंबेडकरांपासून प्रेरणा घेऊनही सरडयासारखी रंग बदलणारी ठरली आहे. कारण बौध्दधम्मक्रांतीचे मोल ते समजू शकलेले नाहीत. म्हणूनच ते सर्व कांत्यांची मिळून होणाऱ्या सर्वंकष दलित क्रान्तीचा Right Revolution चा विचार मांडून बौध्दधम्मकांतीस जग आणि जीवन

बदलण्यास असमर्थ आणि अपूर्ण समजून Wrong Revolution ठरवित आहेत.

बाबुराव बागूलांच्या दलित क्रांतीच्या कल्पनेची भंबेरी उडवतांना बौद्ध समीक्षक भाऊसाहेब अडसूळ म्हणतात, " जेथे जेथे दलित शब्द जाईल तेथे तेथे सम्यक क्रांतीची परिवर्तने घडून येतील. विश्वव्यापी समाज रचनेचा चेहरा मोहरा बदलण्याचा हाच एकमेव पर्याय आहे. बाबुरावांच्या या दिवाळखोर विचारांचे राहुन राहुन आम्हाला नवल वाटते. " (दलित साहित्य का नको ? पान २९ लेखक विजय सोनवणे) याचा अर्थच असा की दलित साहित्यिकांनी वैचारिक दिवाळखोरी बाबत कमाल मर्यादा गाठली आहे.

दलित क्रांतीचा विचार मांडतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे क्रांतिकारी तत्वज्ञान दलित व पुरोगामी साहित्यिकांनी चिकित्सकपणे लक्षात घेतलेले दिसत नाहीत. हेच त्याच्या दलित वैचारिकतेतून दिसून येत आहे. खरे म्हणजे धर्मांतराशिवाय (बौद्ध धम्मक्रांतीशिवाय) उन्नतीचा कोणताही मार्ग आक्रमिणे कठीण आहे, हे स्पष्ट करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हणलेले आहे, " आर्थिक उन्नतीचा कोणताही मार्ग तुम्ही स्विकारला तरी अस्पृश्यतेमुळे कोणत्याही मार्गात तुम्हाला यश प्राप्ती होणार नाही. अस्पृश्यता ही एक तुमच्या उन्नतीच्या मार्गात कायमची धोंड आहे. ती सरकविल्याशिवाय तुमचा मार्ग सुकर होऊ शकत नाही व धर्मांतर केल्याशिवाय ही धोंड नाहीशी व्हायची नाही. " (भाषणे खंड १ पान ४६ संपा. मा. फ. गांजरे) घटनेतील कायद्यानुसार अस्पृश्यतेचे जातीयतेचे उच्चाटन तर त्यांनी केलेच, पण कायदे कितीही चांगले असले, न्याय्य हेतूंसाठी तयार केलेले असले तरी त्यांची अंमलबजावणी योग्य तऱ्हेने जर झाली नाही तर ते कायदे कुचकामाचे ठरतात, ह्याची जाण त्यांना पुरेपूर होती. म्हणूनच त्यांनी राजकीय, सामाजिक, आर्थिक लोकशाहीच्या प्रस्थापनेतून देशहितास कारण ठरणारी, अस्पृश्यतेचे जातीयतेचे दैनंदिन समाज जीवनातून कायमचे उच्चाटन करण्यासाठी, करण्यास समर्थ असलेली

बौद्धधम्मक्रांती घडवून आणली आणि अस्पृश्यतेस, जातीयतेस कारण ठरणारी धर्मव्यवस्था, संस्कृती, दैवतं, अध्यात्मिक जातीयवादी ग्रंथ, परंपरा, रूढी, आचारविचार यांचा आपल्या लाखो अनुयायांसह त्याग करून राजकीय, सामाजिक, आर्थिक लोकशाहीच्या प्रस्थापनेचा मार्ग जगजाहीर केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून प्रेरणा घेणाऱ्या व त्यांचे अनुयायी म्हणून मिरविणाऱ्या दलित साहित्यिकांनी बौद्धधम्मक्रांतीचे मोल खऱ्या अर्थाने ओळखलेले नाहीय, ती स्विकारलेली नाहीय, आणि तरीही ते जग आणि जीवन बदलण्यासाठी निघाले आहेत. त्यांनी जर बौद्धधम्मक्रांतीचे मोल ओळखलेले नाहीय, तो मार्ग स्विकारलेला नाहीय तर मग ते जग आणि जीवन कोणत्या मार्गाने बदलणार आहेत ? ह्या प्रश्नाचे उत्तर अर्जुन डांगळे ह्या दलित साहित्यिकाच्या विचारात मिळते ते असे, "मार्क्सवादाचा मी एक शास्त्रीय तत्वज्ञान आणि समाजशास्त्र यांच्या पुरताच विचार करीत आहे. एवढेच नव्हे तर या तिन्ही व्यतिरिक्त शोषणप्रक्रियेविरूद्ध लढणारे कुठलेही तत्वज्ञान किंवा विचार हा दलित साहित्य विचाराला पुरक असाच आहे.' (दलित साहित्य : एक अभ्यास निवेदन चौतीस संपा : अर्जुन डांगळे) या त्यांच्या विधानाचा अर्थ असा की मार्क्स, आंबेडकर, बुद्ध या तिन्ही बरोबरच यांच्या व्यतिरिक्त शोषण-प्रक्रियेविरूद्ध लढणारे इतर कुठलेही तत्वज्ञानविचार वा विचारवंत वा महापुरुष त्यांनी स्विकारलेले आहेत. पण निश्चित कोणते व कोणकोणते ह्याबाबत माझ्या माहितीप्रमाणे कोणत्याही दलित साहित्यि-काने बुद्धिला पटतील असे रास्त विचार मांडलेले नाहीत. त्यांनी जी दलित वैचारिकता मांडलेली आहे, ती बुद्धीला पटणे केवळ अशक्य आहे. आणि अर्जुन डांगळे तर दलित विचारधारेत गटांगळ्या खात आहेत. दलित साहित्यिकांनी जसे वाटेल ते तत्वज्ञान, विचार, विचारवंत महापुरुष स्विकारले आहेत तसे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्विकारलेले होते काय? ह्या प्रश्नाचे उत्तर स्पष्टच आहे की नाही. इथे हे लक्षात घेणे आवश्यक आहे की त्यांनी दलित जनतेची बाजू घेणारे कोणतेही अराजकतावादी तत्वज्ञान वा विचारवंत स्विकारलेले नाहीत, तर त्यांनी सामाजिक राजकीय

सांस्कृतिक, आर्थिक आणि धम्म निती या अर्थाने धार्मिक पुनरुत्थान घडविण्यासाठी महाकारूणिक बुद्ध, संत कबीर, क्रांतिबा फुले यांना गुरू मानून त्यांच्या सर्वंकष क्रांतीकार्याची धुरा स्विकारून जगाला क्रांतीकार्याच्या महानतेचा मानवतावादी बौद्धधम्माचा मार्ग दिला आहे. पण दलित साहित्यिकांनी तो मार्ग न स्विकारता जो साम्यवादाचा मार्ग डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सतत सामाजिक जीवन कार्यात सुरवातीपासून शेवटपर्यंत त्याची असमर्थता दाखवून नाकारला, नेमका तोच मार्ग स्विकारला आहे. आणि नवल म्हणजे तो ही आंबेडकरांपासून प्रेरणा घेऊन,, दलित साहित्यिकांनी स्विकारलेल्या अनेक प्रेरणांमुळे घडून आलेल्या विपरतीचे विवेचन होणे आवश्यक आहे. त्यांनी स्विकारलेल्या सर्व क्रांत्या म्हणजे निश्चित कोणत्या ? सर्व विचारवंत म्हणजे निश्चित कोणते ? अनेक प्रेरणा म्हणजे निश्चित कोणत्या ? अनेक शस्त्रे म्हणजे निश्चित कोणती शस्त्रे ? अशा बऱ्याच प्रश्नांची उत्तरं जग आणि जीवन बदलण्यास निघालेले दलित साहित्यिक आणि त्यांचे पंढरपुरी पुरोगामी साथीदार देत नाहीत. अशा प्रकारचे काही प्रश्न मी अर्जुन डांगळे यांना आयुष्यमान गुरूनाथ धुरी यांच्या समक्ष विचारले, उदा. तुम्ही जी दलित क्रांती करू पाहताहात ती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडवून आणलेल्या बौद्धधम्मक्रांतीस न्याय देईल काय ? क्रांतीच्या प्रचारासाठी तुम्ही लोक आम जनतेकडे जाल तेव्हा ती जनता तुम्हाला क्रांतीस कारण ठरणाऱ्या क्रांतीकारी तत्वज्ञानाबाबत विचारणा करील ते तत्वज्ञान कोणते ? नवीन काही क्रांतीकारी तत्वज्ञान तुम्ही तयार केले आहे काय ? तुमचे निश्चित आदर्श आणि आधारस्तंभ कोणते ? असल्या मला अभिप्रेत आंबेडकरी जनतेच्या प्रश्नांची उत्तरं न देता अर्जुन डांगळे म्हणाले की, 'स्टॅलिन मरण पावले. तेव्हा बाबासाहेब आंबेडकर रडले होते ना. तेव्हा मी म्हणालो, लाला लजपतराय मरण पावले तेव्हा बाबासाहेब हमसून हमसून रडले होते ना ? मुद्दा हा की रडण्याचा संदर्भ देऊन ते कोणत्याही प्रश्नाचे समाधानकारक उत्तर देऊ शकले नाहीत. त्यांनी लेनिनच्या बाबतीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जे १९२९ साली म्हटलेले आहे ते नीट लक्षात घ्यावे आणि मनन करून विचार सुज्ञपणास

शोभतील असे मांडत जावे. त्यांनी म्हटलेले आहे " लेनिन हिंदुस्थानात जन्मला असता तर प्रथम त्याने जातीभेद व अस्पृश्यता यांना साफ गाडून टाकले असते व तसे केल्याखेरीज क्रांतीची कल्पना त्याने मनातही आणली नसती. " (वहिष्कृत भारतातील अग्रलेख, पान ३२९ संपा. रत्नाकर गणवीर) हे विचार लक्षात घेऊन दलित साहित्यिकांनी त्यांच्या मनात आलेली व त्यांनी मांडलेली दलित क्रांतीची व चळवळीची कल्पना तसेच तिचे आदर्श आणि आधारस्तंभ मानलेले अनेक विचारवंत व महापुरुष पारखायला हरकत नाही, ते पारखणे आवश्यक आहे. अर्जुन डांगळेचे म्हणणे असे की ज्या बाबुराव बागुलांना कम्युनिस्ट समजले जाते त्यांना सोविएत लँड पारितोषिक मिळाले आहे का? तसं नसतांना सुद्धा त्यांना कम्युनिस्ट समजले जाते. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे सोविएत लँड पारितोषिक मिळालेल्या व्यक्तिसच फक्त कम्युनिस्ट मानायचे असे जर ठरविले तर मात्र सोविएत लँड पारितोषिक न मिळालेले पण मार्क्सवादाकडे झुकलेले व त्यानुसार विचार मांडणारे दलित साहित्यिक काही वर्षाच्या आतच त्यांच्या पंढरपुरी पुरोगाम्यांच्या सहकार्यानं त्यांची क्रांती म्हणून गोंधळ घडवून आणतील आणि त्या गोंधळाचाच उदो उदो करीत त्यांचे साथी तिला डोक्यावर घेऊन नाचतील. कारण आंबेडकर द्रोही असलेली कोणतीही गोष्ट डोक्यावर घेऊन नाचण्यात ते दिवसेनदिवस चांगलेच तरबेज होत आहेत. माझ्या मते दलित क्रांती व वैचारिकता आंबेडकरद्रोहाचा एक भाग आहे. ह्या आंबेडकरद्रोही कटकारस्थानांना थांबविण्यासाठी त्यांच्या दलित वैचारिकतेची धुळधाण करणे अत्यंत आवश्यक आहे. मुद्दा हा की रडण्याचा वा सोविएत लँड पारितोषिकाचा संदर्भ देऊन हे त्यांना विचारलेल्या कोणत्याही प्रश्नांची समाधानकारक उत्तरं देवू शकत नाहीत. आणि जोपर्यंत तें दलित वैचारिकता बाळगूण आहेत तोपर्यंत देवू शकणार नाहीत.

९. अर्जुन डांगळे म्हणतात, " या शतकाने दलितांना अनेक शस्त्रे दिली आहेत. या शस्त्रानिशी आज दलित संघर्षात उभा आहे. " (दलित

साहित्य एक अभ्यास, निवेदन एकेचाळीस संपा. अर्जुन डांगळे) त्यांच्या हचा विधानातून सूचित होते की या शतकाने अनेक शस्त्रे दलितांना दिली असून या शस्त्रानिशी दलित संघर्षात उभा आहे. या शतकाने दिलेली अनेक शस्त्रे ती नेमकी कोणती ? त्यांची नावं, संदर्भ, स्पष्टिकरणं, स्वरूपं कशी व कोणत्या प्रकारची निश्चित अशी आहेत हे त्यांनी सांगायला हवे. पण ते ठाम नि निश्चितपणे कोणत्याच प्रश्नाच उत्तर देवू शकत नाहीत. म्हणूनच दलित साहित्यिकांची दलित वैचारिकता नि कृतीशिलता निर्णायक भूमिके-अभावी सरड्यासारखी रंग बदलणारी ठरली आहे. तिला निती अनीतिची चाड राहलेली नाहीय. अशा हचा आंबेडकरद्रोही दलित वैचारिकतेची कठोर दखल घेणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा ते आंबेडकरांपासून प्रेरणा घेऊनही आबेडकरी ध्येयवादास न्याय देवू शकणार नाहीत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना त्यांनी समजूनच घेतलेले नाहीय. म्हणून ते आंबेडकरी विचारधारा व मार्क्सवादी विचारधारा यात समन्वय करावयास निघालेले आहेत. असे करून ते निश्चित असे काहीच साध्य करू शकणार नाहीत. उलट बौद्धधम्मक्रांतीच्या गतिरोधास कारण ठरतील. आज तसे दिसत आहे. नाशाकडेच त्यांची वाटचाल सुरू आहे.

दलित साहित्यिकांपैकी प्रल्हाद चेंदवणकर म्हणतात, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर, म. फुले आणि दलित जनतेच्या बाजूने उभे राहिलेले जगाच्या पाठीवरले सर्व विचारवंत दलित कवितेचे आणि कार्याचे प्राण आहेत" ! (ऑडिट–मी म्हणतो) असे म्हणून ते प्राण स्विकारताच जगातील सर्व विचारवंत दलित कवितेच्या पाठीवर बसवताच वैचारिक स्वत्व असं तिला राहत नाही. तिची वांझ दलित वैचारिकता जग आणि जीवन बदलण्यास असमर्थ ठरली आहे. म्हणूनच वैचारिक व्यभिचार माजविण्यास दलित वैचारिकता कारण ठरली आहे, असे म्हणावे लागत आहे. दलित कवितेच्या शास्त्राच वस्त्रहरण दलित साहित्यिकांनीच केलेले आहे, म्हणून ते विद्रोहाशी जवळीक साधणारं 'दलित शास्त्र' भोंगळ आणि ओंगळ ठरलं आहे. त्यांना अभिप्रेत दलित क्रांतीसाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बुद्ध, कबीर, फुले यांचा ते त्यांच्या सोईनुसार वापर करतात. दलित साहित्यिक जाणता

अजाणता बौद्धधम्म क्रांतीच्या विरोधी वाटचाल करीत आहेत. त्यांना माहित आहे की, डॉ. आंबेडकर, बुद्ध, कबीर, फुले यांना टाळून आपल्याला उन्नतीच्या कोणत्याही मार्गाची वाटचाल करता येणार नाही. तशी केली तर कुणी कवडीची किंमत देणार नाही. आणि दिली तर "मुकी बिचारी कुणी हाका, नि वरवर आनी दहा दहा ठोके वर ठोका." अशी त्यांची अवस्था देणारे केल्याशिवाय राहणार नाहीत. दलित साहित्य नि चळवळीचा आजवरचा इतिहास हेच सांगत आला आहे. आणि दलित क्रांतीच्या ओबड धोबड मार्गानेच ते जाणार असतील तर त्यांच्यासारखे करंटे तेच ठरतील त्यांना अभिप्रेत सम्यक परिवर्तनांसाठी डॉ. आंबेडकर बुद्ध, कबीर, फुले यांचा ते करीत असलेला गैरवापर म्हणजे बौद्धधम्मकांतीस गतिरोध करू पाहणारा स्लो पॉयझनिंगचा (Slow poisoning) चा प्रकार ठरत आहे.

११. दलित साहित्यिकांची दलित वैचारिकता म्हणजे विश्वासघातान डॉ. आंबेडकराच्या पाठीत खंजीर खुपसणे होय. क्रांतीबा फुल्यांना बगल देत बुद्धाला विरोध करीत, कबीराची बंडखोर कविता वांझ ठरविण्याचा नादाणपणा जाहीर करण्याचा हा प्रकार होय. अशा हच्या वैचारिक व्यभिचार माजविणाऱ्या दलित साहित्यिकांच्या मानसिकतेची वेळीच कठोर दखल घेणे आवश्यक आहे. अन्यथा जगातील तमाम क्रांत्या पाहून अजीर्ण झालेली त्यांची दलित क्रांती आणि उत्स्फुर्तकरणी बौद्धधम्मक्रांतीस विघातक ठरल्याशिवाय राहणार नाही. खायच्या मार्क्सवादी दातावर आंबेडकरी विचाराचे सोनेरी वर्ख चढवून सोनेरी दात दाखवत आंबेडकरी आंदोलकांची आणि आंदोलनाची दिशाभूल करण्यात ते मशगूल आहेत. वैश्विक राष्ट्रवादाची अवघे विश्व कवेत घेण्याची त्यांना खूप घाई झालेली आहे. हच्या घाई गर्दीमुळे त्यांच्या लक्षात येत नाही की, त्यांच्या दलित वैचरिकतेची वाटचाल गुलामगिरीकडे सुरू आहे. मार्क्सच्या अर्थवादी विचारांनी ते एवढे भारून गेले आहेत की, मार्क्सवादाने निर्माण केलेल्या समस्या प्रधान समतेकडे जाणीवपूर्वक डोळे झाक करून घेत आहेत. बौद्धधम्मक्रांती घडवून जग हादरविणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी साम्यवादा-

पासून सावध राहण्याचा सातत्याने दिलेला इशारा त्यांनी लक्षात घेतलेला नाही. साम्यवादापासून सावध राहण्याचा इशारा देतांना त्यांनी म्हटलेले आहे "कम्युनिझम हा कसा जगला ? तो कसा टिकून राहिला ? ही शक्तिची वाव आहे. शक्ति आणि जबरदस्तीने तो टिकला आहे. त्यांना प्रॉप्रेटी मालमत्ता हवी. रशियातील कडक शिस्त बाळगणारे जमिनदार लुप्त होताच लोक उसळी मारून उठतील. बेबंदशाही माजेल आणि मग समाजाचा व्यवहार बेबंदशाहीने चालू लागेल (भाषणे खंड १ पान २१७ संपा. मा. फ. गांजरे) आणि म्हणूनच शक्ति व जबरदस्तीने टिकून असलेल्या साम्यवादापासून सावध राहण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. अशा हचा कम्युनिस्ट लढचाच्या ज्वालामुखीच्या तोंडावर आशिया खंड वसला आहे. अशी स्पष्ट जाणीव करून देत मुक्त किंवा स्वतंत्र लोकशाही राष्ट्रांशी मैत्री करण्यात भारताचे हित आहे. अर्थात स्वातंत्र्य हचा शब्दावर आपली श्रद्धा असेल तर...असे परखडपणे सांगून स्वातंत्र्याचे मोल व महानत्व व्यक्त करणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेकरांचे मानवी मूलभूत हक्कांचे, अवमूल्यन करणाऱ्या साम्यवाद विरोधीचे विचार दलित साहित्यक व त्यांचे साथी लक्षात घेणार आहेत की नाही ? की मार्क्सचे विचार ज्याच्या कानावर पडले त्याचे मनच व्यापून बसले असे म्हणत आंबेडकर द्रोहच करीत राहणार आहेत ? असे करतांना बाबुराव बागूल मोठचा उस्फुर्तपणे म्हणताहेत, "मार्क्सला शोषण दिसले आणि एक समाजवादी शास्त्र उद्याला आले आणि जन्मापासून विजय मिळवत त्याने अर्ध्या जगावर शासन सुरू केले. अन् ज्याच्या कानावर पडले त्याचे मनच व्यापून बसले.(उत्थानगुंफा पान ४ प्रस्तावना, लेखक यशवंत मनोहर)हे खरे आहे काय ? हचा विधानाचा खरेखोटेपणा ठरविण्याआधी इथे हे लक्षात घेतले पाहिजे की मार्क्सवादाने समता आणि ती ही प्रमुखता आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी जो हुकूमशाहीच्या अराजकतेचा मार्ग अनुसरला त्या नुसार विजयामागून विजय मिळवत समस्या प्रधान समता निर्माण करीत तो अर्ध्या जगावर पसरला आहे. ज्यांनी तो अनुसरला ते त्यात होरपळून

निघाले. आणि म्हणून ते मार्क्सवाद विरोधी झाले. हे जर खरे आहे तर वर बाबूराव बागुल जे म्हणतात ते ही खरे आहे. मानवी मुल्ये, मानवी हक्क, पायदळी तुडवत, जटील समस्या निर्माण करीत, मार्क्सवाद अर्ध्या जगावर हुकूमशाही पद्धतीचे शासन करू लागला आहे. आणि म्हणूनच समाजवादाची कास धरणाऱ्या ना. ग. गोरेना म्हणावे लागत आहे की, " रशियाला मान आहे तो त्याच्या ऐहीक सामर्थ्यामुळे, त्याच्या विचार वा ध्येयवादामुळे नव्हे. म्हणजे आज सामर्थ्याच्या शिखरावर आरुढ असलेल्या रशियाने वस्तुतः मार्क्सवादाची पिरॅमिडहून देखील उंच अशी टोलेजंग कबर उभारण्यात यश मिळवले असून त्या कब्रीत मानवतावाद, मानवी स्वातंत्र्य, शोषणमुक्ति, समानता, कामगारांची जागतीक एकजुट इत्यादी सुंदर सुंदर कल्पनांच्या ममी रांगेने मांडून ठेवल्या आहेत." (होला जेव्हा लाल होते, प्रस्तावना ले. वि. स. वाळींबे) ही वस्तुस्थिती आणि मार्क्सवादाची घडण लक्षात न घेता मार्क्सला अभिप्रेत आर्थिक क्रांती प्रस्थापित करण्यासाठी जे सम्यक परिवर्तन करण्याची दलित व पंढरपुरी पुरोगाम्यांची खटपट सुरू आहे, तिची कठोर दखल घेणे आवश्यक आहे. अन्यथा ते कुणालाच न्याय देऊ शकणार नाहीत. स्वतःलाही.

० ० ०

निकाय : दोन

१२. आंबेडकरी आंदोलनाशी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संबंधित लेखक, कार्यकर्ते, विचारवंत यांनी लिहिलेल्या लेखांचे, चर्चांचे, भाषणाचे, परिसंवादाचे, अर्जुन डांगळे संपादीत 'दलित साहित्य एक अभ्यास' हे पुस्तक आहे. ह्या संकलनाच्या व दलित चळवळीच्या अभ्यास आणि अनुभवातून काही निष्कर्ष काढून त्यांनी पुस्तकास चिकित्सक असे निवेदन लिहिण्याचा अयशस्वी प्रयत्न केला आहे. हे निवेदन लिहितांना त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे क्रांतीकारी विचार व बौद्धतत्वज्ञान तसेच 'सामुहिक विमोचनासाठी म्हणून चाललेल्या लढ्यात प्रत्येक मानवी व्यक्तिचे व्यक्ति म्हणून असलेले स्वातंत्र्य हे ध्येय जर केंद्रस्थानी ठेवले नाही तर एका प्रकारची गुलामगिरी नष्ट करतांना दुसऱ्या प्रकारच्या गुलामगिरीच्या पाशात आपण स्वतःला अडकवून घेतले आहे असे आढळून येईल' (दलित साहित्य एक अभ्यास, दोन शब्द) अशा प्रकारची स्पष्ट जाणीव करून देणारे व मार्क्सवादाच्या मर्यादा व्यक्त करणारे लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे वैचारिक वाङ्मय अर्जुन डांगळे यांनी अभ्यासलेले नाहीय, हेच लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या म्हणण्यावरून पुस्तकास लिहिलेल्या दोन शब्दातील अर्थावरून सूचित होते. मार्क्सच्या विचारातील विसंगतीमुळे घडून आलेल्या दोषाबाबत ल. शा. जोशी म्हणतात, "विचारपद्धतीच्या नियमांप्रमाणे त्यातील एक मुख्य दोष असा आहे की, इतिहास शक्तिचे एक मुख्य स्वरुप जो मानव त्याच्या स्वरुपाची मिमांसा मार्क्सने केली नाही. मनुष्य हा काय आहे हा प्रश्नच त्याने उपस्थित केला नाही."

(लेखसंग्रह भा. १ पा. ६२ संपा. मधुकाका) मार्क्सवादातील हा दोष मानवी मूलभूत हक्काच्या कुचंबणेस कारण ठरला. त्यातून अनेक जटील प्रश्न निर्माण झाले आणि इथेच मार्क्सवादाला मर्यादा पडली आहे. मार्क्सवादातील दोष व मर्यादा समजून न घेता त्याच्या कच्छपि दलित साहित्यिक लागले आहेत. त्यामुळेच अर्जुन डांगळेच्या भोंगळ निवेदनावरून ते आणि त्यांचे दलित साहित्य, वैचारिकता नि चळवळ चांगलीच पेचात आली असून तिचे तकलादुपण आणि दिशाहिनता उघडी पडली आहे.

१३. ते एके ठिकाणी म्हणतात, "जशा समाजपरिवर्तनाच्या घोषणा स्वागतार्हच असल्या तरी त्या कोण आणि कोणत्या व्यासपिठावरून करतो याला जसे महत्व आहे, तसे सहानुभूतीदार कोणत्या फळीत आहे, त्याची जागा कोणती याला देखील महत्व आहे." (दलित साहित्य:- एक अभ्यास निवेदन बेचाळीस) त्यांच्या हचा विधानातून सावधगिरीचा इशारा देत ते सूचीत करताहेत की स्वागतार्हय असलेल्या समाज परिवर्तनाच्या घोषणा कोण आणि कोणत्या व्यासपिठावरून करतो हे जसे महत्वाचे आहे तसेच सहानुभूतीदाराची फळी, फळीतील त्याची जागाही ते दखल घेण्या इतपत महत्वाची मानतात. त्यांच्या दृष्टिने प्रत्येक घोषणेला, व्यासपिठाला, सहानुभूतीदाराला, त्याच्या वैचारिकतेला, त्याच्या फळीला, फळीतील जागेला, लायकीला विशिष्ट प्रकारचे महत्व, आहे. हे महत्व जाणूनही त्यांनी व त्यांच्या सारख्या इतर समाजपरिवर्तनाचा विचार मांडणाऱ्या दलित व पुरोगामी साहित्यिकांनी सामाजिक बांधिलकीच्या भूमिकेबाबत सावधगिरी आणि दूरदृष्टी ठेवली आहे की नाही हे बघणे आवश्यक आहे. त्यांच्या दलित साहित्य व वैचारिकतेच्या अभ्यासातून गाफीलता, अदूरदृष्टी व वैचारिक विसंगतीच प्रत्ययास येते. हचा वैचारिक विसंगतीमुळेच त्यांची दलित वैचारिकता अडचणीत आलेली असून, तकलादू ठरली आहे.

१४. एकीकडे बाबुराव बागूलांनी ठासून म्हणायचे 'दलित साहित्यानेच सम्यक क्रांती होऊन मार्क्सची आर्थिक क्रांती यशस्वी होईल.' तर

दुसरीकडे 'च' चीच भाषा वापरणाऱ्या बागूलांच्या विचाराविरोधी अर्जुन डांगळेंनी म्हणायचे की 'केवळ साहित्यामुळे क्रांती होते हा निव्वळ भ्रम आहे.' एकमेकांवर कुरघोडी करीत निघालेले हे दलित साहित्यिक दलित क्रांतीच्या भ्रमात वावरताहेत. म्हणूनच दलित साहित्यकांच्या वैचारिक विसंगतीवाबत विजय सोनवणे म्हणतात, 'दलित साहित्यिकात विचारांचा इतका गोंधळ उडालेला आहे की दलित साहित्यावर एकच प्रश्न विचारला तर त्याची उत्तरे नेमकी वेगवेगळी दिली जातात. कारण विचारात सुसंगती नाही.' (दलित साहित्य का नको ? पान ९) ही सुसंगती नसल्याचे बागूल व डांगळे यांच्या दलित साहित्य विषयक मतावरून दिसून येते. अगदी असेच गीतेबाबत आहे. गीतेत सगळे काही आहे असे म्हणतात. असे म्हणणाऱ्यांना गीतेत निश्चित काय आहे असे विचारता त्यावर त्यांचे निश्चित असे उत्तर नसते. तर इथे प्रश्न असा उपस्थित होतो की हचा दोन्ही दलित साहित्यिकांच्या वरील विधानांचा नेमका अर्थ काय घ्यायचा ? हा नेमका अर्थ समजून घेण्याआधी दलित साहित्याच्या हचा लोकांनी केलेल्या सर्जनशील आणि क्रांतीगर्भ व्याख्यांची दखल घेणे आवश्यक आहे.

दलित साहित्याची व्याख्या करतांना अर्जुन डांगळे म्हणतात, "भारतीय समाजातील जातीव्यवस्था, अस्पृश्यतेसारखे तिचे भीषण स्वरूप, इथली शोषण व्यवस्था या सगळचांची जाणीव होऊन ती विरुद्धची कठोर प्रतिक्रिया म्हणजे दलित साहित्य." (दलित साहित्य एक अभ्यास, निवेदन एकेचाळीस) तर आपल्याच विचारांना आणि व्याख्यांना किस झाड की पत्ती समजणारे बावुराव बागूल म्हणतात, "ज्या साहित्याला सम्यक् परिवर्तन अभिप्रेत आहे व जे साहित्य क्रांतीला सामोरं जातं ते दलित साहित्य !" (दलित साहित्य आजचे क्रांतीविज्ञान पान १६९) तसेच ते असेही म्हणतात, "दलित साहित्याची परंपरा पौराणिकता जागतिक क्रांतिदर्शी साहित्यात आहे. जे साहित्य सामान्य मानसाला नायकत्व देते आणि समाजवादाचा पुरस्कार करते ते साहित्य दलित साहित्याचा आदर्श आहे." (दलित

साहित्य आजचे क्रांतीविज्ञान पान २८) हया त्यांच्या व्याख्या व विधानांबाबत आपण एवढे मात्र निश्चितपणे म्हणू शकतो की समाज परिवर्तनासाठी आवश्यक असलेल्या अभिसरणाबाबत साहित्य बहुमोल कार्य करू शकते. आणि हया कार्याचे नाव क्रांतीकार्य ठरू शकते. साहित्याची अशी सर्जनशीलता व समर्थता याबाबत बौद्ध समीक्षक भाऊसाहेब अडसूळ म्हणतात, "साहित्यात प्रचंड शक्ति आहे. व्हॉल्टेर आणि रूसोच्या साहित्याने राज्यक्रांती घडवून आणली. कार्ल मार्क्सच्या लेखणीने अर्ध्या जगाला धक्का दिला. स्टो च्या एकाच कादंबरीने अमेरिकेत यादवी युध्दाची ठिणगी पेटवून दिली. कबीर, फुले, आंबेडकर यांच्या साहित्याने अस्पृश्य समाजास स्वाभिमान शिकवून आपल्या रास्त हक्कासाठी झुंजण्याचे सामर्थ्य प्राप्त करून दिले." (डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेरणेचे साहित्य, पान ८ संपा. अडसूळ) साहित्याच्या अंगी असलेल्या हया प्रचंड शक्तिची जाण दलित साहित्यिकांना आहे. पण ही प्रचंड शक्ति ज्या वैचारिक भूमिकेतून ते व्यक्त करण्याचा प्रयत्न करताहेत ती दलित वैचारिक भूमिका ठाम वैचारिक अधिष्ठाना अभावी ओकीबोकी बोडक्या बाईसारखी झाली आहे. दलित वैचारिकतेचे हे बोडकेपण त्यांना व त्यांच्या दलित उलाढालीला खूप महाग पडणार आहे. हे बोडकेपण घालवून घरंदाजपणासाठी विजय सोनवणे यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरं दलित साहित्यिकांनी द्यायची आहेत. ते म्हणतात, 'फ्रेंच राज्यक्रांतीचे जनक रूसो आणि वॉल्टीयर यांनी या दलित साहित्या सारखेच साहित्य निर्माण केले होते काय ? रूसोच्या सामाजिक - करारासारखी अथवा वॉल्टियरच्या तात्विक ज्ञानकोशासारखी किती ग्रंथरचना दलित साहित्यात निर्माण झाली. तसेच दलित साहित्याने मराठी साहित्याला किती अभिजात नाटके, चरित्रे टीकाप्रबंध दिले आहेत ? याचे उत्तर नकारात्मकच द्यावे लागेल. कारण दलित साहित्यिकांचा सवंग ललित साहित्य निर्मितीकडेच जास्तीत जास्त कल आहे. आणि त्यामुळे वैचारिक साहित्याकडेच दुर्लक्ष होण्याचा संभव-वाटत आहे." (दलित साहित्य का नको ? पान ५२) हा संभव खरा ठरला असून वैचारिक साहित्याची न्याय्य दखल ते त्यांच्या उत्स्फुर्तवृत्ती

मुळे घेऊ शकलेले नाहीत. त्यांनी मार्क्सवाद सुध्दा नीट अभ्यासून स्विकारला नाही. म्हणून उलटचा वटवाघळासारखे त्यांच्या दलित वैचारिकतेचे, आदर्शाचे वाटचालीचे क्रांतीच्या कल्पनेचे दर्शन होते. पायावर नीट उभं राहण्यापेक्षा ते डोक्यावर उभं राहून जगाचं दर्शन घेताहेत नि जग बदलण्याची मनोस्वप्न पाहताहेत. अशा हचा दलित साहित्यिकांची अभ्यास करण्याची वृत्ती चिकित्सकतेपेक्षा उत्स्फुर्ततेचीच कास धरणारी आहे. उत्स्फुर्ततेची कास धरणाऱ्या दलित साहित्यानेच सम्यक क्रांती होईल सांगणाऱ्या व केवळ साहित्यामुळे क्रांती होते हा निव्वळ भ्रम आहे असे म्हणणाऱ्या हचा दलित साहित्यिकांना व त्यांच्या पुरोगामी साथीदारांना क्रांतीचा कंड आला म्हणजे वाटेल तिथं " आपण किती अंतर चालून गेलो यापेक्षा आपण कोणत्या दिशेने चाललो आहोत हे अधिक महत्वाचे आहे. " हे लिओ टॉलस्टॉयचे वाक्य एकमेकांच्या तोंडावर फेकतांना टाळचा देत घेत वावरणाऱ्यांना कोणत्याही शक्तिची उपेक्षा ही घातक असते आणि ती कोंडून ठेवणे स्फोटक असते हे कळलेच नाही, असे आज त्यांच्या बाबत म्हणावे लागत आहे. बौध्दधम्मक्रांतीची उपेक्षा आणि दलित क्रांतीची अपेक्षा त्यांनाच घातक ठरणार आहे. बौध्दधम्मक्रांतीच्या स्फोटकतेत दलित वैचारिकता जातीधर्मव्यवस्था खाक होणार आहे. हे त्यांनी समजून घेणे त्यांच्या भल्याचे ठरणार आहे.

१५. आपल्या निवेदनात अर्जुन डांगळे दलित साहित्याच्या जनकत्वाबाबत म्हणतात, " सामाजिक क्रांती करू पाहणाऱ्या एका बंडखोराकडे दलित साहित्याचे जनकत्व जावे हाच दलित साहित्याचा लक्षणीय विशेष आहे. आणि हचाच विशेषातून दलित साहित्याच्या वैचारिकतेचे अनेक पैलू स्पष्ट होत जातात. सामाजिकता आणि विषमतेविरुध्द बंड उभारून एका नव्या जगाची निर्मिती हे दलित साहित्याचे मुख्य पैलू आहेत. " (दलित साहित्य एक अभ्यास निवेदन दोन) हचा विचारातून अर्जुन डांगळे सूचीत करताहेत की सामाजिक क्रांती करू इच्छिणारे बंडखोर म्हणजेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित साहित्याचे जनक आहेत. पण असे म्हणण्यापेक्षा

दलित साहित्यिकांचे त प्रेरणास्थान आहेत असे म्हणणे अधिक उचित होईल. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित साहित्याचे जनक नसून बौध्द साहित्याचे जनक आहेत. तर दलित साहित्यिक दलित साहित्याचे जनक आहेत आणि दलितक्रांती ही त्यांच्याच दलित वैचारिकतेची महान देण आहे. हे इथे सांगणे आवश्यक आहे. नाही तर उद्या हेच दलित व पुरोगामी साहित्यिक डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलितक्रांतीचे जनक होत असा शोध लावण्यास मागे पुढे पाहणार नाहीत.

सारा भारत बौद्धमय करून बौद्धधम्माचे महानत्व जगास पटवून द्यायचे असेल तर आंबेडकरी अनुयायांचे साहित्य हे बौद्ध साहित्यच असले पाहिजे. बौद्ध साहित्या विषयीचे साहित्यिकांच्या जबाबदारी व कर्तव्याबाबतचे विजय सोनवणे यांचे विचार विचारणीय आहेत. ते म्हणतात, "स्वातंत्र्य हा मानवाचा जन्मसिद्ध हक्क आहे असे ठासून सांगावे लागते. समता, स्वातंत्र्य आणि बंधुप्रेम (जे भारतीय संविधानाने उद्घोषित केलेले आहे) त्याची आठवण आधी द्यावी लागते. उपेक्षित शोषितांचे अश्रू पुसण्यासाठी मानवी मूल्यांची पायमल्ली थांबविण्यासाठी साहित्यिकांना मग लेखणी उचलावी लागते. ज्यांची अस्मिता जागृत झाली आहे, असे मानवतावादी लोकशाहीवादी लेखक ज्यावेळी साहित्य निर्माण करतात त्यावेळी ते दलित रहात नाहीत. ते असतात प्रबुद्ध आणि ते निर्मितात बौद्ध साहित्य" (दलित साहित्य का नको ? पान ५३) तर अस्मिता जागृत असलेल्या आंबेडकर अनुयायांनी जन्मसिद्ध हक्कांपासून व सत्ता संपत्ती प्रतिष्ठेपासून वंचित असलेल्या तमाम जनतेच्या उन्नतीस कारण ठरेल असे क्रांतीकारी बौद्ध साहित्य निर्मिती करणे आवश्यक आहे. बौद्धत्वाला गौण लेखित दलित साहित्य लिहिले जात आहे. दलित साहित्याच्या जनकत्वातून, डांगळेंच्या म्हणण्यानुसार ह्या जनकत्वाच्या विशेषातून दलित साहित्याचे अनेक पैलू स्पष्ट होत जातात व नव्या जगाच्या निर्मितीसाठी ते वापरले जातात व त्याच हेतूने पाडले जातात. ह्या पैलूंची स्वरूपं काय ? ते कशा प्रकारचे आहेत ? त्याचा परिणाम काय घडतो ? ते कशासाठी वापरले जातात ?

हे जाणून घेणे आवश्यक असून त्यातून दलित साहित्यिकांची दोलायमान वैचारिकता मानसिकता स्पष्ट होत जाते.

१६. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी साहित्यिकांना दलित वैचारिकतेचा, दलित साहित्य निर्मितीचा उपदेश केलेला नाहीय तर बौद्ध बंडखोरीचा व साहित्य निर्मितीचा सामाजिक पुनरुत्थानास समर्थ असा मार्ग दिला आहे. तो मार्ग देतांना त्या मार्गाबाबतच्या जबाबदारी विषयी निर्णायकपणे त्यांनी सांगितले आहे, "... मात्र तुमचीही जबाबदारी मोठी आहे. तुमच्याबद्दल इतर लोकांना आदर वाटेल मानसन्मान वाटेल अशी तुम्ही कृती केली पाहिजे. हा धर्म म्हणजे आपण एक गळचात मढे अडकवून घेत आहोत असे मानू नका. बौद्ध धर्माच्या दृष्टिने भारताची भूमि सध्या शून्यवत आहे. म्हणून आपण उत्तम रितीने धर्म पाळण्याचा निर्धार केला पाहिजे. नाही तर महार लोकांनी तो निंदाजनक स्थितीस आणला असे होऊ नये. म्हणून आपण दृढनिश्चय केला पाहिजे. हे आपणाला साधले तर आपण आपल्या बरोबर देशाचा, इतकेच नव्हे तर जगाचाही उद्धार करु. कारण बौद्धधर्मानेच जगाचा उद्धार होणार आहे. जगात जोपर्यंत न्याय मिळत नाही. तोपर्यंत शांतता राहणार नाही." (भाषणे खंड १ पान २५५ संपा. मा. फ. गांजरे) ह्या विवेचनातील 'महार' ह्या शब्दप्रयोगाचे भांडवल करून व बुध्दाला संताच्या मालीकेत बसवून धर्मांतरावावत काल बाह्यतेचा आरोप करणाऱ्या व खऱ्या अर्थाने वर्गवाद व जातीवाद न कळलेल्यांची पंढरपुरी पुरोगामी वैचारिकता निंद्य प्रकार होय. तर मुद्दा हा की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून प्रेरणा घेणारे तमाम दलित साहित्यिक व त्यांचे साथी त्यांनी दिलेली जबाबदारी स्विकारून वाटचाल करताहेंत काय ? तर नाही. ते दलित क्रांतीचा विचार मांडून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडवून आणलेल्या बौध्दधम्मक्रांतीस अपूर्ण समजून कालबाह्य ठरवित तिच्या विरोधास कारण ठरेल असे दलित साहित्य लिहून दलित वैचारिकता पसरवित आहेत. आणि वर अशा बेजबाबदारपूर्ण दलित साहित्याचे त्यांना जनक मानताहेत. तर बौध्द साहित्याच्या

जबाबदारी व विकास प्रवाहाबाबत विजय सोनवणे म्हणतात, "बौध्दधम्मामुळेच सामाजिक समता प्रस्थापित होईल. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बौध्दधम्माची दिक्षा सर्व अस्पृश्यांना १४ आक्टोबर १९५६ रोजी दिली. लाखो अस्पृश्य बौध्द झाले. समाज जीवनाबरोबर साहित्याने पण वाटचाल करावयास हवी जे साहित्य समाज जीवनाच्या विरुध्द दिशेने प्रवास करते ते साहित्य समाज विरोधी असते. ज्यावेळी सर्व समाज बौध्द होतो. त्यावेळी त्याचा साहित्य प्रवाह पण बौध्द साहित्याचा असावा लागतो." (दलित साहित्य का नको ? पान ९१) पण विद्रोही साहित्याच्या प्रवाहाबावत दलित साहित्यिक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून अन्याय अत्याचार विरोधीची बंडखोरी फक्त स्विकारतात पण त्यांनी दिलेली बौध्द बंडखोरी स्विकारत नाहीत. जी बौध्द जनतेने व साहित्यिकाने चिकित्सकपणे स्विकारलेली आहे. तर अशाप्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून फक्त बंडखोरी स्विकारून दलित व पुरोगामी साहित्यिक त्यांच्या साहित्यातून व्यक्त करीत असलेल्या बंडखोरीचे जागतिक क्रांतिकारी साहित्याशी नातं जोडतात. आणि त्याच क्षणी त्यांनी दिलेल्या बौध्दधम्मक्रांतीच्या जबाबदारी बाबत बेजबाबदार ठरतात. अशाप्रकारे दलित साहित्यिक आज द्विधावस्थेत सापडले असून त्यामुळेच करंटे ठरले आहेत असे ठामपणे म्हणणे भाग पडत आहे.

तर मुद्या हा आहे की, दलित साहित्याचे अनेक पैलू लक्षात घेतांना इथे हे लक्षात घेतले पाहिजे की कोणत्याही लढ्याच्या यशस्वीतेसाठी आवश्यक विचार तत्वज्ञानाची हत्याराची परिणामकारक शक्ति, तिची आधुनिकता व तिने प्रेरीत समर्थ व्यक्तिसमुह तयार करणे आवश्यक असते. ह्या आवश्यक्तेसाठी समाज प्रबोधनच्या दृष्टिने सांस्कृतिक क्रांती आवश्यक असते. ह्या आवश्यक्तेनुसार पूर्ण तयारी शिवाय लढ्याला सुरवात करणे म्हणजे अपयश स्विकारणे होय. भारतीय समाज पवित्रतनासाठी दलित साहित्यिकांनी काय स्विकारले आहे आणि ते काय अपेक्षित आहेत. आणि त्यासाठी काय करीत आहेत. ह्या प्रश्नांची उत्तरं जाणून घेण्यासाठी दलित साहित्याचे

जनक अर्थात दलित साहित्यिकांच्या दृष्टिने कोणाला मानले जाते ? त्याने काय कार्य केले ? त्यास काय अभिप्रेत होते ? हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

१७. दलिता साहित्याचे जनक कोणाला मानले जाते, याबाबत अर्जुन डांगळे म्हणतात, "दलित साहित्याचे उगमस्थान शोधायचे असेल किंवा जनकत्व द्यायचे असेल तर ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांतच शोधावे लागेल किंवा द्यावे लागेल." (दलित साहित्य एक अभ्यास निबेदन पस्तीस) तर याबाबत प्रा. यशवंत मनोहर म्हणतात, "... तेजोगर्भ दलित साहित्याला प्रत्यक्ष आणि एकमेव प्रेरणा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ऐतिहासिक क्रांतिकार्याची. त्यांच्या महनीय व्यक्तिमत्वाची. (दलित साहित्य सिद्धांत आणि स्वरुप पान ५६) यावरून स्पष्टच होते की दलित साहित्याचे जनक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मानले जाते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काय केले तर बौध्दधम्मक्रांती घडवून आणली. तिचा उद्येश काय तर समाजात सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक, पुनरुस्थान घडवून आणणे. असे असल्यामुळेच त्यांनी लोकशाहीबाबत म्हटले आहे की, "लोकशाही म्हणजे जिच्यामुळे रक्तपात न होता आर्थिक व सामाजिक क्षेत्रात बदल घडून येतात अशी पध्दत किंवा सरकार होय." (भाषणे खंड १ संपा. मा. फ गांजरे) अशा बौध्दतत्वज्ञानावर अधिष्ठित लोकशाहीची निर्मिती करणे, ती जनमानसात रूजविणे, गतिशील करणे यासाठीच त्यांनी आपल्या लाखो अनुयायांसह बौध्दधम्माचा स्विकार करून जग आणि जीवन बदलण्याची महान जबाबदारी मोठ्या विश्वासान आपल्या अनुयायांवर सोपविली.

इथे प्रश्न असा उद्भवतो की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून प्रेरणा घेणाऱ्या त्यांचे अनुयायी असलेल्या बहुतांश दलित साहित्यिकांनी ही जबाबदारी स्विकारली आहे का ? उत्तर असे की जग आणि जीवन बदलण्याची जबाबदारी त्यांनी स्विकारली आहे, पण ती स्विकारतांना बौध्दधम्मा क्रांतीचा निश्चित असा मार्ग त्यांनी स्विकारला नाही. तर मग दुसरे काय स्विकारले आहे ? त्याचा बौध्दधम्मक्रांतीवर काय आणि कसा परिणाम होतो ? ते बौध्दधम्मक्रांतीची बाजू घेते काय ? तिला न्याय देते काय ?

दलित साहित्यिकांनी जग आणि जीवन बदलण्यासाठी शोषण प्रक्रियेविरुध्द लढणारे कुठलेही तत्वज्ञान विचार स्विकारले आहे. अशा प्रकारे निश्चित नसलेले असे कोणतेही विचार तत्वज्ञान स्विकारून क्रांतीसन्मुख होत असलेला दलित साहित्यिकांचा दलितमाणूस डांगळे म्हणतात त्याप्रमाणे, "या शतकाने दलितांना अनेक शस्त्रे दिली आहेत. या शस्त्रानिशी आज दलित संघर्षात उभा आहे. आणि म्हणूनच दलित म्हणजे क्रांतिकारक समुह हा जो नवा आशय या सज्ञेला प्राप्त झाला आहे. तो समजावून घेणे अत्यावश्यक आहे. (दलित साहित्य: एक अभ्यास, निवेदन ऐकेचाळीस बेचाळीस) इथे क्रांतीकारक समुहाचा अर्थ समजावून घेण्याआधी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून प्रेरणा घेतलेल्या हया दलित साहित्यिकांचा दलित माणूस हया अनेक शस्त्रांचा वापर करतांना बौध्दधम्मक्रांतीस न्याय देणार आहे की नाही, देऊ शकेल की नाही ? त्याबाबत दलित साहित्यिकांचे धोरण काय? धोरणाचे परिणाम काय ? हे जाणून घेणे स्पष्ट करणे आवश्यक आहे. हे जाणून घेतांना आढळून येते की दलित साहित्यिकांनी समाज परिवर्तनासाठी निश्चित असे कुठलेच विचारतत्वज्ञान स्विकारलेले नाही. त्यामुळे त्यांच्या क्रांतीच्या प्रमुख घटकास म्हणजे दलित माणसास समुहास ते निश्चित असा शास्त्रीय क्रांतीमार्ग देऊ शकत नाहीत. आणि हया दलित अवस्थेत देऊ शकणार नाहीत. दलित जनतेची बाजू घेणारे विचारवंत, तत्ववेत्ते, तत्वज्ञान आणि अनेक क्रांत्या तसेच या शतकाने दिलेली अनेक शस्त्रे स्विकारून ते जें काही करण्याचा व दलितांना देण्याचा प्रयत्न करताहेत त्या त्यांच्या भाबडया प्रयत्नातून ते निश्चित असे काहीही देऊ शकणार नाहीत. आणि बौध्दधम्मक्रांतीस न्याय देतील ही कल्पनाही करवत नाही. कारण त्यांनी स्विकारलेले मार्ग आणि साधनं एवढे अनिश्चित विसंगत आणि म्हणूनच विध्वंसक नि मृगजणी स्वरूपाचे आहेत की जे त्यांच्या नादी लागतील ते त्यांच्यासारखीच दलित म्हणजे हे अन् दलित म्हणजे ते, दलित म्हणजे अमूक अन् तमूक असली पकपक करतील. कारण एकिकडे म्हणायचे की समाजपरिवर्तनाच्या घोषणा स्वागताहर्य असल्या तरी त्या कोण आणि कोणत्या व्यासपिठावरून करतो हें महत्वाचे मानायचे. सहानुभूतीदाराची फळी फळीतील

त्याची जागाही महत्वाची मानायची आणि दुसरीकडे जगातील सर्व प्रकारची मिळून होणाऱ्या दलितक्रांतीची कल्पना मांडायची. त्यासाठी जगातील सर्व तत्वेते क्रांतीकारक यांना आदर्श मानायचे नि स्विकारायचे. तसेच शोषण प्रक्रिये विरूध्द लढणारे कुठलेही विचार तत्वज्ञान स्विकारायचे. कोणते ? किती ? कसे ? काय ? असे कुठलेही तारतम्य वाळगायचे नाही. ही कशाची लक्षणं आहेत. वैचारिक दिवाळखोरीची. त्यांनी तारतम्यबुध्दी चौकसपणः सद्सद्विवेक बुध्दि जागी ठेवली असती तर दलित वैचारिकतेची, साहित्याची, मानसिकतेची, त्यांच्या ध्येयधोरणाची झाली तेवढी वाताहत झाली नसती.

१८. काय तर म्हणे या शतकाने अनेक शस्त्रे दलित मानसाच्या हाती दिली आहेत. ती त्याने धारण केली आहेत. ही शस्त्रे निश्चित कोणती हे अनिश्चित आहे. तसेच शोषण प्रक्रिये विरूध्द लढणारे कुठलेही विचार तत्वज्ञान त्यांना त्यांच्या ध्येयासाठी पुरकच आहे. असे कुठलेही विचार तत्वज्ञान स्विकारल्यानंतर निश्चित कोणते वा कोणकोणते हे मग विचारायलाच नको. क्रांती अपयशी ठरली तर ती आपल्याच मुलांना खाते. हे शहवादी चळवळीचा विचार मांडणाऱ्या दलित व पुरोगामी साहित्यिकांना माहित नाही काय ? त्यांच्या अजागळपणामुळेच दलित क्रांतीच्या चळवळीच्या गिलोटीन खाली त्यांच्या दलित उलाढालीचा ' जाऊ तिथं मार खाऊ ' असा चकनाचूर होत आहे.

दलित साहित्यिक वैचारिक अधिष्ठाना अभावी तर्कविसंगत दिशाहिन वाटचाल करीत आहेत. तर्कविसंगतीची कमाल मर्यादा त्यांनी गाठली आहे. म्हणून ' दलित म्हणजे क्रांतिकारक समुह ' हया क्रांतिकारक समुहाची कठोर दखल घेणे आवश्यक आहे. असले क्रांतिकारक समुह समाज परिवर्तनाऐवजी समाजाचे विध्वंसनच करण्यास कारण ठरतील. दलितक्रांतीचं त्यांच्या नाकातोंडात शिरलेल वारं त्यांच्या भूमिकेशी विसंगत नव्या गरजांची जाहिरात करीत उच्छवासाद्वारे बाहेर पडत आहे. हया वाऱ्याच स्वरुप अर्जुन डांगळेच्या शब्दात पुढील प्रमाणे व्यक्त होते, " केवळ साहित्यामुळे क्रांती होते

हा निव्वळ भ्रम आहे. क्रांतीसाठी क्रांतीकारी समुह असावे लागतात.'' (दलित साहित्य एक अभ्यास, निवेदन एकतीस) अशा प्रकारे हे वारे तत्वज्ञान, चळवळ, समुहाच्या गरजा जाहीर करीत बाहेर येत आहे.

१९. क्रांतीसाठी क्रांतीकारी तत्वज्ञान लागते असे म्हणणाऱ्या दलित साहित्यिकांकडे दलितक्रांतीसाठी निश्चित असे क्रांतीकारी तत्वज्ञान आहे का ? तर नाही. त्यांनी क्रांतीस कारण ठरेल असे काही नवे तत्वज्ञान मांडले आहे का ? तर नाही. दुसरे काही निश्चित असे क्रांतीकारी तत्वज्ञान त्यांनी स्विकारले आहे का ? तर नाही. मार्क्सवादसुद्धा त्यांनी अभ्यासलेला नाही. म्हणून मार्क्सवादाधावतही ते प्रामाणिक नाही. कोणत्याही क्षणी ते मार्क्सवाद गुंडाळून ठेवतील. कारण त्यांची भूमिकाच मोठी विचित्र आहे. याचा अर्थच असा की ज्यांच्याकडे निश्चित असे कोणतेच क्रांतीकारी तत्वज्ञान नाही. ते कशाच्या आधारावर नि जोरावर जनचळवळी करणार आहेत· क्रांतीकारी समूह निर्मितीसाठी क्रांतीकारी तत्वज्ञान म्हणून ते मार्क्सवादाचा स्विकार करणार असतील तर आंबेडकरीध्येयवादाच्या गतिमानतेसाठी त्यांची व त्यांच्या क्रांतीकारी तत्वज्ञानाची योग्य ती दखल घेणे प्रत्येक आंबेडकर अनुयायांचे आद्य कर्तव्य आहे. सर्वक्रांत्यांची मिळून घडणारी सर्वसमावेश सम्यक संपूर्ण क्रांती ती दलितक्रांती. ही क्रांती म्हणजे पागणपणाची लक्षणं आहेत.

'आयत्या बिळावर नागोबा' अशी दलित साहित्यिकांची स्वार्थीवृत्ती आहे. जगातील सर्व क्रांत्यांची मिळून घडेल ती दलितक्रांती असे भलते सलते निशाचर बरळत ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडवून आणलेल्या बौद्धधम्मक्रांतीचे अवमूल्यंन करीत वैचारिक व्यभिचार माजवत आहेत. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडवून आणलेली बौद्धधम्मक्रांती समजून न घेता ते दलितक्रांतीचा विचार मांडताहेत. असे करणे म्हणजे वैचारिक दिवाळखोरी नि बेजबाबदारपणा जाहिर करणयाचाच प्रकार होय.

"दलित साहित्य ही निर्मितीशील व सर्जनशील कलावंताची चळवळ-आहे." (दलित साहित्य एक अभ्यास निवेदन तीस) हे हरिश्चंद्र मुक्ति बोधांचे मत उद्धृत करून अर्जुन डांगळे म्हणतात की हया सर्जनशीलतेने सशक्त वाट चोखाळायला हवी. याचा अर्थच असा की दलित साहित्यिकांची सर्जनशीलता सशक्त वाटे शिवायच वाटचाल करीत विकसित होत आहे. पुढे ते म्हणतात, "हया चळवळीतले बळ कायम टिकवून धरायचे असेल तर पुढील काही गोष्टींचा विचार या संदर्भात व्हायला हवा. (निवेदन तीस, दलित साहित्य एक अभ्यास) खरं म्हणजे जे होतं ते बळ हरवून बसल्या-नंतर कोणतं बळ दलित चळवळीस टिकवून धरायचे आहे? असा प्रश्न उपस्थित होतो. हया प्रश्नाच उत्तर त्यांच्या दलित वैचारिकतेतून ठाम नि निश्चितपणे व्यक्त वा स्पष्ट होत नाही. इथे हे लक्षात घेतले पाहिजे की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना दलित साहित्यिक दलित साहित्याचे जनक मानतात. असे जर आहे तर त्यांनी त्यांच्या लाखो अनुयायांसह स्विकारलेले भारतीय समाजजीवन ढवळून काढणारे बौद्धधम्मक्रांतीचे बळ तेच दलित साहित्याचे व चळवळीचे बळ ठरते. हे समजून घेऊन उचित वाटचाल करणे अत्यंत आवश्यक आहे.

० ० ०

निकाय : तीन

२१. मार्क्सने तमाम श्रमहारा जनतेस "मानवजातीचा इतिहास हा वर्ग कलहाचाच इतिहास आहे." अशी जाणीव करून देत, आव्हान केले आहे की, "जगातील कामगारानो एक व्हा व बंड करा. शृंखलेशिवाय गमावण्यासाठी दुसरे काहीच तुमच्या जवळ नाही." (कम्युनिस्ट जाहिरनामा) बंडा नंतर वर्गविहिन शोषणरहित राज्यसत्ताविहिन समाजरचनेसाठी साम्यवादी तत्वज्ञानाचा जीवनमार्ग त्याने जगाला दिला आहे.

मार्क्सच्या साम्यवादी तत्वज्ञानाचा मार्ग भारतीय समाज परिवर्तनाच्या दृष्टिने असमर्थ ठरला आहे. त्याच्या वर उल्लेखित घोषवाक्यांची भारतीय समाजव्यवस्थेच्या परिवर्तनाबाबतची असमर्थता विषद करतांना डॉ. बाबासाहेब म्हणतात, "आर्थिक क्रांती घडवून आणण्यासाठी मजूरांना जागृत करण्याकरीता मार्क्स त्यांना म्हणाला की, "या क्रांतीत तुमच्या बेड्याशिवाय गमावण्यासारखे तुमच्या जवळ काहीही नाही." परंतु विभिन्न जातीमध्ये अशा चलाखीने सामाजिक व आर्थिक अधिकार वाटण्यात आले आहेत की काहींना जास्त मिळाले तर काहींना कमी. त्यामुळे मार्क्सच्या या घोषवाक्याचा जातीविरुद्ध हिंदुना भडकवून देण्याच्या कामी काहीही उपयोग होत नाही." (जातीभेद निर्मलन पान ६६ अनु. मा. फ. गांजरे) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट केलेली वस्तुस्थिती दलित व पुरोगामी साहित्यिक नाकारणार आहेत का ? वर्गव्यवस्थेवर जातीव्यवस्थेने मात केलेली आहे हे

ते नाकारणार आहेत का ? कामगारांचे लढे फक्त बोनस मागण्या आणि सबलती मिळविण्यापर्यंतच्या मर्यादित क्षेत्रात लढविले जात नाहीत का ? कामगारच कामगारांच्या विरोधी जातीय दंगली करीत एकमेकांची टाळकी सडकत नाहीत का ? कामगारांना क्रांतीसन्मुख करण्यासाठी कोणते सामाजिक अभिसरण, कोणती सांस्कृतिक चळवळ मार्क्सला अभिप्रेत क्रांती-साठी त्याच्या विचारांनी भारावलेल्या भारतीय क्रांतीवाद्यांनी मार्क्सवाद्यांनी कामगार पुढाऱ्यांनी कामगारांनी घडवून आणली वा त्यासाठी भरीव प्रयत्न चालविले आहेत ?

२२. धर्म आणि संस्कृती शिवाय समाज राहू शकत नाही. म्हणून सामाजिक परिवर्तनासाठी परिवर्तनाच्या वैचारिकतेवर धर्म आणि संस्कृती पारखून परिवर्तन घडवायचे असते. नेमक्या अशावेळी परिवर्तनाआड येणारी समाजविरोधी परंपरागत मूल्ये जपणाऱ्या फॅसिस्ट प्रवृत्ती सत्ता संपत्ती प्रतिष्ठेवर पकड ठेऊन धर्म आणि संस्कृतीस विध्वंसक बनवित असतात. आणि वेळप्रसंगी राष्ट्रविरोधी कारवायासही त्या कारण ठरतात. धर्म आणि संस्कृतीचे अतिरेकी स्तोम सामाजिक असंतोषास कारण ठरते. हे आपण वेळोवेळी अनुभवतो आहोत. सामाजिक, राजकीय, आर्थिक परिवर्तनाआड येणाऱ्या हरेक प्रवृत्तीचा नि कतृत्वाचा बौध्दधम्मक्रांतीने धिक्कार केला आहे. भारतीयांची सामाजिक मानसिकता जाणून जाती व्यवस्थेच्या विध्वंसना-शिवाय कसलेही परिवर्तन भारतीय समाज व्यवस्थेमध्ये अशक्य आहे. हे ओळखून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाती विध्वंसनासाठी पुरक व मानव जातीचा उध्दार करण्यास समर्थ असलेल्या बुध्द मार्गाचा आपल्या लाखो अनुयायांसह स्विकार करून बुध्द मार्गाची आवश्यकता अपरिहार्यता नि महत्व विषद केले आहे. जग आणि जीवन बदलणारा गतिमान, समता, स्वातंत्र्य, बंधुतेचा पुरस्कार करणारा बौध्दधम्माचा क्रांतीकारी जीवनमार्ग दलित साहित्यिक व त्यांचे साथीदार अंगिकारणार आहेत का ?

२३. मार्क्सवादाने साम्यवादी समाज रचनेसाठी शोषितांना शोषकांच्या म्हणजेच कामगारांना भांडवलदारांच्या पुंजीशहांच्या जमिनदारांच्या विरुध्द

जा गे करीत वर्गकलहाच्या अनिवार्य आवश्यकतेची जाणीव करून देत संघर्षशील होण्यास प्रवृत्त केले. त्याच्या विचार तत्वज्ञानाबाबत एक होत वाटचाल करीत त्याला अभिप्रेत क्रांतीसाठी बंडे करीत विजयामागून विजय मिळवत त्याचे अनुयायी अर्ध्या जगावर हुकूमशाही पद्धतीचे शासन करू लागले. ह्या प्रत्येक विजयाने कामगाराजवळ शृंखलाशिवाय असलेला मानवी मूल्यांचा मूलभूत हक्कांचा अमूल्य ठेवा जो गमावण्यासाठी नसतो तो हिरावून घेतला आणि कामगारांच्या सत्तेने कामगारांना स्वातंत्र्याशिवाय गरजेप्रमाणे आवश्यक असलेले भौतिक सुखसमृध्दी देणाचा प्रयत्न केला आणि चालविलेला आहे. असा प्रयत्न करतांना व्यक्ति स्वातंत्र्याला गौणत्व देणाऱ्या मार्क्सवादी वैचारिकतेचे विवेचन करीत तर्कतिर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात, " कार्ल मार्क्स इतिहासाचे तत्त्वज्ञान सांगत असतांना व्यक्तिचे स्वतंत्र अस्तित्व मान्य करीत नाही. व्यक्ती समाजाचा अवयव होय. समाज संस्थेचा अंश होय असे तो समजतो. कारण व्यक्तिची सर्व जाणीव सामाजिक स्वरुपाची आहे. असे तो म्हणतो. " (लेखसंग्रह पान २७ भाग १ संपा. मधुकाका) मार्क्सवादी देशांच्या इतिहासातून हेच अनुभवास आले आहे. प्रत्येकाच्या स्वायत्त विकासावर शासनाचे नियंत्रण प्रस्थापित करून सर्वांच्या विकासाला शासनांकित केले, करण्यासाठी अघोरी मार्ग अनुसरले आणि हे सारे पाहून बिगर साम्यवादी जग हादरून गेले. साम्यवादाकडे टाकलेले पाऊल गुलामगिरीकडची वाटचाल ठरते हे मार्क्सवाद्यांनी स्वकर्तृत्वाने दाखवून मार्क्सवादाची मर्यादा जगास जाहिर केली. अंतकरणाचे अग्निकुंड झालेल्या दलित साहित्यिकांनी हे विचाराधिन घेतल्यास त्यांच्या अराजकतेच्या मार्गांची त्यांना जाणीव होईल. त्यांच्या दलित क्रांतीची दुर्दशा होण्याआधीच ते सुनिश्चित असा बौद्धधम्मक्रांतीचा मार्ग स्विकारून जन्मापासून विजय मिळवत अर्ध्या जगभर पसरलेल्या व शासन करू लागलेल्या मार्क्सवादापासून सावध राहतील तरच ते सम्यक पारिवर्तनाबाबत निश्चित असे काही करू शकतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची विचारधारा त्यांनी विशेष अभ्यास करून अंतर्मुख होणे आवश्यक आहे. बौद्धधम्मक्रांतीचा मार्ग त्यांनी पारखून घ्यावा. साम्यवादापासून सावध राहण्याचा इशारा देतांना बुद्ध तत्वज्ञानाच्या

गतिशीलता व सामर्थ्याबा बत त्यांनी दुर्दम्य विश्वास व्यक्त करीत ठामपणे सांगितले आहे की, "साम्यवादाच्या विजय दुदुंभिने तुम्ही बावरून जाऊ नका किंवा भूलून जाऊ नका किंवा दिपून जाऊ नका. तुम्ही जर बौद्ध विचार-सरणीचा व तत्वज्ञानाचा एक दशांश भाग जरी आत्मसात करू शकलात तर साम्यवाद जे काही निर्माण करू इच्छितो ते तुम्ही सुद्धा करूणा, न्याय व सद्भावना यांच्या जोरावर घडवून आणू शकाल यात तिळमात्र शंका नाही'.' (बुद्ध मावर्स आणि धम्माचे भवितव्य पान ४४ अनु. रत्नमित्रा गणवीर) बुद्ध तत्वज्ञानाच्या सखोल अभ्यासाच चिंतनाच प्रतिबिंब हया त्यांच्या विचारातून दृगोचर होत आहे. त्यांना समाज परिवर्तनासाठी बुद्ध तत्व-ज्ञानाच्या समर्थते विषयी तिळमात्र शंका नव्हती. म्हणूनच बौद्धधर्मा-विषयीच्या शांसकतेचे निरसन करून त्यांनी त्याचे गतिशीलत्व जगास दाखवून आणि पटवून दिले आहे. ज्यांना ते पटले त्यांनी ते स्विकारले आणि आचरणात आणले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून प्रेरणा घेऊनही त्यांनी दिलेला मार्ग जर दलित साहित्यिक स्विकारणार नसतील तर आंबेडकरांपासून प्रेरणा घेण्याला काही अर्थ आहे का ? दलित साहित्यिकांनी आंबेडकरी ध्येय वाद म्हणजेच बौद्धधम्म चिकित्सकपणे अभ्यासणे आवश्यक आहे. अभ्यास न करता ते भव्यदिव्य विचार मांडत असतात. म्हणून ते अर्ध्या हळकुंडान पिवळे झालेले आहेत असे म्हणावे लागत आहे. आणि त्यांच्या अशा हया प्रवृत्तीमुळे त्यांनी अनुसरलेला साम्यवादाचा व दलित क्रांतीचा मार्ग आंबेड-करी ध्येयवादास विधातक ठरल्याशिवाय राहणार नाही. बुद्धाचा माग सुरक्षित भरभक्कम आणि सर्वोत्तम आहे. हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विश्वास आहे. हया विश्वासामुळेच त्यांनी ठामपणे सांगितले आहे की, भारताला जगात मानाने जगावयाचे असल्यास बुद्धधर्माचाच अंगीकार करावा लागेल आणि जगाला बुद्धधर्माचीच कास धरावी लागेल, हे त्यांनी व्यक्त केलेले दूरदृष्टीपूर्ण जीवनभाष्य दलित साहित्यिक व त्यांचे पंढरपुरी साथीदार आणि तमाम भारतीय जनता समजून घेणार आहे की नाही?

बुद्धधर्माचा स्विकार म्हणजे मार्क्सवादाला विरोध नव्हे काय ? हे समजून न घेतल्यामुळे आंबेडकरांपासून प्रेरणा घेऊनही त्यांनी दिलेला मार्ग न स्विकारता मार्क्सवाद स्विकारून ते मांडत असलेली दिशाहीन दलित वैचारिकता म्हणूनच वैचारिक गोंधळास कारण ठरली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला बौद्धधम्माचा मार्गच जर ते समजू शकलेले नाहीत तर त्यांच्याकडून नैतिक नेतृत्वाची अपेक्षा ती काय बाळगायची. नैतिक व वैचारिक नेतृत्व देण्यास त्यांचे दलित साहित्य चळवळ नि त्यांची कृतिशीलता असमर्थ ठरली असून आंबेडकरी ध्येयवाद बदनाम करण्यास ते कारणीभूत झाले आहेत, होत आहेत. ते व त्यांचे साथी डॉ. बाबासाहेब आंबेडकर, बुद्ध, कबीर, फुलेवावत विचार न करता वाटेल तसे बोलत आहेत. समाजकार्याच्या व प्रबोधनाच्या नावानं जी घाण दलित साहित्यिकांनी व त्यांच्या पंढरपुरी पुरोगामी चळवळीवाल्यांनी केली आहे ती बौद्धीक हल्ले चढवून धुवून काढल्याशिवाय आणि बौद्धधम्मक्रांती मार्गातील अडसर दूर केल्याशिवाय आंबेडकरी समाज राहणार नाही. हे त्यांनी समजून घ्यावे.

२५. आंबेडकर अनुयायांनी दलित क्रांतीवाले बाबुराव बागूल बौद्धधम्माविरुद्ध करीत असलेला तर्कविसंगत प्रचार विचाराधीन घ्यावा, अंतर्मुख व्हावे आणि अशांच्या आंबेडकरद्रोही दलित विद्रोहास सुरुंग लावावा. लावणे आवश्यक आहे. ते म्हणतात, "बुध्दानं दुःख देणारा दाखविला नाही.. दुःख देणारा कार्ल मार्क्सने दाखविला... पिळवणूकीवर आधारलेला समाज, अर्थव्यवस्था मार्क्सने दाखविली..... इथं बुध्द आणि मार्क्स यांच्यात फरक आहे." (दलित साहित्य आजचे क्रांतिविज्ञान पान १६७) त्यांच्या हचा विधानांतून सूचित होते की ज्या बुध्दानं दुःख देणारा दाखविला नाही, त्या बुध्दाचा मार्ग अनुसरणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे लाखो अनुयायी हे मार्ग चुकलेले आहेत. याचाच अर्थ असा की बौद्ध तत्वज्ञान मार्क्सवादाला उत्तर होऊ शकत नाही, वा पर्यायी ठरू शकत नाही. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मार्क्सवाद नाकारलेला आहे, तो

नाकारलेला आहे म्हणूनच त्यांनी बौध्दधम्म स्विकारलेला आहे आणि स्विकारतांना मार्क्सवाद्यांना बौध्दधर्माचा अभ्यास करा म्हणजे बुद्ध की मार्क्स यापैकी कोण योग्य आणि न्याय्य आहे हे त्यांना समजू शकेल हेच सुनावलेले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सुखी समृध्द मानवी जीवनासाठी जे नाकारलेले आहे ते आंबेडकर अनुयायांनी नाकारलेले आहे. आणि त्यांनी जे स्विकारलेले आहे तेच त्यांच्या अनुयायांनी स्विकारलेले आहे. आंबेडकरांपासून प्रेरणा घेऊन त्यांनी मार्क्सवाद नाकारत बौध्दधम्मक्रांती मार्गच स्विकारलेला आहे. बाबुराव बागूलांसारख्या दलित साहित्यिकांप्रमाणे ते आंबेडकरांपासून प्रेरणा घेऊन मार्क्सवादाकडे वाहवत गेलेले नाहीत. उलट बाबुराव बागूलांच्या विचारातून सूचीत होते की ज्याने म्हणजेच बुध्दाने दुःख देणाराच दाखविला नाही. म्हणून तो आजच्या दुःखपूर्ण समस्यास कारण ठरणाऱ्या परिस्थितीवर इलाज ठरू शकत नाही. आजच्या समस्या सोडविण्यास असमर्थ आहे. म्हणजेच बुध्दमार्ग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे क्रांतीकारी विचार जग आणि जीवन अर्थात समाज परिवर्तनास असमर्थ असल्याचेच बाबुराव बागूलांसारखे मानतात आणि मार्क्सवाद स्विकारुन त्याला अर्थात मार्क्सला अभिप्रेत आर्थिक क्रांती प्रस्थापित करु बघतात. त्यासाठी दुःख देणाऱ्या पिळवणूकीवर आधारलेला समाज अर्थव्यवस्था दाखविणाऱ्या मार्क्सच्या साम्यवादी विचार तत्वज्ञानाचा ते पुरस्कार करतात. कारण ध्येयवादी डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे क्रांतीकारी तत्वज्ञान चिकित्सकपणे त्यांनी अभ्यासलेले नाहीय. म्हणूनच ते " डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्क्सच्या विरोधात होते का ?" ह्या प्रकाश खरात आणि किरण तांबे यांच्या प्रश्नाला उडवाउडवीचे उत्तर देतांना म्हणतात की, " बाबासाहेब मार्क्स-विरोधी नव्हते. ते एक हिंदुवर्ण व विचार व्यवस्थेच्या विरोधात होते. ते मार्क्सच्या विरोधात फारसे बोलले नाहीत. मात्र ते हिंदी कम्युनिस्टांच्या विरोधात दोन चारदा बोलले आहेत." (दलित साहित्य आजचे क्रांतीविज्ञान पान १६७) असे मानून मार्क्सवादाचा ते स्विकार करतात आणि आंबेडकरी प्रेरणेचे त्यांच्या सम्यक दलित क्रांतीच्या अंतीम ध्येयप्राप्तीसाठी गुणगाण गातात. म्हणजे ते एकाच वेळी

मार्क्ससह आंबेडकरही स्विकारतात. त्यातही आंबेडकरांपेक्षा मार्क्स त्यांन अधिक जवळचा वाटतो. कारण बाबुराव बागूल यांच्या म्हणण्यानुसार दुःख देणारा न दाखविणाऱ्या बुद्धाचा मार्ग आंबेडकरांनी स्विकारलेला असून त्यास गुरु मानलेले आहे. तर मार्क्सने प्रत्यक्ष बाबुराव बागूल सारख्या दलित साहित्यिकांना दुःख देणाराच दाखविला आहे. म्हणून मार्क्सला अभिप्रेत समाजव्यवथा प्रस्थापित करणे हे त्यांचे ध्येय झाले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित राज्यसमाजवादाचे बुद्धाच्या विचार तत्वज्ञानावर अधिष्ठित समाज व्यवस्थेचे लोकशाही शासनाचे ध्येयाशी त्यांना काही घेणे नाही. साक्षात अर्ध्या जगानं साम्यवाद स्विकारला असतांना बाबुराव बागूलांसारखे दलित साहित्यिक व त्यांचे पंढरपुरी पुरोगामी साथीदार साम्यवाद स्विकारणार नाहीत तर काय स्विकारतील ? अशा हया दिशादिन लोकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडवून आणलेली बौद्धधम्मक्रांती समजून न घेतल्यास नवल ते काय ?

२६. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जग आणि जीवन बदलण्यासाठी धर्माचे आणि धर्मांतराचे महत्व आणि सामर्थ्य पटवून देतांना स्पष्टपणे बजावले आहे की, " भारतातील अस्पृश्यांनी बौद्धधर्म स्विकारल्यावर बर्मा, चीन, जपान, लंका आदी सर्व बौद्ध देशांची सहानुभूती आमच्या करूण दशेवर होईल व नेहमी करीता हिंदूधर्माच्या जाचातून मुक्त होऊ शकू. वरील देशांनी आमच्यावर होणाऱ्या अन्यायाविरूद्ध का आवाज उठविला नाही याचे कारण म्हणजे त्यांचा समाज होता की हिंदुचे घरगुती भांडण आहे. जर बौद्धधर्म स्विकार केल्यानंतरही हिंदु लोक आम्हाला समता, स्वतंत्रता आणि बंधुत्वापासून दूर ठेवतील तर आम्ही वरील बौद्ध राष्ट्रांच्या सहयोगाने ते मिळविल्याशिवाय राहणार नाही." " (भाषणे खंड १ पान २८७ संपा. मा. फ. गांजरे) हया विवेचनातून धर्मांतराचे महत्व, समता, स्वातंत्र्य, बंधुतेसाठी त्याची अपरिहार्यता आणि बौद्धांची व बौद्धराष्ट्रांची जबाबदारी व्यक्त करून बौद्धधर्माचे जीवनव्यापी स्वरूप त्यांनी आपल्या

अनुयायांसमोर स्पष्ट स्वरुपात मांडले आहे. त्याचे महत्व आणि महानत्व आजही आणि पुढेही त्यांनी सांगितल्याप्रमाणे राहणार आहे.

सतत आयुष्यभर त्यांनी धर्माध्ययनही केले. धर्मांची मानवी जीवनाच्या उज्वल भवितव्यासाठी असलेली आवश्यक्ता जाणली आणि १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे दिक्षाभूमीवर लाखो अनुयायांसह बौद्धधम्म स्विकारुन बौद्धधम्मक्रांती घडवून आणली. हे परिवर्तन समजून न घेता बुद्ध, कबीर, फुले, आंबेडकर यांच्यावर दलित साहित्यिक व त्यांचे मिस्टर पं. पू. साथीदार करीत असलेले अपमानास्पद आरोप त्यांनी ताबडतोब थांबविणे आवश्यक आहे.

० ० ०

निकाय : चार

२७. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून प्रेरणा घेऊन दलित साहित्यिक व त्यांचे पुरोगामी साथीदार मार्क्सवादाबाबत बाता मारत जनतेस वाटेल तशा थापा मारीत आहेत. मार्क्सवादाच्या प्रस्थापनेसाठी कोणताही विचारवंत कोणतेही तत्वज्ञान त्यांनी स्विकारलेल्या भूमिकेनुसार वाटेल तसे ते वापरु इच्छितात. तसे करतांना त्यांना तारतम्य विचारबुद्धी बाळगण्याची जराही आवश्यक्ता भासत नसून आपल्या हातून काही चूक घडत आहे असेही त्यांना वाटत नाही. त्यांच्या दलित क्रांतीच्या ध्येयासाठी बिनदिक्कतपणे ते वाटचाल करतात. बाबुराव बागूल व त्यांच्या तथाकथित दलित साहित्यिकांची व पंढरपुरी पुरोगाम्यांची वाटचाल उत्स्फुर्तपणे सुरु आहे.

जगातल्या सर्व क्रांत्या पाहून त्यांना दलित क्रांतीची स्वप्न पडू लागली आहेत. त्यांच्या हचा मार्क्सवादी दलित क्रांतीपुढं डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मोठ्या कष्टान महत प्रयासान सारसर्वस्व पणाला लावून घडवून आणलेली बौद्धधम्मक्रांती त्यांना कं पदार्थ वाटते आहे. त्यांच्या दलित वैचारिकतेचे क्रांतीचे अंतीम ध्येय मार्क्सला अभिप्रेत आर्थिक क्रांती प्रस्थापित करणे हे असून त्यासाठी ते जगातील सर्व विचारवंत व क्रांतीकारकां बरोबर आंबेडकर, बुद्ध, कबीर, फुले यांचा बिनदिक्कतपणे वाटेल तसा उपयोग करीत आहेत. असे करतांना आपण कुणाचा अपमान करीत आहोत. असे त्यांना वाटत नाही. ते कुणाची पर्वा करण्याच्या मनस्थितीत नाहीत. पण

दलित क्रांती झालीच पाहिजे असे ठरवून ते वैचारिक वाटचाल करताहेत. ह्या क्रांतीच वारं उद्योन्मुख साहित्यिकांच्या नाकातोंडात शिरलं आहे व शिरत आहे. तर असे हे साहित्यिक अंतीम उद्दिष्टाच्या साध्यतेसाठी भूकेची-भाषा ही क्रांतीची भाषा ठरवून भूकेलेल्या पोटात वास करीत असलेल्या क्रांतीला जगातील सर्व विचारवंतांच्या क्रांतीकारकांच्या सहाय्याने मैदानात खेचण्याच्या तयारीला लागले आहेत. यशवंत मनोहर हे त्यापैकी एक. त्यांच्या उत्थानगुंफात बाबुराव बागूल नेहमीच्या उत्स्फुर्तपणे म्हणतात. " कार्ल मार्क्सला जे शोषण दिसले, त्याची कारण परंपरा जाणवली, अगदी तेच ज्ञान यशवंत मनोहर यांच्या कवितेला झाले. आणि म्हणून त्यांची कविता क्रांतीसारखी भव्योदात्त झाली आहे." (उत्थानगुंफा पान ४) आता असे झाल्यावर बाबुराव बागूलांनी नेमके तेच ज्ञान जे कार्ल मार्क्सला झाले ते यशवंत मनोहर यांना झाल्याचे सांगितल्यावर त्यांची क्रांती-सारखी भव्योदात्त कविता दलितक्रांतीच्या बाजूनं उभी राहिल्यास नवल ते काय ? धन्य ते बाबुराव बागूल जे कार्ल मार्क्सला झालेले ज्ञान अगदी तेच ज्ञान यशवंत मनोहरांना झाले असे म्हणतात आणि धन्य ते यशवंत मनोहर जे हे ख्याली खुशालीत मान्य करतात. असे करून ते आपल्या अकलेचे तारे तोडत दलित शद्वाबद्दल भाष्य करण्यास सरसावतात आणि दलित भाष्यकार म्हणून स्वतःला रोशन करतात. दलित चळवळीचा नि शद्वाचा ह्या तथा-कथितांच्या नादी लागलेल्या लोकांनी पार विचका करून टाकला आहे. तर दलितांची दुनिया बदलण्यासाठी निघतांना त्यांनी जाहिर केले आहे की, " शोषितांची जात शोषित. शोषणाच्या सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इत्यादी सर्व प्रकारांनी काळोखलेले शोषितांचे सर्वच नातेवाईक घटक हे दलित होत. " (दलित साहित्य सिद्धांत स्वरुप पान ३) मनोहरांच्या दलित म्हणजेच शोषित ह्या व्याख्येतून त्यांची वैश्विकता सुज्ञास नक्कीच दिसून येईल आणि कहा राजभोज कहा गंगुतेली अशी म्हणही आठवेल. निदान मला तरी ती आठविली. कारण ध्येय जग आणि जीवन बदलण्याचं. प्रेरणा आंबेडकरांपासून घ्यायची आणि मार्ग मार्क्सचा स्विकारायचा. क्रांती कम्युनिस्टांना जी अभिप्रेत ती घडवायची. तिला दलित क्रांती म्हणायचे. मग

ओघानेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडवून आणलेल्या बौद्धधम्मक्रांतीस विरोध करायचा. अशी हया दलित साहित्यिकांची नि त्यांच्या मिस्टर पं. पु. साथींची वैचारिकता आणि कृतिशिलता आहे. दलित शब्दाच्या साहित्याच्या, विचाराच्या, जाणीवेच्या, मानसिकतेच्या क्रांतीच्या बाबत हे दलित साहित्यिक सातत्याने विवेचन करीत असतात. त्यातून ते आंबेडकरद्रोहच साधत आहेत. हे सारे दलित दृष्टिकोनातून वैचारिकतेतून करीत आहेत म्हणून 'सारच मुसळ केरात' अशी त्यांच्या दलित उलाढालीची अवस्था झालेली आहे.

२८. 'शोषितांची जात शोषित' असे विचार मांडून यशवंत मनोहर अठरापगड जातींच्या रगाडयात आणखी एका जातीची भर घालून काय साध्य करीत आहेत. त्यांचे हे शब्द प्रयोग वाचून कलावाद्यांची खिल्ली उडविणाऱ्या अॅड. दत्ता कट्टींचे खिलाडी शब्दप्रयोग येथे आठवतात. त्यांनी म्हटले आहे की, " कलेसाठी कला आहे असे मानने भाकरीसाठी भाकरी आहे, छत्रीसाठी छत्री आहे, घरासाठी घर आहे, असे मानण्या इतपत वेडगळपणाचे आहे. साहित्यिकांच्या शिरावर असलेली एक महान जबाबदारी टाळण्यासाठी करण्यात येणारा तो दांभिक युक्तिवाद आहे. (डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेरणेचे साहित्य पान ७४) अॅड. दत्ता कट्टींनी कलावाद्यांच्या पलायनवादावर अचूक मारा केला आहे. कलावाद्यांनी भोगवादी रंजनप्रधान बुद्धिभेद करणारे साहित्य लिहून काय दिवे लावले आहेत हे जग जाहीर आहे. आणि त्यांचा मिस्टर पं. पु. जीवनवादही समाज प्रबोधनाबाबत वांझ ठरला आहे.

पण दलित साहित्यिक, 'दलित हा दलितांचा मार्ग आहे.' जो नवे जग निर्माण करण्यास झटतो तो दलित, दलित ही जागतिक जाणीव आहे, दलित शब्दाची व्याख्या केवळ बौद्ध अथवा मागासवर्गीयच नव्हे तर जे जे पिळले गेलेले श्रमजीवी आहेत ते सर्व दलित. असे दलित शब्दाचे व्यापकपण वाढवित वाटेल तसे तर्कविसंगत विचार मांडण्यात एकमेकांची री ओढण्यात आज ते आघाडीवर आहेत. त्यांच्या दलित दृष्टिकोनानुसार बौद्धधम्मक्रांती घडविणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर बौद्ध

होऊन सुद्धा दलित ठरतात. कारण हे दलित साहित्यिक म्हणतात की जो नवे जग निर्माण करण्यास झटतो तो दलित. म्हणजे बौद्ध झालेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांचे अनुयायी सुद्धा दलित. दलित हया शब्दाची हया लोकांना एवढी भुरळ पडली आहे की या शब्दाचे त्यांनी अवास्तव स्तोम माजविले आहे. आणि प्राध्यापक झालेल्या यशवंत मनोहर व रा. ग. जाधव हया मनुष्यप्राण्यांनी वैचारिक संभोगातून दलित हा शब्दच गर्भार ठेवून साहित्य समिक्षेत वैचारिक व्यभिचार माजवला आहे.

दलित हया शब्दाचे हे असे उदात्तीकरण आंबेडकरी चळवळीच्या गतिरोधास कारण ठरत आहे. बौद्ध हे आर्थिक दृष्टिने पिळले गेलेले असले तरी ते दलित नाहीत तर बौद्ध आहेत. बौद्धांना आर्थिक मागासलेपणासाठी स्वतःस दलित म्हणवून घेणे पसंत नाही. तर दलित म्हणून लाचारीच्या जिण्याशी त्यांची नफरत आहे. ही नफरत बौद्ध समिक्षक भाऊसाहेब अडसूळ सडेतोडपणे व्यक्त करताना म्हणतात, " दलित व हरिजन हे शब्द नाहीत. हे आंबेडकरी तत्वज्ञानाला नामोहरण करणारे गळफास आहेत. जीवंतपणाची कठोर शिक्षा आहे." (डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेरणेचे साहित्य पान २७) दलितपणाचे नि शब्दाचे हे कठोर परिशीलन समजून न घेता दलित साहित्यिक दलितपणाचे भांडवल करीत आहेत.

२९. दलित ही जागतिक जाणीव आहे असे म्हणून ते दलित जाणीवेत वाहवून गेले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या आदेशानुसार लाखो दलितांनी बौद्धधर्म स्विकारला आणि दलितांच्या पुनरुत्थानाचा मार्ग म्हणून ते बौद्धधम्मानुसार संघर्षशील वाटचाल करीत आहेत. पण हे जाणून न घेता दलित व पंढरपुरी पुरोगामी साहित्यिक बौद्धधम्मक्रांतीची गतिशील वाटचाल रोखू पहाताहेत दलित हा दलितांचा मार्ग आहे, असे म्हणत दलित वैचारिकता मांडून ते बौद्धधम्मक्रांतीस विरोध करू पहाताहेत ही करंटेपणाची नि वैचारिक दारिद्र्याची लक्षणं आहेत. त्यांनी दलिततत्व टाकून बौद्धत्व स्विकारणेच योग्य आणि उचित ठरणार आहे. पण असे न

करता ते डॉ. आंबेडकरांपासून प्रेरणा घेऊन बौद्धधम्मक्रांती न स्विकारता जगभरचे विचारवंत स्विकारून 'दलित ही जागतिक जाणीव आहे.' असे म्हणत आंबेडकरी आंदोलन व बौद्धधम्मक्रांतीच्या मार्गात अडथळे निर्माण करीत आहेत असेच म्हणावे लागत आहे आणि हेच लोक दलित-पणाचे उदात्तिकरण करीत बौद्धांना दलित ठरवून बौद्धधम्मक्रांती बाबत वैचारिक गोंधळ निर्माण करीत आहेत. कारण त्यांनी बौद्धधम्मक्रांतीची महत्ता ओळखलेली नाहीय. म्हणूनच ते कायद्याने क्रांती होत नसते अशी वैचारिकता मांडून कम्युनिष्टप्रणीत म्हाताराही चढेल तरणाही चढेल जो जो उठेल तो चढेल क्रांतीची पायरी अशा प्रकारची चढेल दलितक्रांती घडवून आणण्याच्या मागे लागले आहेत. आणि दुःख ही गुलामगिरीची कल्पना होय असे म्हणू बरळू लागले आहेत आणि तसे ते का म्हणत आहेत, कारण मार्क्सने पिळवणूक हया शब्दापासून आपले विचारतत्वज्ञान मांडले. तर बुद्धाने दुःख हे जीवन व्यापून आहे हे जाणून दुःखापासून जगास तारणाऱ्या धम्मतत्वज्ञानाच्या प्रचारासाठी जगात दाहीदिशांना संचार करण्यास सांगितले.

३०. बुद्ध मार्क्सला उत्तर देऊ शकतो हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सिद्ध करून बुद्धमार्गाची सुनिश्चित परिपुर्णता मानव जातीच्या संवर्धनास आवश्यक असलेली समर्थता पटवून दिली आहे. पण दलित साहित्यकांनी व त्यांच्या साथीदारांनी हे समजून घेतलेले नाहीय. म्हणूनच ते दलित हा दलितांचा मार्ग आहे किंवा जो नवे जग निर्माण करण्यास झटतो तो दलित असे दलित शब्दाचे जे व्यापकार्थी विवेचन ते करीत आहेत, त्या विवेचनाप्रमाणे वेश्या व्यवसाय हा वेश्यांचा मार्ग आहे वा एखाद्या वेश्येने वेश्या व्यवसायातून बाहेर पडून नवजीवन सुरू केले तरी वेश्याच असे म्हणावे लागेल. कारण नवं जग निर्माण करणाराही दलित साहित्यिकांच्या वैचारिकतेनुसार दलित ठरतो. म्हणजे एखाद्या वेश्येने, मुसलमानाने, ख्रिश्चनाने, हिंदुने बौद्धधम्म स्विकारला तरी त्यांना हे दलित साहित्यिक व त्यांचे सांथी बौद्धधर्मीय न मानता दलितच मानणार, असे मानतांना ते

वैचारिक गोंधळास बळी पडलेले असतात, कारण "बौद्ध समाजाला नव-बौद्ध किंवा नवदिक्षित बौद्ध या नावाने संबोधने योग्य नाही. विशेषतः वृत्तपत्रातून या बाबीकडे कटाक्षाणे लक्ष देण्यात यावे." (डॉ. आंबेडकर प्रेरणेचे साहित्य पान २ संपा. भाऊसाहेब अडसूळ) हा भदंत आनंद कौशल्यायन यांनी दिलेला मोलाचा इशारा त्यांनी समजून घेतलेला नाहीय. म्हणून ते बौद्धांना चक्क दलित ठरवून १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडवून आणलेल्या बौद्धधम्मक्रांतीस दलित क्रांतीचे ग्रहण लावीत आहेत.

३१. वचारीक गोंधळास कारण ठरलेल्या दलित शब्दावर आघात करून प्रबोधनाची आदर्श प्रेरणा असलेल्या बौद्धत्वाचे महत्व स्पष्ट करतांना भाऊसाहेब अडसूळ म्हणतात, "शब्द आणि साहित्य या दोन्ही अर्थाने कवडीमोल ठरलेल्या या दलित शब्दावर आंबेडकरीबाण्याचा स्वाभिमानी माणूस धिक्कार करील. ज्यांनी हा शब्द आमच्यावर लादला त्यांना तो १९५६ साली परत केला आहे. आता आम्ही दलित नाही बौद्ध आहोत. बौद्ध म्हणवून घेण्यात आम्हाला स्वाभिमान वाटतो. स्वतंत्रतेचा आनंद होतो. अंधारातून प्रकाशाकडे जाणारी ही क्रिया भारताचे कल्याण करणारी आहे, यात तिळमात्र शंका नाही . (दलित साहित्य का नको ? पान ३०) पण हे लक्षात न घेता बौद्धधम्म विरोधकांच्या गोटात दलित साहित्यिक सामील होऊन विरोधकांच्या विरोधाला चालणा देण्यास कारण ठरले आहेत. आणि बौद्धधम्मक्रांतीस ते दलित ठरवू पहात आहेत व याबाबत तर्कवितर्क करण्यात ते आणि त्यांचे साथी आघाडीवर आहेत. म्हणूनच ते आंबेडकरांपासून प्रेरणा घेतल्याचे सांगूनही बौद्धधम्मक्रांतीच्या यशस्वीतेची त्यांच्यावर असलेली महान जबाबदारी पार पाडण्याबाबत बेजबाबदार पणेच वाटचाल करीत दलित क्रांतीचा दळभद्री भिकार युक्तिवाद मांडत आहेत. दलित म्हणजे हे, दलित म्हणजे ते, दलित म्हणजे अमुक अन् दलित म्हणजे तमुक तसेच शोषित ही शोषितांची जात आहे. असे वाटेल तसे बडबडत जगात स्वतःचे हसे करून घेत आंबेडकरी ध्येयवादास बदनाम करीत आहेत.

३२. - दलित जनतेची बाजू घेणारे जगातील तमाम महापुरुष स्विकारणाऱ्या लोकांची दलित जनतेच्या पुनरुत्थाना विषयीची आच आणि तहान याबाबत उत्थानगुंफाच्या प्रस्तावनेत " हा महापुरुष सोडून त्या महापुरुषाला शरण जाणाऱ्या मंडळीना लागलेली स्वातंत्र्याची आच व तहान कितीशी समृद्ध मानावी ? याचीच मला शंका आहे." (पान ११) अशी वास्तव शंका घेऊन शालूतून न हाणता उघड उघड हाणल्याबद्दल नरहर कुरुंदकरांसारख्या पंढरपुरी पुरोगाम्यालाही मरणोत्तर धन्यवाद द्यावे लागत आहेत. पण प्राध्यापक असलेल्या यशवंत मनोहरांसारख्या दलित साहित्यिकांच्या डोक्यात हचा शंकेनेही उजेड पडत नाहीय. ही अशा हचा दलित मनुष्यप्राण्यांची शोकांतिका आहे.

० ० ०



३३. आंबेडकरी बौद्ध चळवळ दलित करून टाकण्याचा चंग बांधलेल्या ह्या लोकांच्या बुद्धिची किव करावी तेव्हढी थोडीच आहे. त्यांची वाटचाल नेमकी उलटी सुरू आहे. आंबेडकरांपासून प्रेरणा घेतल्यानंतर बुद्धाकडे जायचे तर ते बुद्धावर नि मानवतेवर अन्याय करणाऱ्या हिंदुत्वाने दिलेले दलितपण स्विकारून त्याच हिंदु परिघात वावरत साम्यवादाची कास धरीत आहेत. बौद्धांची चळवळ दलित करीत परत दलित चळवळीच्या व्यापकतेची काळजी वाहताहेत. प्रश्न असा निर्माण होतो की बौद्धांची चळवळ ही दलित आहे का ? तर नाही. दलितांच्या पुनरुत्थानासाठी लढे उभारून त्यासाठी क्रियाशील असणे हे बौद्धांचं त्यांच्या चळवळीच आद्य कर्तव्य आहे. ह्या कर्तव्यातून बौद्धधम्माच व्यापकपण प्रकर्षान समाजासमोर सातत्याने येणे आणि आणणे आवश्यक आहे. त्यासाठी आंबेडकर अनुयायांच्या दलित संघटनांची वाटचाल बौद्धत्वाकडे होणे आवश्यक आहे. कारण हे दलितपण दलित साहित्य, वैचारिकता, मानसिकता नि दिशाहिन दलित चळवळीच्या माध्यमातून आंबेडकरी चळवळीच्या आड येत आहे. बौद्धांची चळवळ आणि जीवन, जग आणि जीवन बदलण्यासाडीच आहे. हे इथे लक्षात घेणे आवश्यक आहे. बौद्धधम्म क्रांती मार्गानुसार दलितांच्या पुनरुत्थानासाठी प्रास्थापितांशी झुंज देत तमाम श्रमहारा आणि बौद्ध जनतेने युद्धपातळीवरून प्रयत्नशील असणे आवश्यक आहे. ती काळाची सततची वाढती गरज आहे. भांडवलशाही, सरंजामशाही,

जमिनदारशाही व पुरोहीतशाहीच्या विरोधी कृतिशील संघटनाची आज नितांत गरज आहे.

३४. बौद्धधम्मक्रांतीच्या विरोधी प्रतिक्रांतीची फॅसिस्ट चळवळ मूळ धरून असून हितशत्रू अनेक आहेत आणि चळवळीतील स्वार्थांध लोक आंबेडकरी आंदोलकांचा बुद्धिभेद करीत, चळवळीत अंतर्विरोध वाढवित आहेत. हया अंतर्विरोधातूनच जातीयवादी फॅसिस्ट शक्ति बरोबरच साम्यवादी वणव्याचा धोका पुढे येत आहे. साम्यवादापासून सावध राहण्याचे जे इशारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिले त्याबाबत डॉ. गंगाधर पानतावणे म्हणतात, ' मार्क्सवादाचे धोकेही बाबासाहेब आंबेडकरांनी वेळोवेळी प्रतिपादन केले होते. दलित समाजाला त्यापासून सतत दूर राहण्याचा इशारा तर त्यांनी दिलाच पण देशालाही अलिप्त राहण्याचा संकेत त्यांनी केला होता. बुद्ध धर्माचा स्विकार ही त्यांची कृती म्हणजे मार्क्सवादाला नकार असाच त्याचा अर्थ आहे.'

पण हे समजून न घेता दलित साहित्यिकांची वाटचाल सुरू आहे आणि बौद्ध साहित्याबाबत पानतावणेनाही शहाणपण सूचत नसल्याचे भाऊसाहेब अडसूळांच्या टिकेवरून प्रकर्षाने स्पष्ट होते, ते म्हणतात, ' दलित साहित्यावरील प्रेमापायी प्रा. पानतावणे यांनी बौद्ध साहित्याचा उच्चार उभ्या आयुष्यात कधी केला नाही.' (दलित साहित्य का नको ? पान १३) तर दलित साहित्याबाबत त्यांनी मतलबी भूमिका स्विकारली आहे. अशा हया अंतर्विरोध निर्माण करणाऱ्यांची योग्य दखल घेत बौद्धधम्मक्रांती गतिमान करीत सामाजिक पुनरुत्थान घडवून आणणे आवश्यक आहे. त्यासाठी बौद्धीक बंडखोरी बरोबरच परिवर्तनासाठी शोषित, पिडित, दलित, बहिष्कृत, सर्वहारा, कामगार, कष्टकरी जनतेचे संघटन वाढविणे आवश्यक आहे.

३५. बौद्ध साहित्यिकांचे साहित्य वादात बसविण्याची गरज नाही. कारण ज्या बौद्ध बंडखोरीच्या वादातून ते निर्माण होते तो बौद्धवाद जगजाहिर आणि जगस्विकृत आहे. दलित साहित्यिकांकडे निश्चित असा कोणताच वाद

नसल्यामुळे ते वादग्रस्त ठरले असून वादात वसविण्याची गरज त्यांना पडू लागली आहे. दलित साहित्यिकांच्या दलित वैचारिकतेचे हे अपयश आहे. आंबेडकरांपासून प्रेरणा घेणाऱ्या दलित साहित्यिकांनी ठाम निश्चित निर्णायक मानवतावादाची म्हणजेच बौद्धधम्मक्रांतीची कास धरणे आवश्यक असून तसे घडले तर दलित साहित्य वादात वसविण्याचा त्यांना पडलेला प्रश्न निकालात निघेल व ह्या प्रश्नाचे भांडवल करून चळवळ दिशाहीन करणाऱ्या पंढरपूरी पुरोगाम्यांचा बंदोबस्त करण्यास बहुमोल सहाय्य होईल. बौद्ध साहित्यिकांचे ध्येय, त्यांचे मार्ग निश्चित आणि स्पष्ट आहेत. बौद्ध साहित्य जातिवाद, वर्गवाद नि वैचारिक व्याभिचारास कारण ठरणाऱ्या धर्म, संस्कृती आणि साहित्याचे कर्दनकाळ असून त्यांच्या मानवद्रोही वेदात मार्क्सवाद शोधून मार्क्सवाद्यांची दिशाभूल करणाऱ्या डिलबोळ वैचारिकतेचे डेडाळे बाहेर काढून जगजाहीर करीत आम जनतेस सामाजिक पुनरुत्थानाचा म्हणजेच बौद्धधम्मक्रांतीचा मार्ग दाखवित आहे. प्रस्थापितांच्या दिवाळखोर साहित्याचा व दलित साहित्यिकांच्या दिशाहीन दळभद्री दलित वैचारिकतेचा कोथळा बाहेर काढण्याचे कार्य बौद्ध साहित्यिक करीत आहेत.

३६. जग आणि जीवन बदलणाऱ्या बौद्धांच्या जीवन साहित्यातील क्रांतिकारी जाणीवेशी विश्वबंधुत्वाचे नाते जोडून त्यांचे साहित्य विकसित होत आहे. 'निग्रो समाजाचा व साहित्याचा अभ्यास करण्यापेक्षा बुद्धजीवनाचा व पाली साहित्याचा अभ्यास अधिक प्रेरक आहे....' (निळी पहाट पान १९/२०) असे जे विचार रा. ग. जाधव व्यक्त करताहेत, त्यातून जी जाण व्यक्त होत आहे, तिचे महानत्व घोषित करीत आम्ही बौद्ध साहित्यिक निग्रो लढ्याची, बंडखोरीची Black is beautiful ची आणि White is bright मधील जीवनसौंदर्याची न्याय्य दखल घेत आहोत. ती दखल घेण्याची जाण बौद्ध विचाराचा व आंबेडकरी विचाराचा अविभाज्य असा भाग आहे. पण काही अगांतुक लोक याबाबतही गोंधळ निर्माण करीत आहेत. त्यापैकीं प्र. श्री. नेरुरकर हे एक. ते म्हणतात, 'गुलामगिरी हे पुस्तक

फुले निग्रो चळवळीला अर्पण करतात. अशा रितीने दलित साहित्याची प्रेरणा ही मूलतःच वर्ण, वर्ग व रंग व्यवस्थेपलीकडे जाणारी मानवकेंद्रीत व मानवगामी विसाव्या शतकाची विश्वप्रेरणा आहे.' (दलित साहित्य एक अभ्यास पान १७६/१७७) अशा शब्दात ते दलित साहित्याचे व्यापक पण स्पष्ट करतात. त्यांच्या ह्या विधानातील विसाव्या शतकाची विश्वप्रेरणा हे शब्द-प्रयोग लक्षात घेणे आवश्यक आहे. फुलेंनी 'गुलामगिरी' हे पुस्तक निग्रो चळवळीला अर्पण केलेले आहे. याचा अर्थच असा की निग्रो मुक्ति लढ्यास त्यांची सहानुभूती होती आणि असणे स्वाभाविक होते आणि फुलेंसारख्या बंडखोराची असायचीच. याबद्दल वाद असण्याचेही काही कारण नाही. फुलेंची निग्रो चळवळीला असलेली सहानुभूती मी समजू शकतो आणि मानतो. पण प्र. श्री. नेरुरकर जी मानवकेंद्रीत व मानवगामी विसाव्या शतकाची विश्व प्रेरणा मांडताहेत आणि फुलेंच तिच्याशी नातं जोडताहेत. ती विश्वप्रेरणा व तिच्याशी फुलेंच त्यांनी जोडलेलं नातं सावधगिरीनं समजून घेतलं पाहिजे.

३७. आंबेडकर अनुयायी या नात्यानं प्र. श्री. नेरुरकरांना अभिप्रेत विश्वजाणीव व विश्वप्रेरणा मला संशयास्पद वाटतात. संशयास्पद वाटणेही साहजिकच आहे. वैश्विक प्रेरणा व जाणीवा यात प्र. श्री. नेरुरकर ज्याप्रमाणे अडकतात त्याप्रमाणे अडकून पडण्याइतके क्रांतीबा फुले बालीश वृत्तीचे नव्हते. म्हणूनच निग्रो चळवळीला 'गुलामगिरी' हे पुस्तक अर्पण करूनही त्यांच्या मानवतावादी प्रेरणा व जाणीवा विशिष्ट अर्थ घेऊन व्यक्त झाल्या आहेत. त्यांच्या वैश्विक जाणीवा 'सार्व-जनिक सत्यधर्म' ह्या पुस्तकातून सत्य हे सत्य व असत्य हे असत्य जाणा हे सांगणाऱ्या बुद्धाच्या जाणीवेशी जवळीक साधत बौद्धिक बंडखोरी जाहिर करीत सत्यधर्म म्हणून मानवतावादी दृष्टि घेऊन त्यांनी सार्व-जनिक केल्या. प्र. श्री. नेरुरकरांनी फुलेंच्या विश्वजाणीवा व प्रेरणा सार्वजनिक सत्यधर्मातून जाणून घ्याव्यात. साम्यवादाच्या वैश्विकतेत त्या शोधून फुलेंना साम्यवादी वैचारिकतेच्या आवरणात ओढू नये. तसे करणे म्हणजे आंबेडकरद्रोह करणे होय, हे आम्ही प्र.श्री.नेरुरकरांना सांगू इच्छितो. फुलेंच्या वैश्वकतेला स्वत्व नसतं तर ती 'सार्वजनिक सत्यधर्मातून व्यक्त

होण्यापेक्षा ख्रिस्तीधर्माच्या वैश्विकतेशी नातं जोडून त्यांनी व्यक्त केली असती. ख्रिस्ती मिशनऱ्यांशी त्यांचे चांगले संबंध आलेले होते. आणि ख्रिस्तीधर्म विषयक जाण त्यांना पुरेपुर होती हे मानव केंद्रीत मानवगामी विसाव्या शतकाची विश्वप्रेरणा व जाणीवा व्यक्त करणाऱ्या प्र. श्री. नेरुरकरांनी समजून घेणे आवश्यक आहे.

३८. क्रांतीवा फुलेंनी 'गुलामगिरी' हे पुस्तक निग्रो चळवळीस अर्पण करतांना जी अर्पणपत्रिका लिहिलेली आहे ती विचारात घेणे आवश्यक आहे. ती विचारात घेतल्यास त्यातून त्यांना जे अभिप्रेत होते, त्याची न्याय्य योग्य दखल न घेता, जी काही दखल घेण्यात येते ती वापर करून घेण्याच्या दृष्टिकोनातून घेण्यात येते. तर फुले 'गुलामगिरी' ग्रंथाच्या अर्पण पत्रिकेत म्हणतात, 'युनैटेड स्टेट्स मधील सदाचारी लोकांनी गुलामास दास्यत्वापासून मुक्त करण्याच्या कामात औदार्य, निरापेक्षता व परोपकार बुद्धि दाखविली यास्तव त्यांच्या सन्मानार्थ हे लहानसे पुस्तक त्यांस परम प्रितीने नजर करितों ! आणि माझे देश बांधव त्यांचा या स्तुत्य कृत्याचा कित्ता, आपले शूद्रबांधवास ब्राह्मणलोकांच्या दास्यत्वापासून मुक्त करण्याच्या कामात घेतील अशी आशा बाळगतो. ग्रंथकर्ता, (म. फुले समग्र ग्रंथ. किर–मालशे) हचा अर्पण पत्रिकेतून स्पष्ट होते की फुले आपले 'गुलामगिरी' हे पुस्तक निग्रो चळवळीस नुसतेच अर्पण करीत नाहीत तर आपल्या देशबांधवास आपल्या शूद्रबांधवांच्या मुक्तिसाठी युनायटेड स्टेट्स मधील सदाचारी लोकांप्रमाणे कृतिशील होण्यास सांगतात. शुद्र बंधस ब्राह्मण लोकांच्या दास्यत्वापासून मुक्त करण्याबाबत ठामपणे सांगतात आणि त्यासाठीच ब्राह्मणशाहीच्या विध्वंसनाचा आदेश आपल्या अनुयायांना देतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर द्रष्टेपणाने क्रांतीवा फुलेंना आपले गुरु मानून त्यांचा मार्ग स्विकारतात. पण हे जाणून चिकीत्सकपणे न मांडता प्र. श्री. नेरूरकर चेहऱ्यावर कोणते मुखवटे चढवून समाजात वावरतात हे जागृत आंबेडकर अनुयायी पुरेपुर ओळखून आहेत.

३९. 'God Save them they do not know what they do.' असे गॉडला विनविणाऱ्या आळवणी करणाऱ्या येशूख्रिस्तास आकाशीच्या

वाप्पाकडे जातांना बुद्धाचा चेहरा घेऊन का गेला नाहीस असे विचारणाऱ्या ढसाळांच्या हचा विचारांची दखल घेणाऱ्या प्र. श्री. नेरुरकरांना मी विचारू इच्छितो की मार्क्सकडे जाताना आंबेडकरांचा चेहरा घेऊन का जात नाही. मार्क्सवादी जाणीवेपेक्षा बुद्धाची जाणीव अधिक योग्य, गतिशील आहे, क्रांतीगामी, क्रांतीगर्भ, क्रांतीप्रवण, क्रांतीसन्मुख, जग आणि जीवन बदलणारी, शोषित, पिडीत, दलित, उपेक्षित, बहिष्कृत, सर्वहारा, कष्टकरी, कामगार जनतेची दखल घेणारी समाज परिवर्तन करणारी दलितांच्या जीवनाचा अभ्युदय करणारी विश्वजाणीव आहे हे ते निश्चित आणि निर्णायकपणे का मांडत नाहीत. कारण हे मांडण्यासाठी हे मांडल्यानंतर उद्भवणाऱ्या वादास सामोरे जाण्यासाठी जे धाडस अंगी असावं लागतं ते त्यांच्याकडे नाही. तर नेरूरकरांचा पराक्रम असा की जातीवादी, वर्गवादी, समाजव्यवस्थेविरुद्ध दलित साहित्याच्या बाजूने मार्क्सवादाचा आधार घेत बंडखोरी जाहीर करीत सोबत आंबेडकर, बुद्ध, कबीर, फुले यांचा ते उपयोग करून घेत आहेत. म्हणून त्यांचा नेरूरकरीपराक्रम आंबेडकरी विचारधारेपेक्षा मार्क्सच्या विचारधारेशी अधिक जवळीक साधून आहे. ही जवळीक फुलेंना विश्वप्रेरणा व जाणीवेत गुरफटून टाकण्याच्या विचारात आंबेडकरद्रोह करीत वावरत आहे. हेच त्याच्या वैचारिकतेतून दिसून येते.

४०. वैश्विक दलितपण, वैश्विकप्रेरणा, वैश्विकजाणीवा निर्माण करून दलित साहित्याच व्यापकपण स्पष्ट करण्यासाठी फुलेंचा ते वापर करताहेत. फुलेंना कम्युनिस्ट ठरविण्याचा प्रयत्न करण्याचा व साम्यवादाची कास धरून मानवकेंद्रीत व मानवगामी विसाव्या शतकाची विश्वप्रेरणा मांडून आंबेडकरी आंदोलकात वैचारीक गोंधळ माजवून आंदोलन दिशाहीन करण्यास, चळवळी फोडण्यास कारण ठरणाऱ्या बुद्धीमंतांनी व चळवळ चालवितांना जे येतील त्यांच्यासह व जे येणार नाहीत त्यांच्याशिवाय वाटचाल करीत वाट लागलेल्या पुरोगाम्यांनी हे लक्षात घेणे व अंतर्मुख होणे आवश्यक आहे. नाही तर जे येतील त्यांच्यासह या धोरणाखाली आंबेडकर द्रोही आंबेडकरी चळवळीचा व एकजुटीचा सर्वनाश करतील.

४१. जग आणि जीवन बदलण्यास बौद्धांच्या साहित्यातील क्रांतिकारक जाणीवेचे नाते जगभरच्या बौद्धांच्या जीवन साहित्यातील क्रांतीकारक जाणीवेशी त्यांनी जोडलेले आहे, हे जगजाहीर आहे. दलित साहित्यिकांजवळ जी काही क्रांतीकारक जाणीव आहे, तिचे नाते त्यांनी मुख्यता वैश्विक क्रांतीकारक जाणीवेशी जोडलेले आहे. या विसंगत वैचारिक वाटचालीच्या दोषाच खापर बाबुराव बागूलांच्या डोक्यावर फोडतांना भाऊसाहेब अडसूळ म्हणतात 'दलित साहित्याकडून समान्तर साहित्याकडे घेऊन जाणारी अघटीत मनवंतरे बागुल साहित्याने घडवून आणली आहेत.' (दलित साहित्य का नको ? पान ३०) या मन्वतरातून दलित साहित्यिकांचा जो बागूल कंपू तयार झाला तो वैचारिक गोंधळात अडकला आहे. आम्ही मात्र कधीच गोंधळात सापडलो नाही आणि गोंधळून गेलो नाही.. आमचा वाद न्याय्य भूमिकेच्या निसंदिग्ध स्विकाराबाबत आहे. म्हणून आम्ही विचारतो, 'आम्ही बौद्ध भूमिका स्विकारली आहे तुम्ही केव्हा स्विकारणार ? आंबेडकरी आंदोलकांकडे, साहित्यिकांकडे सामाजिक पुनरूत्थानासाठी आवश्यक असे क्रांतीकारी तत्वज्ञान वैचारिकता राज्यसमाजवाद व संसदीय लोकशाही रुजवून सामाजिक पुनरुत्थानास समर्थ असा बौद्धधम्मक्रांतीचा जीवन मार्ग आहे. दलित साहित्यिकांनी निश्चत असे विचारतत्वज्ञान स्विकारलेले नाही म्हणून सामाजिक पुनरुत्थानासाठी ते कुठलेही तत्वज्ञान किंवा विचार व जगभरचे विचारवंत स्विकारतात म्हणून त्यांच्याकडे हा जो जगभरचा रगड मालमसाला आहे त्यातून फक्त गोंधळ निर्माण झाला आहे. त्यांचे आदर्श गोंधळ निर्माण करणारेच त्यांनी ठरविले आहेत. म्हणून आतापर्यंत त्यांच्या हातून निश्चित असे समाजकार्य घडून येण्यापेक्षा गोंधळ घालणाऱ्या गोंधळ्या-प्रमाणे गोंधळच निर्माण झाला आहे. सत्ताधाऱ्यांच्या गोटात शिरायच आणि गोंधळ असंतोष बंडाळी निर्माण करून राज्यसत्ता हस्तगत करण्याचे तंत्र त्यांनी अनुसरले आहे. मग ते गोंधळ निर्माण करणार नाहीत तर काय करतील.

४२. आंबेडकरी बौद्ध साहित्यिक व आंदोलकांजवळ निश्चित असा जीवनमार्ग आहे. माणूस आणि माणसाचे मन हे त्याने प्रमुख मानलेले आहे

व त्यानुसार जग आणि जीवन बदलण्यासाठी ते घडवित आहेत. साम्यवादी मार्गाप्रमाणे मनाचे अभिसंधान ते करीत नाहीत. तर योग्य आणि अयोग्य न्याय्य आणि अन्याय्य यांचे सुस्पष्ट असे दिग्दर्शन करीत न्याय्यतेची बाज घेत अन्यायावर ते तुटून पडत आहेत. ते त्यांचे कर्तव्यच आहे. दलित साहित्यिक समांतर साहित्याशी जवळीक साधून सर्वहारा व दलित माणसास साम्यवादाकडे आकर्षून घेण्याचा प्रयत्न करीत दलित क्रांतीची वैचारिकता मांडत आहेत. तिची मांडणीच मुळी बौद्धधम्मक्रांतीविरोधी आहे. अशा तिच्या व्यभिचारी वैचारिक मांडणीची धुळधाण बौद्ध साहित्यिक व आंबेडकरी समाज केल्याशिवाय राहणार नाही.

४३. दलितपणाने हे लोक एवढे भारून गेले आहेत की उठसुठ जो तो दलित शब्दाची व्यापकता वाढवित वैश्विकतेजवळ जाण्याचा प्रयत्न करीत आहे. दलित शब्दाच्या साहित्याच्या त्यांनी केलेल्या चुरसबाज व्याख्या, पाहिल्या म्हणजे हसू येते. या चुरसबाजीत अर्जुन डांगळे यांनी सुद्धा भाग घेऊन आपली विद्वत्ता वाया घालविली आहे. वैचारिक गाफीलतेमुळे माणूस अर्थाचा कसा बेअर्थ करतो याचे उदाहरण म्हणजे डांगळेची दलित साहित्याची व्याख्या होय. ते म्हणतात, " भारतीय सामाजातील जातीव्यवस्था अस्पृश्यतेसारखे तिचे भीषण स्वरुप, इथली शोषण व्यवस्था या सगळ्यांची, जाणीव होऊन ती विरूद्धची कठोर प्रतिक्रीया म्हणजे दलित साहित्य.' (दलित साहित्य एक अभ्यास, निवेदन ऐकेचाळीस) दलित साहित्याची अशी व्याख्या करून त्यांनी नेमकं अस काय साधलं आहे ?

४४. दलित साहित्य विषमते विरूद्धची कठोर प्रतिक्रिया आहे हे समजू शकते, पण ही कठोर प्रतिक्रिया निश्चित कोणती विचारधारा अनुसरून व्यक्त झाली आहे, हे स्पष्ट होत नाही. डांगळे स्वतःला आंबेडकर अनुयायी समजतात. तरी पण दलितपण जपत दलितपणाचे उदात्तिकरण करीत चळवळी जगत आहेत. दलितपणाचे उदात्तिकरण करणे म्हणजे वैचारिक गाफीलतेचीच जाहिरात करणे होय, अशांची किव करावी तेव्हढी थोडीच आहे. ही व्याख्या करताना जिथं त्यांनी दलित साहित्य हचा शब्दाचा उपयोग केला तिथं 'बौद्ध साहित्य' हे बौद्धीक बंडखोरीचे सूचक शब्दप्रयोग उपयोगात

आणले असते तर ते अधिक योग्य आणि समर्पक झाले असते. आणि ह्या व्याख्येचा अर्थ स्पष्टपणे सांकृतिक संदर्भासह व्यक्त झाला असता. पण ज्यांनी बौद्धधम्मक्रांतीचं समजून घेतलेली नाही, समजून घेण्याचा प्रयत्नही केला नाही, तर असे हे लोक दलित साहित्य लिहिणार नाहीत तर काय बौद्ध साहित्य लिहिणार आहेत ? ते दलित म्हणजे कोण ? त्याचे हे त्याचे ते असे बरेच काही लिहिणार व असे लिहितांनाच दलितपणाला आदर्शत्वाचा अर्थ देणार. मतभेद इथेच आहेत. दलित साहित्यिक दलितत्व आदर्शभूत मानून परत स्वतःला दलित म्हणवून घेण्यात भूषण मानतात आणि वर प्रस्थापित हे दलितांना दलित ठेऊ पहातात असेही म्हणतात.

४५. जे स्वतःला दलित म्हणवून घेण्यात भूषण मानतात अशा दिवाळखोरांना प्रस्थापितांनी दलित ठेवण्याचा प्रयत्न केल्यास आभाळ एव्हढा कांगावा का ? असे करतांना यशवंत मनोहर म्हणतात. " प्रस्थापित साहित्य म्हणजे दलितांना दलित ठेवू इच्छिणाऱ्या जीवननिष्ठांचे साहित्य. दलित साहित्याचे भांडण या सोफिष्टिकेटेड शक्तींशी आहे. " (दलित साहित्य सिद्धांत आणि स्वरूप पान १७ प्रा. यशवंत मनोहर) स्वतःला आग्रहाने दलित म्हणवून घेणारांनी असे म्हणणे म्हणजे टवाळखोरांच्या उलटया बोंबाचाच प्रकार नव्हे काय ? बौद्ध साहित्यिकांचं तसं नाही, त्यांचा संघर्ष दलितांच्या सर्वांगिण पुनरुत्थानासाठीच सुरू आहे. ह्या पुनरुत्थानातून ते दलितांना बौद्धधम्मक्रांतीतून व्यक्त झालेल्या मानवतावादाकडे नेत आहेत. तर दलित साहित्यिक भारतीय लेव्हलवर समांतर वाहणाऱ्या साम्यवादी साहित्याच्या गंगोत्रिशी नातं जोडत आहेत. साम्यवादी विचारधारेच्या प्रवाहाशी समांतर वाहू लागलेले समान्तर हिंदी साहित्य ते आपलेसे करीत भारतीय पातळीवर बौद्धधम्मक्रांतीस असलेला साम्यवादाचा विरोधी प्रवाह प्रबळ करण्यास कारण ठरत आहेत. अशा ह्या धोकेबाज दलित साहित्यिकांची व समान्तर साहित्यवाल्यांची योग्य ती दखल घेणे आंबेडकर अनुयायांचे कर्तव्य आहे.

० ० ०

४६. आंबेडकरी ध्येयवादापुढील साम्यवादाचे आव्हान रा. ग. जाधव यांनी ओळखले असून त्याचे संभाव्य परिणाम काय होतील हे स्पष्टपणे सांगितले आहेत. याबाबतचे त्यांचे विचार मननिय असेच आहेत. जीवनमार्ग म्हणून समजापुढे निश्चित असे आदर्श असणे आणि ठेवणे आवश्यक असते. त्या आदर्शानुसार समाज वाटचाल करीत असतो. ते आदर्श समाजाला दिवस्तंभासारखे निश्चित नि योग्य दिशा दाखवित असतात. आणि समाजाला वाटचाल करण्यास उपयोगी पडत असतात. त्यासाठीच त्यांची निर्मिती असते. हचा आदर्शांची निर्मिती आदर्श समाजाच्या धारणेसाठी असते. समाजाच्या धारणेसाठी पुरक असलेले आदर्श स्विकारतांना धर्मसुद्धा पारखायचा असतो. "ज्याने प्रजेचे धारण होते तोच धर्म." असे डॉ. बाबासाहेबांनी म्हटलेले आहे व समाजाच्या धारणेस समर्थ असलेल्या बौद्धधर्माचा मार्ग स्विकारून मानवतेच्या सवर्धनास असलेले त्याचे महानत्व सिद्ध केले आहे. तर धर्माबाबत लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात 'ज्यात धर्मसंस्था नाही अशी एकही मानवी जमात किंवा असा एकही मनुष्यसमाज नाही. रानटी समाजापासून सुधारणेच्या शिखरावर पोचलेल्या समाजापर्यंत सर्वत्र धर्मसंस्थेचे अस्तित्व आहे.' (लेखसंग्रह भाग १ पान ४३ संपा. मधुकाका) धर्म हा समाजाचा अविभाज्य असा भाग असतो. तो टाकून किंवा दुर्लक्षून कोणताही समाज समर्थपणे वाटचाल करू शकत नाही.

४७. ज्यांनी धर्म नाकारला त्यांचा अधंपात झालेला आहे. आणि ज्यांनी अंधश्रद्धेला धर्म मानले त्यांचाही अधंपात झालेला आहे. ज्यांनी धर्मा-बाबत अतिरेकी भूमिका स्विकारली त्यांचाही अधंपात झालेला आहे. ज्यांना धर्म कळाला नाही त्यांचाही अधंपात झालेला आहे. धर्म कळुनही ज्यांनी आपमतलबी भूमिका स्विकारली त्यांचाही अधंपात झालेला आहे. धर्माधर्मा-तील विरोधही अधंपातास कारण ठरला आहे. राष्ट्रविरोधी धर्मकारण अधं-पातास कारण ठरले आहे. तसेच धर्माधिष्ठित राष्ट्रवादी राजकारण अंध-पातास कारण ठरले आहे. धर्माच्या पुनरूज्जीवनासाठी इतिहासाची चक्रे उलटी फिरविणे म्हणजे शितयुद्ध आणि यादवीयुद्धाची बीजे उरात घेऊन वावरणारा अधंपात होय. धर्म म्हणजे काय हेच निश्चित न कळल्यामुळे मानवजातीच्या इतिहासात धर्मासाठी मानवाने जेव्हढा धुमाकूळ घातला तेव्हढा इतर कोणत्याही शक्तिने घातला नाही. मानवी जीवनाच्या सुरक्षितते-साठी धर्म आवश्यक आहे. आणि तरीही धर्म आज समाज परिवर्तनाआड येत आहे. धर्म कशाला म्हणायचे कोणत्या गोष्टीला आचारविचाराला किती महत्व द्यायचे याचे भान न राहिल्यामुळे हे घडून येत आहे. आणि यातूनच धर्म आज फॅसिस्ट शक्तिचे कोठार बनला आहे. म्हणून धर्म घर आणि प्रार्थना स्थळापुरता मर्यादित करण्याच्या गरजेची जी स्तुत्य जाणीव निळुभाऊ खाडीलकर व्यक्त करताहेत ती दखल पात्र असून घरापुरती जातीयता पाळ-णाऱ्या महाभागांच्या ब्रेनवॉशिंगसाठी सांस्कृतिक क्रांतीचीही नितांत आव-श्यकता आहे.

४८. धर्म आणि धम्म यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेला फर-कही लक्षात घेणे आवश्यक आहे. काळाच्या प्रवाहाबरोबर धर्माच्या कल्पना बदलत गेल्या. भिन्न रुढी आणि आचार संहितांना धर्मच मानल्या गेल्यामुळे धर्म या संज्ञेला निश्चित असा अर्थच राहीला नाही. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर धर्म आणि धम्म यात फरक करतात. हा फरक करतांना धर्मा-बाबत ते म्हणतात. "४. धर्माचा आशय कधीही निश्चित असा नव्हता. ५. तो वेळोवेळी बदलत गेला." (बुद्ध आणि त्याचा धम्म, पान २४३) तर धम्माबाबत ते म्हणतात, "धम्म म्हणजे सदाचरण, म्हणजेच जीवनाच्या

४६. आंबेडकरी ध्येयवादापुढील साम्यवादाचे आव्हान रा. ग. जाधव यांनी ओळखले असून त्याचे संभाव्य परिणाम काय होतील हे स्पष्टपणे सांगितले आहेत. याबाबतचे त्यांचे विचार मननिय असेच आहेत. जीवनमार्ग म्हणून समजापुढे निश्चित असे आदर्श असणे आणि ठेवणे आवश्यक असते. त्या आदर्शानुसार समाज वाटचाल करीत असतो. ते आदर्श समाजाला दिवस्तंभासारखे निश्चित नि योग्य दिशा दाखवित असतात. आणि समाजाला वाटचाल करण्यास उपयोगी पडत असतात. त्यासाठीच त्यांची निर्मिती असते. हचा आदर्शांची निर्मिती आदर्श समाजाच्या धारणेसाठी असते. समाजाच्या धारणेसाठी पुरक असलेले आदर्श स्विकारतांना धर्मसुद्धा पारखायचा असतो. "ज्याने प्रजेचे धारण होते तोच धर्म." असे डॉ. बाबासाहेबांनी म्हटलेले आहे व समाजाच्या धारणेस समर्थ असलेल्या बौद्धधर्माचा मार्ग स्विकारून मानवतेच्या सवर्धनास असलेले त्याचे महानत्व सिद्ध केले आहे. तर धर्माबाबत लक्ष्मणशास्त्री जोशी म्हणतात 'ज्यात धर्मसंस्था नाही अशी एकही मानवी जमात किंवा असा एकही मनुष्यसमाज नाही. रानटी समाजापासून सुधारणेच्या शिखरावर पोचलेल्या समाजापर्यंत सर्वत्र धर्मसंस्थेचे अस्तित्व आहे.' (लेखसंग्रह भाग १ पान ४३ संपा. मधुकाका) धर्म हा समाजाचा अविभाज्य असा भाग असतो. तो टाकून किंवा दुर्लक्षून कोणताही समाज समर्थपणे वाटचाल करू शकत नाही.

४७. ज्यांनी धर्म नाकारला त्यांचा अधंपात झालेला आहे. आणि ज्यांनी अंधश्रद्धेला धर्म मानले त्यांचाही अधंपात झालेला आहे. ज्यांनी धर्माबाबत अतिरेकी भूमिका स्विकारली त्यांचाही अधंपात झालेला आहे. ज्यांना धर्म कळाला नाही त्यांचाही अधंपात झालेला आहे. धर्म कळुनही ज्यांनी आपमतलबी भूमिका स्विकारली त्यांचाही अधंपात झालेला आहे. धर्माधर्मातील विरोधही अधंपातास कारण ठरला आहे. राष्ट्रविरोधी धर्मकारण अधंपातास कारण ठरले आहे. तसेच धर्माधिष्ठित राष्ट्रवादी राजकारण अंधपातास कारण ठरले आहे. धर्माच्या पुनरूज्जीवनासाठी इतिहासाची चक्रे उलटी फिरविणे म्हणजे शितयुद्ध आणि यादवीयुद्धाची बीजे उरात घेऊन वावरणारा अधंपात होय. धर्म म्हणजे काय हेच निश्चित न कळल्यामुळे मानवजातीच्या इतिहासात धर्मासाठी मानवाने जेव्हढा धुमाकूळ घातला तेव्हढा इतर कोणत्याही शक्तिने घातला नाही. मानवी जीवनाच्या सुरक्षिततेसाठी धर्म आवश्यक आहे. आणि तरीही धर्म आज समाज परिवर्तनाआड येत आहे. धर्म कशाला म्हणायचे कोणत्या गोष्टीला आचारविचाराला किती महत्व द्यायचे याचे भान न राहल्यामुळे हे घडून येत आहे. आणि यातूनच धर्म आज फॅसिस्ट शक्तिचे कोठार बनला आहे. म्हणून धर्म घर आणि प्रार्थना स्थळापुरता मर्यादित करण्याच्या गरेजेची जी स्तुत्य जाणीव निळुभाऊ खाडीलकर व्यक्त करताहेत ती दखल पात्र असून घरापुरती जातीयता पाळणाऱ्या महाभागांच्या ब्रेनवॉशिंगसाठी सांस्कृतिक क्रांतीचीही नितांत आवश्यकता आहे.

४८. धर्म आणि धम्म यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केलेला फरकही लक्षात घेणे आवश्यक आहे. काळाच्या प्रवाहाबरोबर धर्माच्या कल्पना बदलत गेल्या. भिन्न रुढी आणि आचार संहितांना धर्मच मानल्या गेल्यामुळे धर्म या संज्ञेला निश्चित असा अर्थच राहीला नाही. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर धर्म आणि धम्म यात फरक करतात. हा फरक करतांना धर्माबाबत ते म्हणतात. "४. धर्माचा आशय कधीही निश्चित असा नव्हता. ५. तो वेळोवेळी बदलत गेला." (बुद्ध आणि त्याचा धम्म, पान २४३) तर धम्माबाबत ते म्हणतात, "धम्म म्हणजे सदाचरण, म्हणजेच जीवनाच्या

सर्व क्षेत्रात माणसामाणसातील व्यवहार उचित असणे." (बुद्ध आणि त्याचा धम्म, पान २४४) म्हणजेच राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक तत्वज्ञान म्हणूनच बौद्धधम्माचा मार्ग त्यांनी आपल्याला दिला आहे. पण बुद्धाला कवटाळून बसलेल्या आंबेडकर अनुयायांनी या धम्मतत्वज्ञानाची काय विल्हेवाट लावली व चालवलेली आहे हे इथे सांगायलाच पाहिजे असे नाही. आणि आंबेडकर अनुयायातील बुद्धिजीवी वर्ग धम्मतत्वज्ञानाच्या जबाबदारीबाबत सर्वसामान्य जनतेची दिशाभूल करीत कातडी बचावू धोरण ठेवून गांडूळा सारखाच जगतो आहे.

४९. मिनाक्षीपूरम येथील दलितांनी इस्लामधर्म स्विकारताच हिंदु जनजागरणाची मोहीम काढण्याची गरज निर्माण होते. त्या निमित्ताने गंगेचे पाणी काश्मिर ते कन्याकुमारीपर्यंत मिरविले जाते. धर्मशुद्धिचे थोतांड माजविले जाते. हिंदुधर्मात राहुनही अन्यायच आणि धर्मांतर केले तरीही अन्यायच दलित समाजावर केल्या जाणार असेल तर, "हिंदुनो ! तुम्ही असेच नाठाळपणाचें धोरण चालू ठेवले तर तुमचा भविष्यकाळ काळाकुट्ट आहे. तुम्ही माझी विचारसरणी मान्य केली नाही तर तुमचा सत्यानाश ठरलेलाच आहे." (डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे चरित्र, २ पान ९ खंड ले. चा. भ. खैरमोडे) असा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जो इशारा दिलेला आहे त्याबाबत हिंदुनी अंतर्मुख होण्याची नितांत गरज आहे.

धर्म कलहामुळे या देशाचे जेव्हढे अपरिमित नुकसान झालेले आहे तेवढे इतर कशानेही झालेले नाही. पुढ कधीकाळी धर्मच या देशाच्या अधःपातास कारण ठरण्याची अधिक शक्यता आहे. कारण सर्वधर्मसमभावाची शिकवण देण्याऱ्या या देशात धर्म हा अफुची गोळी ठरविल्या जात आहे. आणि हिच धर्माबाबत सर्वात मोठी शोकांतिका आहे. मशिदी समोर लघुशंका करणाऱ्याला माफ करणारा पैगंबर कुठे अन् भगवे अन् हिरवे झेंडे घेऊन एकमेकांच्या जीवावर उठणारे हिंदु-मुसलमान कुठे. निमित्त हवं असतं आणि दंगल पेटते हात धुवून घेणारे घेतात आणि सहा सात हजार माणसं सहा सात दिवसात किडयामुंग्यासारखी मारून हजारो लेकराबाळांचे तांडे उघ-

ड्यावर पाडले जातात. ह्याचे भिवंडी दंगल हे उदाहरण आहे. आणि काही बाबतीत या देशातील धर्मान्तर अराष्ट्रीयत निष्ठा बाळगल्यामुळे राष्ट्रांतर ठरू शकते. आणि त्यामुळेही धर्मनिष्ठा अफुच्या गोळीसारखी ठरत आहे. कारण धर्माधिष्ठित राष्ट्रवादाची मुळं धर्मनिष्ठेत जोपासली जातात. आणि मग ज्या देशात कोट्यावधी लोक अर्धपोटी झोपत असतात त्या देशात बिर्ला करोडो रुपये खर्च करून मुक्तिधाम बांधतो लक्ष्मीनारायणाची मंदीरं उभी करून आम जनतेच्या संपतीची धुळधाण करीत उन्मतपणे वावरत असतो. टाटा, किर्लोस्कर, कापाडिया, बजाज हे त्याचेच भाईबंद. खरं म्हणजे धर्मस्थानांमध्ये असलेली करोडो रुपयाची संपत्ती जनतेच्या सुखसमृद्धीसाठी वापरणे अत्यंत अवश्यक आहे. नविन धर्म स्थानांच्या निर्मितीवर बंदी आणणेही आवश्यक आहे. मंज्जिद, मंदिर, गुरु द्वारांची शोकांतिका म्हणजे ती चरस, गांजा, अफीमचे अड्डे बनवले जातात दंगलीसाठी दारूगोळ्याची कोठारं म्हणून ती विनदिक्कतपणे वापरली जातात.

५०. स्वा. सावरकरही विज्ञाननिष्ठ, डॉ. आंबेडकरही विज्ञाननिष्ठ. "धर्मनाश केल्याशिवाय हिंदुना जातीविध्वंसन करता येणार नाही" असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात तर सर्व धर्म नष्ट होत असतील तर हिंदुधर्म नष्ट झालेला मला चालेल असं स्वा. सावरकर म्हणतात. दोघांचीही विज्ञाननिष्ठा हाच जातीविध्वंसनावर जालिम उपाय आहे. त्याशिवाय प्रगतीचा मार्ग भारतीय जनतेस आक्रमिता येणार नाही. विज्ञानासमोर धर्मस्तोम टिकाव धरु शकणार नाही.

५१. तर धर्मश्रद्धेबाबत विचार व्यक्त करताना बौद्धधम्माचे महत्व व त्यास असलेल्या धोक्याबाबत स्पष्ट आणि परखड जाणीव करून देताना प्रा. रा. ग. जाधव म्हणतात, "अचल नि दृढतम दर्शनिक आत्मप्रत्ययातून कलासाहित्यासारखी आत्माभिव्यक्ती समाज संसिद्ध करू शकतो आणि तसा अचल व दृढतम दर्शनिक आत्मप्रत्यय केवळ धर्म श्रद्धाच निर्माण करू शकते. ही महत्वाची वस्तुस्थिती दलित सम

जियांनी लक्षात घेतली नाही, तर साम्यवादाच्या विद्रोहाच्या व निषेधाच्या कांचनमृगाचा मोह पडून, तो एका घातक भूलभूलयात अडकून पडल्याशिवाय राहणार नाही. यापेक्षाही महत्वाची गोष्ट, म्हणजे एका अनिष्ट सांस्कृतिक पोकळीत तो स्वतःला टांगून घेईल आणि या देशात पुन्हा एकदा बौद्ध-दर्शनाचा पुर्ण पराभव होईल. (दलित साहित्य एक अभ्यास, पान १५५) हचा विवेचनातून प्रा. रा. ग. जाधव यांनी बौद्धदर्शनापुढील धोक्याचे अचूक आणि परखड असे निदान केले आहे. आणि साम्यवादाचा हा धोका दलित समाजीयाची बाजू घेणाऱ्या दलित साहित्यातून व्यक्त केल्या जात आहे.

५२. दलित साहित्यिकांचा साम्यवादाकडे असलेला कल डोळस नसून उत्फुर्त असा आहे. त्यांच्या विचार अभिव्यक्तिवरून हेच दिसून येते. हचा उत्स्फुर्तवृत्तीच्या लोकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा, बौद्ध तत्वज्ञानाचा नीट अभ्यास कलेला नाही. म्हणून बौद्धधम्मापुढील अडथळे ओळखूनही दलित शब्द गर्भीर ठेवण्याची चूक प्रा. रा. ग. जाधव सुद्धा करतात आणि प्रा. यशवंत मनोहर त्यांचीच री ओढतात. जो पकपक करतो तो प्राध्यापक असे आम्ही काही वेळा जे म्हणतो ते उगाच नाही. तर अर्ध्या हळकुंडात पिवळे झालेले हे लोक आहेत. हेच लोक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर व बुद्धावर दोषारोप करीत बोलत नि लिहित असतात. असे करीतच आंबेडकरी आंदोलकात व आंदोलनात वैचारिक गोंधळ निर्माण करून ते साम्यवादाच्या कांचनमृगी मृगजळामागे लागले आहेत. स्वतःला पुरोगामी म्हणविणारे साम्यवादी लोक आंबेडकरी चळवळ हतबुद्ध करण्यास हचांचा वापर करीत असतात आणि झापडं लावलेल्या घोड्यांसारखे हे त्यांच्या मागोमाग जातात.

मानवतावाद रुजविणाऱ्या बौद्धतत्वज्ञानाचा विरोध हिंदुधर्म संस्कृतीने सर्वशक्तिनिशी केला आहे, हे करण्यासाठी कटकारस्थानं झाली. दैववादाला नाकारणाऱ्या बुद्धाला अवतारपद देऊन देव्हाऱ्यात बसविले आणि ज्याच्या पुनरुत्थानासाठी बुद्धानं सर्वस्वाचा त्याग केला त्या सर्वसामान्य गोरगरीब जनतेचं नातं तोडून टाकलं. आणि आज जीवन बदलण्यासाठी डॉ. बाबा-

साहेब आंबेडकरांनी बुद्धाशी नाते जोडून दिलेले आहे. "सर्व प्राणीमात्र ईश्वराची रूपं आहेत लेकरं आहेत." असे म्हणणाऱ्या धर्ममार्तंडांनी देवत्वावर आपली मक्तेदारी प्रस्थापित करून आपल्या पौटार्थ वेठीस धरून पुरोहितशाहीचं स्तोम माजविले. सर्वसामान्य जनतेचा बुद्धिभेद करीत, स्वर्गाच्या मृगजळी मार्गाचे भांडवल करून माणसाला स्वार्थासाठी नीच ठरविले. जगभरच्या सुशिक्षित पुरोहीत वर्गाने सुसंस्कृततेऐवजी असंस्कृततेचीच कास धरली आणि आपल्या सुशिक्षितपणाचा जनतेस लुबाडण्यास गैरवापर केला.

५३. विषमतेचे जातीयवादाचे विष समाजामध्ये अजुनही कायम आहे. आणि निर्मूलनाचे प्रयत्न खऱ्या अर्थाने केले जात नाहीत. उलट जातीवादाचे उदात्तिकरण करण्याचे झटके येथील कुत्र्याच्या छत्रिसारख्या उगवणाऱ्या महात्म्यांना अधूनमधून येत असतात. हचा विषमतेमुळेच समाज स्वत्व हरवून वसला आणि अंतर्गत कलहामुळे बाहच आक्रमकांपुढे सतत पराभूत होत राहला. हे जाणूनच 'हिंदुचा इतिहास हा पराभवाचाच इतिहास आहे.' असे परखड पिचार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्त केलेले आहेत. तर स्वा. सावरकर म्हणतात, "सिंदुबंदीचे शास्त्र ज्या क्षणी कोण्या ब्राह्मण पंडिताने हिंदुस्थानात सांगितले तो क्षण या देशाच्या इतिहासात परम दुर्भाग्याचा होय." अजूनही आपण जातीय विषमतेच्या कटुतेलाच बळी पडत असून तिसऱ्या जगात वावरतो आहोत. याची अनेक उदाहरणे देता येतील. दलित जनतेवरील सततचे अन्याय अत्याचार हचा कटुतेचाच भाग आहेत.

सामाजिक एक्याचा विध्वंस करणारी ही जातीय व वर्गीय विषमता आपल्या देशातील लोकशाहीला मारक ठरण्याचीच अधिक शक्यता आहे हे जाणून, जर असे घडले तर हा देश आपले स्वातंत्र्य कायमचे गमावून बसेल. तसे होऊ नये म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्पष्ट इशारा दिला आहे. तो दैतांना त्यांनी सांगितले आहे, "भारतातील सामाजिक परिस्थितीत दोन्ही तत्वांचा अभाव आहे, हे मान्य करूनच आपण सामाजिक

लोकशाही निर्माण करण्यास सुरवात केली पाहिजे. या दोन गोष्टींपैकी एक गोष्ट म्हणजे समता. सामाजिक बाबतीत पहावयाचे तर आपल्या भारतातील समाजरचना चढती भाजणी व उतरती भाजणीच्या तत्वावर उभारलेली असल्यामुळे कांही जातींना उच्च दर्जा देण्यात आला आहे. आर्थिक बाबतीत पहावयाचे तर भारतातील समाजात काही लोकांच्या घरी गजांत लक्ष्मी वावरत आहे, तर बहुसंख्य लोकांच्या घरात अठरा विश्वे दारिद्र्य नांदत आहे. अशा परस्पर विरुद्ध स्वरूपाच्या भरगच्च भरलेल्या आपल्या नव्या राष्ट्रीय जीवनास आपण २६ जानेवारी १९५० ला सुरवात करणार आहोत. या दिवसापासून राजकीय बाबतीत आपणाला समता मिळणार आहे. पण सामाजिक आणि आर्थिक बाबतीत आपणामध्ये असमता राहणार आहे.

एका माणसाला एका मताचा अधिकार आणि एका मताची किंमत या तत्वाची जाणीव आपणाला राजकीय बाबतीत होणार आहे. सामाजिक आणि आर्थिक बाबतीत आपल्या विशिष्ट सामाजिक व आर्थिक रचनेमुळे आपण उपरनिर्दिष्ट तत्वाला २६ जानेवारी १९५० पासून हरताळ फासणार की पूर्व परंपरागत कार्य पुढे चालू ठेवणार आहोत ! परस्पर विरूद्ध अशा प्रकारांनी भरलेले आपले हे आयुष्य किती दिवस यापुढे चालू ठेवणार ? सामाजिक व आर्थिक बाबतीतील समता प्रस्थापित करण्याची टाळाटाळ आपण आणखी किती काळ करणार आहोत ? ही टाळाटाळ आपण जर पुष्कळ काळ चालू ठेवली तर आपल्या राजकीय लोकशाहीचे जीवित धोक्यात ठेवूनच ही टाळाटाळ आपणाला टिकविता येईल. ही परस्पर भिन्नतादर्शक परिस्थिती शक्य तो लवकर आपण नष्ट केली पाहिजे. नाहीतर या परिस्थितीवद्दल मनात धुसफुसत असलेले लोक या घटना समितीने प्रचंड परिश्रम घेऊन जी ही राजकीय लोकशाही निर्माण केलेली आहे तिचे तळपट आकाशात भिरकावून देतील. (भाषणे खंड १ पान १७७ संपा. मा. फ. गांजरे) त्यांनी दिलेली ही धोक्याची सूचकता अजुनही राजकीय लोकशाहीत टांगल्या तलवारी प्रमाणे, आपल्या अस्तित्वाची भय-

सूचक जाणीव सामाजिक व आर्थिक विषमतेच्या असंतोषातून वेळोवेळी देत व्यक्त होत असते.

५४. या देशातील राजकीय लोकशाही, सामाजिक व आर्थिक लोकशाही प्रस्थापित करण्यास अपयशी ठरली तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वर्तविलेल्या भाकिताप्रमाणे अराजक, वंडाळी, असंतोष माजेल आणि कम्युनिस्ट सत्ता हस्तगत करतील आणि हुकूमशाहीचे शासन येथे येईल. हे ओळखून दलित व पुरोगामी साहित्यिक समाजात वैचारिक नेतृत्व करीत आहेत का ? साम्यवादाच्या विद्रोहाच्या व निषेधाच्या कांचनमृगाचा बौद्धधम्मक्रांतीस असलेल्या धोक्याबाबत प्रा. रा. ग. जाधवांनी दिलेल्या सावधगिरीच्या इशाऱ्याबाबत त्यांनी समयसूचक दक्षता आणि दुरदृष्टी दाखविली आहे काय ? हचा सर्व प्रश्नांची उत्तरं नकारात्मक स्वरूपाची आहेत. याचा अर्थच असा की बौद्धधम्मक्रांतीस साम्यवादाचे असलेले आव्हान ते जवळ करीत आहेत. त्याचा विपरीत परिणाम आंबेडकरी आंदोलनाबाबत घडत आहे. हा धोका परतवून लावण्यासाठी आंबेडकर अनुयायांनी सतत जागृत क्रियाशील राहणे अत्यंत आवश्यक आहे

५५. काही पंढरपुरी पुरोगामी लोक दलित साहित्यिकांचा उदो उदो करीत वैचारिक गोंधळ निर्माण करण्याचे तंत्र सातत्याने उपयोगात आणित आहेत. काही गोंधळी लेकरं उत्स्फुर्तपणे त्यांची जवळीक साधत आहेत. काही पुरोगामी लोक असे आहेत की जे आंबेडकर व मार्क्स यांच्या वैचारिकतेचा समन्वय साधून चळवळींना वैचारिक अधिष्ठान देण्याचा प्रयत्न करीत आहेत. असे करतांना प्र. श्री. नेरुरकर म्हणतात, 'आंबेडकरी व मार्क्सवादी प्रेरणा या जितक्या क्रांतिगर्भ, क्रांतिगामी व क्रांतीप्रवण आहेत तितक्या व त्याप्रमाणात 'दलित साहित्या' च्या प्रेरणा व बांधिलकी या क्रांतिगर्भ व क्रांतिप्रवण अशा आहेत. केवळ आंबेडकरवादातून मार्क्सवाद वजा करून किंवा मार्क्सवादातून आंबेडकरवाद वजा करून 'दलित साहित्याचे' मतलबी समिकरण मांडणारे तथाकथित बुद्धिमंत फक्त आत्मवंचनाच करतात असे नाही तर साहित्यद्रोह व समाजद्रोह ही कळत न कळत त्यांच्या हातून घडत असतो असे

म्हणता येईल. आणि त्यामुळे सम्यक परिवर्तनाकडे जाऊ पाहणाऱ्या 'दलित साहित्या' च्या प्रवाही स्वयंपुष्ट व कालसमक्ष व कालसमर्थ चळवळीतच "बिघाड" घडून येण्याचा धोका निर्माण होतो." (दलित साहित्य एक अभ्यास पान १७७) असे रोखठोक विवेचन प्र. श्री. नेरुरकरांनी केल्याबद्दल धन्यवाद. नेरुरकर व इत्यादिना अभिप्रेत आंबेडकरवाद व मार्क्सवाद यांच्या समन्वयामुळे आंबेडकरी चळवळीत वैचारिक वादंग माजून तर्कविसंगत विचारप्रवाहात चळवळी विघटित झाल्या आहेत, होत आहेत. बौद्धधम्म-क्रांतीच्या गतिरोधास हे लोक कारण झालेले आहेत.

५६. ज्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना समजून घेतलेले नाहीय ते बौद्धधम्मक्रांतीचे मोल ओळखू शकलेले नाहीत, तेच लोक आंबेडकरवाद व मार्क्सवाद यांच्या समन्वयाची भाषा करतील व करीत आहेत. समान्वयाची भाषा करणे व बाजू घेणे म्हणजे बौद्धधम्मक्रांतीस विरोध करणे होय. आंबेडकरांपासून प्रेरणा घेऊन ज्यांनी मार्क्सवादाचीही बाजू घेतली आहे ते आंबेडकरी ध्येयवादाची प्रातारणाच करीत आहेत. दलित साहित्यिकांची दलित साहित्याच्या माध्यमातून प्र. श्री. नेरुरकर, बाबूराव बागूल, कमलेश्वर, सुधीर बेडेकर, सुदा कऱ्हाडे, नारायण देसाई, भालचंद्र फडके, नलिनी पंडित, सदाशिव आठवले, वा. ना. कुबेर, केशव मेश्राम, रावसाहेब कसबे लाल करण्यात आघाडीवर आहेत. आंबेडकरी ध्येयवादास हा वाढता धोका असून समांतर साहित्याच्या नावानं तो भारतीय पातळीवर वाढविल्या जात आहे. डॉ. बाबाहेब आंबेडकरांनी दिलेला साम्यवादापासून सावध राहण्याचा इशारा समजून न घेतल्यामुळे हे घडून येत आहे.

५७. आंबेडकर अनुयायांची जीवन विषयक भूमिका ठाम, निश्चित आणि निर्णायकपणे जगजाहीर असली पाहिजे. आणि साहित्यिकांनी तर सर्व प्रथम साहित्यासह आपली भूमिका किंवा भूमिकेसह साहित्य किंवा साहित्यातून भूमिक किंवा भूमिकेतून साहित्य स्पष्टपणे भांडणे आवश्यक आहे. कारण पुरोगामी म्हणविणारे तसेच मार्क्सवादाच्या कच्छपि लागलेले लोक साहित्याच्या क्षेत्रात पदार्पण करणाऱ्या नवजात साहित्यिकांना मार्क्सवादाची दिक्षा देण्याच्या

हेतूने टपुन बसलेले असतात. असा कुणी दिसला ते दिसला की केलाच त्याचा उदोउदो, केलीच त्याची लाल, लालीलाल. नामदेव ढसाळांच्या 'आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र प्रियदर्शिनी' ची प्रस्तावना, प्रकाश खरातच्या निर्मितीचा प्रदेशची प्र. श्री. नेरुरेकर लिखित भोंगळ प्रस्तावना, तुही इयत्ता कंची हया नामदेव ढसाळांच्या तसेच काव्यसंग्रहाची केशव मेश्रामांची डुलती प्रस्तावना, तसेच प्रल्हाद चेंदवण करांच्या 'ऑडिट'ची यशवंत मनोहरांच्या 'उत्थानगुंफा' ची प्र. इ. सोनकांबळेच्या आठवणीचे पक्षी या पुस्तकांना लिहलेल्या बाबुराव बागूलांच्या प्रस्तावना कशाच्या द्योतक आहेत. तसेच 'छावणी हलते आहे' हया अर्जुन डांगळेच्या काव्य संग्रहाची दया पवारांची प्रस्तावना तसेच 'कोंडवाडचा' चे दया पवारांचे मनोगतातून जागतिक जाणीवेची दोलायमानताच दिसून येते.

वैश्विक जाणिवेचा प्रेरणेचा खुळखुळा या लोकांनी तयार केला असून कोणत्याही नविन उदयोन्मुख साहित्यिकाच्या कानाजवळ वाजविण्यास ते टपून बसलेले असतात. टपून बसणें आणि असणे ही त्यांच्या प्रचाराचीच मांजरलीला आहे. असा कुणी नवजात साहित्यिक दिसला की हा खुळखुळा ते अशा तऱ्हेने वाजवितात की बिचारा फशी पडतो. मार्क्सवादाचा अभ्यास हा व्हायला हवा पण सद्सद्विवेकबुद्धि जागी ठेऊन हरवून नव्हे. तर हा बिचारा वैश्विक जाणीवेने पुरा गोंधळून जातो. इथे हे लक्षात घेतले पाहिजे की बुद्धाचा मानवतावाद हा वैश्विकतेचा पुरस्कार करणारा असून मानवी जीवनाच्या पुनरुत्थानासाठीच तो आहे.

० ० ०

निकाय : सात

५८. ख्रिस्तीधर्म साहित्यात, इस्लामधर्म साहित्यात, हिंदुधर्म साहित्यात वैश्विक जाणीवा आहेत. ह्या वैश्विक जाणीवा व प्रेरणा बुद्धिवादाऐवजी दैववादाशी नाते जोडून व्यक्त झालेल्या आहेत. दैववाद हा त्यांचा अविभाज्य भाग आहे. आणि ह्या दैववाने बुद्धिवादावर अनेकदा कुरघोडी केलेली आहे. कुराण सांगेल ते प्रमाण, बायबल सांगेल तेच खरे आणि गीता तर ईश्वराचा अनुघंलनीय शब्द आहे, असे मानले गेले आणि आणि तसे मानले गेल्यामुळेच समाज गनिशीलता हरवून स्थितीशील बनला. आणि ह्या स्थितीशीलतेला कारण ठरलेल्या फाजिल परंपराभिमानापायी ह्या देशाचे तुकडे पडले आहेत. दैववाद्यांनी हे समजून घेतले पाहिजे.

कुराणाला जे मानणार नाहीत ते इस्लामियांच्या दृष्टिने काफीर ठरले. बायबल विरोधी बोलून ज्यांनी सत्याचा आग्रह धरला आणि बायबल खोटे ठरविले, त्यांना जगतावर प्रेम करा सांगणाऱ्या येशू ख्रिस्ताच्या अनुयायांनी वधस्तंभा वर नेले. आणि 'चातुवर्ण्यं मयासृष्टी' असे सांगून गीतेने समाजाला जातीय विषमतेच्या खाईत लोटून संतांनाही भीक मागावयास लावली नि नीच ठरविले. अशा ह्या समाजाची धारणा करण्यास अपयशी ठरलेल्या व बुद्धिवादाला फाटा देणाऱ्या ख्रिस्ती, इस्लाम व हिंदुधर्माचा अव्हेर करून बौद्धधर्म डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी का स्विकारला हे समजून घेणे आवश्यक आहे.

याबाबत त्यांनी आचार्य अत्रेंजवळ आपले मनोगत व्यक्त केले होते. यावाबत अत्रेंनी नमूद करून ठेवले आहे की, ते (डॉ. बाबासाहेब आंबेडकर) म्हणाले की मी बुद्धाकडे का आकर्षित झालो हयाचे तुम्हाला कारण सांगतो. ख्रिस्ती धर्मामध्ये जीजस ख्राईस्ट म्हणतो की मला तुम्ही इश्वराचा पुत्र समजा, म्हणजे मी तुम्हाला इश्वराकडे घेऊन जाईन. आणि हे मानावयास तुम्ही तयार नसाल तर तुम्हाला इश्वराकडे जाता येणार नाही. महंमद पैगंबराची शिकवण अशीच आहे कीं, मीच इश्वराचा एकमेव प्रेषित असून मीच पहिला आणि अखेरचा आहे हे तुम्ही आधी कबूल केले पाहिजे. तरच मी ईश्वरापाशी तुमची रदबदली करू शकेन. अर्थात हे मानण्यास जे लोक तयार नाहीत, ते सारे काफीर गणले जातील. महंमद पैगंबर जेव्हा आसन्नमरण झाला तेव्हा त्याचे कांही शिष्य त्याला विचारू लागले, आपण कांही कांही गोष्टींचा अद्याप निर्णय दिलेला नाही. एखादी गोष्ट जर आम्हाला विचारावयाची असली तर आम्ही काय करावे आणि कसे वागावे ?तेव्हा महंमद पैगंबर म्हणाला "काफीर जसे वागतिल त्याच्या अगदी उलट तुम्ही वागत जा म्हणजे झाले" त्यावरून महंमदीय धर्मांत विचारस्वातंत्र्याला कितपत मुभा आहे हें तुम्हाला कळून येईल.

५९. आता हिंदुधर्माचा विचार करू 'यदायदा ही धर्मस्य ग्लानिर्भवती भारत, अभ्युत्थानाय धर्मस्य तदात्मानं सृजास्यहम.' म्हणजे धर्माची ग्लानी झाली, धर्म साफ बुडाला, अधर्माचे साम्राज्य मातले, म्हणजे इतकी भयंकर परिस्थिती निर्माण झाल्यावर मग तुमचा भगवान अवतार घेऊन येणार आणि पुन्हा धर्माची प्रस्थापना करणार. तोपर्यंत या गोष्टीवर विश्वास ठेवून आपण काय हात जोडून बसणार ? इकडे ' नर करणी करे, तो नरका नारायण हो जाय ' असे म्हणायचे आणि तिकडे नराच्या करणीला मुळीं वावच ठेवायचा नाही. सगळे नारायण करील असे म्हणायचे हयाला काही अर्थ आहे काय ?असल्या विसंगत विचारसरणीमुळे आपण कर्तव्यतत्पर होऊ शकत नाही. इश्वराच्या अवताराशिवाय स्वतःला काहीच करता येत नाही. असे तुम्हाला वाटतें म्हणूनच तुम्ही किंकर्तव्यमूढ झालेले आहांत, दुसरे काय ?

६०. याच्या उलट बुद्धाची शिकवण काय आहे ती पहा. बुद्धाचा धर्म हा खरा मानवी धर्म आहे. बुद्धाने आपण इश्वराचे अवतार आहोंत किंवा आपण त्याचे एकमेक पुत्र आहोंत, असें केव्हाही व कोठेही सांगितलेले नाही. म्हणूनच बुद्ध धर्म हा मानवी धर्म असून मानवाच्या संपूर्ण विकासासाठी तो निर्माण केला आहे. असें आम्हाला वाटते. आणि तो आमच्या सारख्या आधुनिक अद्ययावत असलेल्या प्रत्येक मनुष्याला चटकन पटू शकतो असा आहे. बुद्धाची शिकवण अगदी साध्या व स्पष्ट शब्दात मांडलेली आहे. धर्ममध्यें मनुष्याला पूर्ण वैचारिक स्वातंत्र्य दिलेले आहे व मानवतेला आणि सद्सद्विवेकबुद्धिला पटतील त्याच गोष्टी ग्राह्य मानण्यात आल्या आहेत." (कन्हेचे पाणी, खंड ४, पान ५०–५१ आचार्य अत्रे प्र. के.) हया विषयीची आपली मतं डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या बुद्ध मार्क्स आणि धम्माचे भवितव्य हया पुस्तकात व्यक्त केलेली आहेत. हया सर्व विवेचनातून स्पष्टच होते की, ख्रिस्तीधर्म, इस्लामधर्म, हिंदुधर्म डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विज्ञाननिष्ठ, भौतिकवादी व तर्कसुसंगत बुद्धिनिष्ठ भूमिका घेणाऱ्या बुद्धधर्माचा स्विकार करून नाकारले आणि आपल्या अनुयायांना बुद्धधर्ममार्गानुसार समाज परिवर्तनाचा आदेश दिला व मार्क्सवाद्यांनी बौद्ध वाङ्मयाचा अभ्यास करावा असे सुनावले आहे.

६१. आंबेडकरवादाचा व मार्क्सवादाचा समन्वय करण्यास निघालेल्या प्र. श्री. नेरुरकरांना हे माहीत नाही काय ? मग त्यांनी बाबुराव बागूलांची मुलाखत बुद्धाला शरण जात संपविली त्याचा अर्थ काय घ्यायचा ? खरे म्हणजे आंबेडकरवाद व मार्क्सवाद यांच्या समन्वयाचा प्रयत्न दलित साहित्याची व्यापकता स्पष्ट करण्यासाठी करुन त्यांच्यासारखे बुद्धिमंत उघड-उघड आंबेडकरद्रोह, साहित्यद्रोह व समाजद्रोहच करीत नाहीत का ? हयामुळे सम्यक परिवर्तनाकडे झेपावलेल्या वेगावलेल्या आंबेडकरी चळवळीतच अंतर्विरोध निर्माण होण्यास मदत होऊन प्रतिगाम्यांचे प्र. श्री. नेरूरकरांसारख्या पुरोगाम्यांच्या वैश्विक जाणिवा व प्रेरणाकडे ज्या क्रांतीगर्भ, क्रांती प्रवण व क्रांतीगामी भराऱ्या सुरू आहेत, त्यामुळे आयतेच फावते आणि

ह्या तथाकथित पुरोगाम्यांच्या भरांच्या फुलेंना कम्युनिष्ट ठरवायला निघाल्या असून त्यासाठीच फुलेंच्या 'गुलामगिरी' पुस्तकाच्या अर्पण पत्रिकेचा विश्व-जाणीवेशी ते संबंध जोडून दलित साहित्याचे वर्ण, वर्ग व रंगापलिकडचे विश्वव्यापकत्व स्पष्ट करतात. दलित साहित्यिकही जगभरचे विचारवंत, क्रांतिकारक, क्रांत्या, तत्वज्ञान, महापुरूष, या शतकाने दिलेली अनेक शस्त्रे स्विकारतात. आणि स्वत:चे उखळ पांढरे करून प्रस्थापित पुरोगाम्यांना आंबेडकरी चळवळीत व आंदोलकात धुडघूस घालण्यास रान मोकळे करतात अशा प्रकारे आंबेडकरद्रोहाची मालीकाच तयार झालेली आहे.

६२. डॉ. बावासाहेब आंबेडकर मार्क्सला शरण गेलेले नाहीत तर बुद्धाला शरण गेलेले आहेत हे पुरोगामी म्हणविणारे लोक समजून का घेत नाहीत. आणि समजून न घेताच आंबेडकरवाद व मार्क्सवाद यांच्या समन्व_ याची भाषा केली जात आहे. समन्वयाची भाषा करणारे बुद्ध मार्क्सला उत्तर देऊ शकतो हे जे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सिद्ध केलेले आहे ते समजूनच घेण्याच्या मनस्थितीत नाहीत असेच दिसून येत आहे. बुद्ध विरोधाची परंपरा चालविणारे प्रतिगामी लोक बुद्धतत्वज्ञानाबाबत जी दिशाभूल करीत बुद्धाची शिकवण नष्ट करीत आलेले आहेत तीच परंपरा आजचे पुरोगामी म्हणविणारे लोक आंबेडकरी मार्ग चुकीचा ठरविण्याचा आटापिटा करीत चालवित आहेत. "बुद्धाने जो पवित्रा घेतला तोच तुम्हालाही घ्यावा लागेल, केवळ शास्त्रांना झुगारुन तुमचा प्रश्न सुटणार नाही तर बुद्ध आणि गुरुनानकाप्रमाणे तुम्हाला त्यांचे पावित्र्यही अमान्य करावे लागेल. तुमच्यात जर काही घाणेरडे असेल तर तो तुमचा धर्म होय, या धर्मानेच तुमच्यात जातीच्या पवित्र्याची भावना निर्माण केली." (जातीभेद निर्मूलन पान ६०) असे बजावणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेला बुद्धमार्ग अभ्यासून न स्विकाणारे पुरोगामी लोक साहित्यिकांची दिशाभूल करीत त्यांना दलित ठरवित आहेत.

६३. डॉ. आंबेडकरांपासून प्रेरणा घेतलेल्या एखाद्या साहित्यिकाने भूकेचा प्रश्न हाताळला असेल तर त्या साहित्यकृतीबाबत विचार मांडतांना

प्र. श्री. बेरूरकरांना रशिया, चिली, क्यूबा वा इतर कोणत्याही (साम्यवादी) देशातील कवीचे भूक काव्य आठवणार. लागलीच ते तसे बोलणार. आणि मग भूक ही जागतिक आहे, दलित साहित्य भूकेचा प्रश्न हाताळते. म्हणून दलित साहित्य जागतिक साहित्य आहे, असे बाबुराव बागूल म्हणणार नि एखाद्या उद्योन्मुख साहित्यिकाच्या पुस्तकाला आंबेडकर विरोधी विचार-युक्त प्रस्तावना लिहणार. मग ही अपरिपक्व पोरं 'ब' बदकाचा 'ब', असे पाठ गिरविणाऱ्या पोरासारखे दलित जनतेची बाजू घेणारे जगातील सर्व विचारवंत आमचे आदर्श असे काहीबाही आदर्श स्विकारून काहीबाही होत जगातील सर्व विचारवंत स्विकारून आंबेडकरी प्रेरणा आणि प्रवाह बाजूला सारतात. अशा हया दलित साहित्यिकांच्या साहित्यकृती विषयी विचार मांडतांना प्र. श्री. नेरूरकरांना क्रांतीचा रणढोल वाजविणारा माय-कोव्हस्की आठवणार, हया आठवणीला ते पाब्लोनेरूदा, गॅब्रियल सेलाया. वुईल्यम एववर्ड, बर्गाहर्ड ब्चुबाईच्या साहित्यकृतींची जोड देणार मग हया कवीच्या कवितेतील ही ओळ वाचून मला त्या साम्यवादी कवीची ती ओळ आठवते, ती अशी आणि लागलीच ते वाचून दाखविणार. हया कवीचे काव्य महाकाव्याच्या जवळपास क्रांतिनिष्ठ जाणीवा घेऊन फेरफटका मारू लागलें आहे, असे काहीबाही विचार मांडले म्हणजे हा गडी लागलाच मनात मांडे खायला, मांडया बरोबर विचारवंतपणाच्या माडया चढायला लागलेल्या हया नवोदित साहित्यिकाला ते साम्यवादाची दिक्षा देण्यात यशस्वी ठरतात. पुरोगाम्यांच्या हया यशस्विततेतच दलित साहित्याची दिशाहिनता दिसून येते. पण दलित साहित्यिकांचं भावडंपण असं की त्यांना हे कळून येत नाहीय म्हणून ते असल्या आंबेडकरद्रोही पुरोगाम्यांची जवळीक साधून आहेत.

६४. विश्वप्रेरणा व जाणीवाबाबत विचार मांडणाऱ्या प्रस्थापित पुरो गाम्यांनी प्रत्येक धर्माला तत्वज्ञानाला वादाला स्वतःचं असं स्वयंभूपण असतं हे लक्षात घेणे आवश्यक आहे. इस्लामधर्म, ख्रितीधर्म, हिंदुधर्म समाज जीवनाचा विचार आपआपल्या रूढी रितीरिवाज आचारविचार यांच्या चाकोरीतूनच करतात. तसेच मार्क्सवादाचाही समाज परिवर्तनाचा निश्चित

असा मार्ग आहे. तसाच बुद्धधर्माचाही भौतिकवादी विज्ञाननिष्ठ असा बुद्धिनिष्ठ मार्ग आहे. पुरोगाम्यांना अभिप्रेत आंबेडकरवाद व मार्क्सवाद यांचा समन्वय शक्य आहे का? हया प्रश्नाचं उत्तर नकारात्मक आहे. मार्क्सवादाच्या अपयशाची लक्तरं देशादेशाच्या वेशीवर टांगली गेलेली आहेत. आणि साम्यवादी समाजरचना प्रस्थापित करण्याचा मार्क्सचा मार्गही गोधडीच्या लक्तरागत ठरला आहे. भारतीय समाज व्यवस्थेच्या संदर्भात मार्क्सवाद लागू करुन जातीबद्ध समाजात परिवर्तन अशक्य असून त्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धधम्ममार्ग दिला आहे. आणि बुद्धमार्गानेच खरें परिवर्तन घडून येईल आणि तेच मानवी जीवन संस्कृतीच्या संवर्धनास पोषक ठरेल असे निर्णायकपणे सांगितले आहे. हे मार्क्सवाद्यांनी समाजवाद्यांनी आणि दलित व पुरोगामी साहित्यिकांनी समजून घेणे आवश्यक आहे.

० ० ०

निकाय : आठ

६५. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'राजकीय क्रांत्या नेहमीच सामाजिक आणि धार्मिक क्रांत्याच्या नंतरच घडून आलेल्या आहेत. हा इतिहासाचा सिद्धांत आहे' (जातीभेद निर्मुलन पान १४) हा सिद्धांत मांडून उदाहरणासह सिद्ध केला आहे. तसे करतांना त्यांनी सांगीतलेले आहे की चंद्रगुप्ताच्या नेतृत्वाखाली घडलेल्या राजकीय क्रांतीच्या आधी बुद्धाची धार्मिक आणि सामाजिक क्रांती होऊन चुकली होती. त्या क्रांतीने राजकीय क्रांतीस पोषक समाजमन सांस्कृतिक क्रांती घडवून तयार केले होते. हे स्पष्ट केले आहे. तसेच जग आणि जीवन बदलणारे धम्मचक्र प्रवर्तन घडवून जगाला जीवनमार्ग दिला आहे. असे असतांना ह्या सर्व क्रांतीकारी घटनांची दखल न घेता त्याकडे दुलक्ष करीत दलित शब्दा भोवती घिरटया घालीत दलित साहित्यिक काय साध्य करीत आहेत ? खरे म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेले उद्दिष्ट आणि त्या उद्दिष्टाप्रत जाण्याचा मार्ग या विरोधीच ते वाटचाल करीत आहेत.

६६. दलित साहित्यिकांनी स्विकारलेल्या मार्गानुसार ज्या देशांमध्ये साम्यवादी शासनसत्ता प्रस्थापित झाल्या आहेत, त्यांनी मानवी जीवनाची भौतिक उन्नती साधतांना जीवन आणि मरणाचे, मूलभूत हक्काचे, मानवी मूल्यांचे प्रश्न उपस्थित करून गुलामगिरीचे नवे पर्व सुरू केलेले आहे. म्हणूनच साम्यवादी विचारसरणीचा त्यांचा मार्ग अघोरी ठरला असून

आंबेडकरी ध्येयवादाच्या विरोधी आहे. खऱ्या अर्थाने सामाजिक पुनरूत्थानासाठी सत्ता हस्तगत करणे अत्यंत आवश्यक आहे. हे ओळखून त्या विषयी जाणीव करून देतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटलेले आहे ' आपले उद्दिष्ट काय आहे ते नीट समजून घ्या. शासनकर्ती जमात बनणे हेच आपले उद्दिष्ट व आकांक्षा आहेत. हे तुमच्या घराच्या भितीवर कोरून ठेवा, म्हणजे दररोज तुम्हाला आठवण राहील की ज्या आकांक्षा आपण उराशी बाळगून आहोत. ज्यांच्यासाठी आम्ही लढत आहोत ते काही लहान-सहान संकुचित ध्येय नाही. (थोडचाशा नोकऱ्यासाठी किंवा सवलतीसाठी आपला लढा नाही.) आमच्या अंत:करणातील आकांक्षा फारच मोठ्या आहेत. शासनकर्ती जमात बनणे हीच ती आकांक्षा होय. ती प्रत्यक्षात उतरविण्यासाठी केवढे भगीरथ प्रयत्न करावे लागतील ते मग तुमच्या ध्यानात येईल.' (भाषणे खंड १ पान ११२ । ११३ संपा. मा. फ. गाजरे) दलित साहित्यिक व चळवळीवाले शासनकर्ते बनण्यासाठी जो मार्ग अनुसरताहेत तो सत्ताधाऱ्यांच्या गोटात शिरायचे नि गोंधळ निर्माण करुन सत्ता हस्तगत करण्याचा अघोरी मार्ग आहे अर्थात हा मार्ग कम्युनिझमाचा आहे, हे स्पष्टच आहे.

६७. कम्युनिस्टांच्या अशा धोरणांचे उदाहरण म्हणून सिरिल ई. ब्लॅक यांनी अचूक निदान केले आहे की, ' जनतेच्या मागण्याचा फायदा उठवून सत्ता हस्तगत करण्यासाठी कम्युनिस्टानीं केलेल्या प्रयत्नांचे अतिशय उद्‌बोधक उदाहरण कोठले असले तर ते कम्युनिस्टांनी संयुक्त महाराष्ट्र समितीत सामील होणे हे होय.' (साम्यवाद आणि क्रांती पान ३ अनु. नाना जोशी) हया उदाहरणा प्रमाणेच दलित साहित्यिकांचे चळवळीवाल्यांचे धोरणही सर्वसमावेशक असलेल्याचे त्यांच्या दलित वैचारिकतेतून व कृतिशिलतेतूत दिसून येते. त्यांनी त्यांच्या घराच्या भितीवर मार्क्सला अभिप्रेत आर्थिक क्रांती प्रस्थापित करण्यासाठी सम्यक दलित क्रातीचे ध्येय लिहलेले आहे. त्यांचे सारे प्रयत्न त्यासाठीच सुरू आहेत. मग तसे करतांना आंबेडकरद्रोह करण्याची वेळ आली तरी हरकत नाही असे धोरण त्यांनी

ठेवले आहे. त्यांनी त्यांचा मेंदू साम्यवादी संस्था कडे गहाण टाकला असून आंबेडकरी चळवळीचा सत्यानाश करण्यात आज ते आघाडीवर आहेत.

६८. जगातील सर्व विचारवंत सर्व क्रांत्या या शतकाने दिलेली अनेक शस्त्रे तसेच अनेक वैश्विक प्रेरणा स्विकारून दलित साहित्यिक दलित सम्यक क्रांतीच्या साध्यतेसाठी निघाले आहेत. ही सारी अगडबंब आयुधं घेऊन ते अनिश्चितनेकडे वाटचाल करीत आहेत. म्हणून आंबेडकरी अनुयायास व तमाम जनतेस दलित साहित्यिकांपासून व पक्षांपासून सावध रहा असे सांगण्याची वेळ आली आहे. अशावेळी कम्युनिस्ट पक्षापासून सावध रहा असे सांगणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आठवताहेत. तसा इशारा देतांना त्यांनी म्हटले आहे, 'कम्युनिस्ट पक्षापासून सावध रहा असे माझे तुम्हाला सांगणे आहे. कारण गेल्या काही वर्षातील त्यांच्या कृत्यावरून ते कामगारांचे अहित करीत आहेत. किंबहूना ते त्यांचे शत्रू आहेत अशी माझी खात्री झाली आहे. काँग्रेस भांडवलवाल्यांची संस्था आहे. असे कम्युनिस्ट सांगतात. आणि त्याच वेळी कामगारांना तीत प्रविष्ट होण्याचा उपदेश करतात. हिंदुस्थानातील कम्युनिस्टांना त्यांचें असे काही धोरणच नाही. त्यांना सर्व स्फूर्ती रशियातून मिळते." (भाषणे खंड १ पान १४८ संपा. मा. फ. गांजरे) म्हणून 'दलित साहित्यिकांपासून व पक्षांपासून सावध रहा असे माझे तुम्हाला सांगणे आहे. कारण गेल्या काही वर्षातील त्यांच्या कृत्यावरून ते दलितांचे अहितच करीत आहेत. किंबहूना ते त्यांचे शत्रू आहेत अशी खात्री झाली आहे.

६९. बुद्धधम्म आर्थिक क्रांती घडवून आणण्यास असमर्थ आहे असे दलित साहित्यिक व त्यांचे साथी सांगतात. आणि त्यावेळी आंबेडकरी अनुयायांना साम्यवादात समाविष्ट होण्याचा उपदेश करतात ! भारतातील दलित साहित्यिकांना व पंढपुरी पुरोगाम्यांना त्यांचे अो काही धोरणच नाही. त्यांना सर्व स्फूर्ती रशियातून मिळते.' अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारात थोडा फार फरक करून ते मांडल्यास दलित साहित्यिकांच्या आंबेडकरद्रोही व राष्ट्रद्रोही विचारसरणीपासून सावध

राहण्याचा अचूक इशारा देता येतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून प्रेरणा घेऊन तीन तीन हात उड्या मारणाऱ्या दलित चळवळीच्या नेतृत्वाचे कतृत्व धोरण 'जाऊ तिथं मार खाऊ' असे ठरले असून भिजत्या घोंगड्यावर त्यांचे पड खाऊ दलित राजकारण सुरू आहे. त्यांच्या सहित तमाम जनतेस आम्ही सांगू इच्छितो की दलितांच्या प्रबुद्ध परिवर्तनाआड येणाऱ्या लोकांच्या विरोधी आमचे धोरण 'जाऊ तिथं आग लावू' हे असेल. ते दलित नसेल तर बुद्धिस्ट असेल. यातील मर्म जाणकार जाणतील आणि ते अचूकपणे मांडले आहे हे ते मान्य करतील. आंबेडकरी आंदोलकांना व समाजास दलित साहित्यिकांपासून व पक्षांपासून सावध रहा असा निर्वाणीचा इशारा देण्याची ही वेळ आहे. कारण दलित साहित्यिकांची व त्यांच्या पुरोगामी म्हणविणाऱ्या मिस्टर पं. पु. साथीदाराची वैचारिकता आणि कृतिशिलता बौद्धधम्मक्रांतीस घातक ठरत आहे. बौद्धधम्मक्रांती गतिमान करण्यासाठी त्यांच्या कट कारस्थानांची धुळधाण करणे ही आजची गरज आहे. आंबेड कर अनुयायी तसे करणार आहेत की नाही, हाच मुख्य प्रश्न आहे.

७०. दलित साहित्यिकांची वैचारिक वाटचाल दलित क्रांतीसाठी अस्मानात नजर लावून जमिनीपासून दोन हात वरुन सुरू आहे, असेच म्हणणे उचित होईल. बौद्धधम्मक्रांती समजून न घेता जगातील सर्व तत्वज्ञान स्विकारून दलित क्रांतीची कल्पना मांडणाऱ्या दलित व पुरोगामी साहित्यिकांच्या चळवळीची दयनिय अवस्था झालेली आहे. जगातील सर्व विचारवंत महापुरूष अर्थात दलित जनतेची बाजू घेणारे, सर्व क्रांत्यां, विचार, तत्वज्ञान, आयुधं स्विकारणाऱ्या दलित वैचारिकतेनुसार कष्टाळूच्या हितासाठी त्यांच्या विरोधकांना अर्थात साम्राज्यवाद्यांना, भांडवलदारांना, सरंजामशाहीवाद्यांना, जमिनदारांना, कारखानदारांना, फँसिस्टवाद्यांना, वठणीवर आणित ते दलित क्रांतीच्या यशस्वीतेंसाठी संघर्ष करताहेत. खरे म्हणजे ते विध्वंसक मृगजळामागे लागले आहेत. आणि फँसिस्टवृत्तीचे पुरोगामी बौद्धधम्मक्रांतीच्या विरोधी प्रतिक्रांतीसाठी त्यांचा वापर करून घेताहेत. दलित वैचारिकता मांडणाऱ्यांना तिचे उदात्तिकरण करीत उदो उदो

करणाऱ्या पुरोगाम्यांना त्यांच्या व आम जनतेच्या भल्यासाठी तसेच बौद्ध-धम्मक्रांतीच्या गतीशीतेलसाठी चौफेर चढाईचे धोरण ठेवून वठणीवर आणल्याशिवाय आम्ही राहणार नाही. कारण त्यांचे साहित्य आणि चळवळ अराष्ट्रीय निष्ठा स्विकारून फॅसिस्ट शक्तिशी हात मिळवणी करीत आहेत.

७१. दलित क्रांतीचा विचार मांडणाऱ्या दलित व पुरोगामी लोकांनी समस्याप्रधान आर्थिक समता निर्माण करणाऱ्या मार्क्सवादातून उद्‌भवणाऱ्या जटिल समश्यांकडे दुर्लक्ष केले आहे. येथे कधीकाळी कम्युनिस्ट चळवळीत वावरलेल्या सुधीर फडक्यांचे विचार दखल पात्र ठरतात, ते म्हणतात, 'शोषणामुळे उध्वस्त झालेला माणूस जिवंत आहे. गुंतागुंतीचे असले तरी त्याचे मन संस्कारक्षम आहे. साम्यवादी तत्वज्ञानावर आधारलेली संघटना बांधतांना 'माणूस' जर गमावला गेला तर ती संघटना यांत्रिक बनते व तिला नोकरशाहीचे स्वरूप येते.' (कोठे आणि कधीतरी, सुधीर फडके) दलित व कष्टकरी जनतेच्या हितासाठी साम्यवादाचा मार्ग सांगणा-या कार्ल मार्क्सने ध्येय साध्यतेसाठी कामगारांच्या हकूमशाहीची आवश्यक्ता सांगितली. ही हुकूमशाही नोकरशाही ठरल्यामुळे आज साम्यवादी देश हिंसा, दडपशाही, दहशतवादात जीवन कंठीत आहेत. रशियातील स्टॅलिनच्या राजवटीचा इतिहास आणि अंत सर्वश्रूत आहेच. सह-अस्तित्वाच्या मार्क्सच्या तत्वालाच ठोकरून १९६२ चे भारतावरील माओचे विश्वासघातकी अतिक्रमण ही वाढती जखम असून हे चिकित्सकपणे जाणून न घेता साम्यवाद उत्स्कुर्तपणे स्विकारणाऱ्या दलित व पुरोगामी साहित्यिकांनी पुढील विवेचन समजून घेणे अंतर्मुख होणे आणि मार्क्सवादाची मर्यादा मान्यकरून आंबेडकरी ध्येवादाची न्याय्य बाजू घेणे आवश्यक आहे. अन्यथात्यांच्यासहित त्यांच्या दलित क्रांतीची दुर्दशा झाल्यांशिवाय राहणार नाही

७२. हुकूमशाहीलाच लोकशाही म्हणत, क्रांतीची कोठारं म्हणजे कामगारवस्त्या भांडवलशाही विरूद्ध जाग्या करीत, अतितटीचा लढा देत मार्क्सवादाची रशियात प्रस्थापना करणाऱ्या लेनिनचे पश्चाताप दग्ध उद्‌गार लक्षात घेण्यासारखे आहेत. 'लेनिन' हया ग्रंथात वि. स. वाळिंबे स्पष्ट-

पणे म्हणतात, " ज्याच्या नावाने आपण ही राजवट प्रस्थापित केली त्या कामगारवर्गावर आपल्या हातून अन्याय घडला आहे, असे त्याला वाटू लागले होते. पददलित जनतेसाठी आपण स्वर्ग निर्माण करत आहोत असा त्याचा क्रांतीनंतरचा दावा होता. पण गेल्या वर्षभरात शांतता प्रस्थापनेच्या नावाखाली कम्युनिस्ट राजवटीने हजारो कामगारांचे हत्याकांड घडवून आणले होते. त्यामुळे लेनिनच एकदा म्हणाला होता, 'रशियन कामगारांच्या न्यायासनासमोर मी गुन्हेगार ठरेन असं मला वाटू लागलं आहे. ' (होल्गा लाल होते 'लेनिन' पान ४०३) लेनिनचे हे पश्चाताप दग्ध उद्‌गार मार्क्स-वादाचा स्टॅलिन-माओवादी इतिहास लक्षात घेता अंतर्मुख करणारेच आहेत. पण दलित व पुरोगीमी साहित्यिक अंतर्मुख होणार आहेत की नाही हा खरा प्रश्न आहे. लेनिनप्रमाणे हताश आणि पश्चाताप दग्ध उद्‌उार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी काढलेले नाहीत. त्यांचे कतृत्वाला बुद्ध तत्वज्ञानाचे अधिष्ठान होते. म्हणूनच त्यांनी म्हटलेले आहे की, ' जर माझ्या मनात द्वेष असता नि सुडाची भावना असती तर पाच वर्षाच्या आत मी हचा देशाचे वाटोळे केले असते.' आणि त्यांनी हचा देशाचे वाटोळे केले नाही की इतिहासात ते विध्वंसक म्हणून अमर झालेले नाहीत. तर बौद्धधम्मक्रांती घडवून बुद्धमार्गानुसार मानवी कल्याण करणारे करण्यास समर्थ युगपुरूष महान मानवतावादी ठरले आहेत. दलित साहित्यिकांनी आणि त्यांच्या पुरोगामी म्हणविणाऱ्या साथीदारांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची क्रांतीकारी वैचारिकता, मानवी जीवन विषयक दुरदृष्टि जाणून घेणे आवश्यक आहे. बौद्धधम्मक्रांतीचे मोल ओळखून तिची न्याय्य बाजू सद्‌सद्‌विवेक बुद्धि जागी असेल तर ते खचित घेतील. ती त्यांना घ्यावी लागेल.

७३. हत्तीला अंकुशाच्या सहाय्यान स्वतःच्या अंकित ठेवणाऱ्या माहुताप्रमाणेच अर्ध्या जगावर पसरलेल्या साम्यवादी वणव्याला तमाम आंबेडकर अनुयायी व जगभरचे बौद्ध, बौद्धधम्मक्रांती मार्गानुसार स्वतःच्या अंकित करून त्याला आळा घालून,' प्रत्येकाचा स्वायत्त विकास शासनांकित करीत मानवी मूलभूत हक्क हिरावून घेणाऱ्या साम्यवादाची हुकूमशाही

नष्ट करून तेथे अखिल मानवजातीच्या उद्धारास समर्थ असलेल्या आंबेडकरी ध्येयवादावर अर्थात बौद्धतत्वज्ञानावर अधिष्ठित लोकशाही नि राज्य-समाजवादी शासनसंस्था प्रस्थापित करतील हे त्यांचे ध्येय आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी बौद्ध तत्वज्ञानाचा स्विकार केलेला आहे व हा मार्ग आपल्या अनुयायांना दिला आहे. वेदात मार्क्सवाद शोधणाऱ्या पुरोगाम्यांनी मिनाक्षिपूरम येथील धर्मांतराने झोप उडालेल्या व दलितांनी मूसलमान होऊ नये म्हणून हरिजन धर्म स्विकारणाऱ्या हिंदुनी, दलित धर्मांची कल्पना मांडून बागडणाऱ्या रवीद्र बागडेनीं तमाम भारत वासियांनी बौद्धधम्म-क्रांती समजून घेणे व स्विकारणे त्यांच्या व ह्या देशाच्या दृष्टिने भल्याचे ठरणार आहे. हा आमचा विश्वास आहे. हा विश्वास उरात घेऊन आम्ही विविधतेने नटलेल्या गरीब लोकांच्या हचा श्रीमंत देशात तमाम जनतेच्या आणि देशाच्या श्रीमंतीसाठी संघर्षशील आहोत.

७४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वर्ततिलेली भाकितं वेळोवेळी खरी ठरली आहेत. पाकिस्तानबाबत त्यांनी जे भाकित वर्तविले ते पाकिस्तानची निर्मिती होऊन खरे ठरले. धर्मांतराबाबतही तसेच घडले आणि घडत आहे. भारताला साम्यवादी देशांपासून सावध राहण्याचा व लौकशाहीवादी देशाशी संबध ठेवण्यावाबत त्यांनी वेळोवेळी इशारा दिला. त्यासाठीच पंडित नेहरूंच्या साम्यवादी देशांकडे झुकत्या पररराष्ट्रीय धोरणावर त्यांनी लोकसभेत कडाडून हल्ले चढविले. आणि अखेर तिबट बाबतचे त्यांचे भाकितही खरे ठरले. पंचशिल करार करुनही बासष्टचे युद्ध भारतावर लादून कार्ल मार्क्सच्या सह– अस्तित्वाच्या तत्वालाच सुरूंग लावणाऱ्या माओवादाच्या व बासष्टच्या देशावरील चीनी अतिक्रमणाबाबत तोंड शिवून बसलेल्या अराष्ट्रीय पुरोगाम्यांच्या नादी लागून साम्राज्यवाद व सरंमजाशाही हे दोन डोंगर हलविण्यासाठी मुर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविले व डी नावाच्या माण्सा अशा प्रकारच्या चेअरमन माओ व पोथ्या पुराणात मार्क्सवाद शोधणाऱ्या कॉम्रेड डांगेवर कविता लिहिणारे नामदेव ढसाळासारखे साहित्यिक आज मानावर येत आहेत ही स्वागतार्हय बाब आहे. बाकी नामदेव साळूबाई ढसाळ हे ठिक आहे.

७५. पाकिस्तानबाबत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वर्तविलेले भाकित जसे खरे ठरले तसेच त्यांचे तिबेट बाबतचे भाकितही खरे ठरले. तसेच भारताला जगात मानाने जगावयाचे असेल तर बौद्धधर्माचाच अंगिकार करावा लागेल. जगाला बौद्धधर्माचीच कास धरावी लागेल. ही त्यांनी वर्तविलेली भाकित. ही खरी ठरत आहेत आणि ठरणार आहेत.

० ० ०

निकाय : नऊ

७६. दलित चळवळीच बळ कायम टिकवून धरण्यासाठी. 'एखादी कथा किंवा कविता एखाद्या वादात बसविणे आवश्यक असल्याची गरज अर्जुन डांगळे व्यक्त करताहेत. खरे म्हणजे परिवर्तनासाठी लेखकाने वाद स्विकारून लिखाण करणे आवश्यक असते. लेखकाने स्विकारलेला वाद, परिवर्तनाची प्रेरणा जाहीर असली म्हणजे त्याची कथा किंवा कविता वादात बसविण्याची गरज निर्माण होत नाही. जो अप्रस्तुत वाद ते व्यक्त करताहेत तो वाद ठरतो. पण या वाद विषयातून वेगळाच प्रश्न निर्माण होतो तो म्हणजे एखादी कथा किंवा कविता एखाद्या वादात कोण आणि कशी बसविणार. वाचक जर एखाद्या लेखकाची कथा किंवा कविता एखाद्या वादात बसविण्याचा प्रयत्न करेल तर तो प्रयत्न लेखकावर अन्याय ठरण्याचीच शक्यता अधिक आहे. म्हणजे तो संभाव्य अन्याय टाळण्यासाठी आणि त्याही पेक्षा महत्वाचे म्हणजे परिवर्तनासाठी लेखकाने वाद स्विकारूनच साहित्य निर्मिती करणे आवश्यक असते. आणि वाद न स्विकारत साहित्य निर्मिती करणाऱ्या लेखकाने सामाजिक दायित्वाच्या जबाबदारीचे भान ठेवणे आणि त्या जबाबदारीतून साहित्य निर्मिती करणे आवश्यक आहे. माझ्या मते समाज परिवर्तनासाठी लेखकाने साहित्यासह वाद किंवा वादासह साहित्य किंवा साहित्यातून वाद किंवा वादातून साहित्य निर्मिती करणे आवश्यक आहे.

७७. ॲडेंटीटीचे भान ठेवून साहित्य निर्मिती व साहित्यांची समीक्षा आणि समिक्षेतून ॲडेंटीटीचा विकास वा प्रचार साधणे ही तेवढेच महत्वाचे आहे आणि ही जवाबदारी साहित्यिकांची आहे. याचे उदाहरण म्हणजे प्रा. अरुण कांबळे लिखित ' रामायणातील सांस्कृतिक संघर्ष ' हा प्रबंध होय. ह्या प्रबंधास नाक नसलेले लोक जेव्हा नाक मुरडण्याचा प्रयत्न करतात, तेव्हा अशांची भोकच अधिक उघडी पडतात. कारण हा प्रबंध ॲडेंटीटीतून निर्माण केला गेला आहे. ॲडेंटीटी हेच ह्या प्रबंधाचे सामर्थ्य आहे. तर ह्या प्रबंधात त्यांनी नवीन काहीच सांगितले नाहीय असे हे लोक म्हणतात. आणि तसे असेल तर तेच खरे ह्या प्रबंधाचे वैशिष्टच आहे आणि ह्या वैशिष्टचामुळेच जर ह्या प्रबंधाची सर्व थरातील लोकांकडून उलटसुलट चर्चा होते, तर त्यांनी आणखी नवीन काही सांगण्याचा स्तुत्य प्रयत्न केल्यास काय होईल याचे अनुमान करायला हरकत नाही· पण गांडुळ आणि भोकबाज विचारवंतांना त्याचे काय ? त्यावरही ते त्यांनी नवीन काहीच सांगितले नाही असा शेरा मारून आपल्या छक्केबाज षटकोनी भूमिकेसच प्रामाणिक राहतील, हे आम्ही जाणून आहोत.

७८. डॉ. म. ना. वानखेडेंच्या विचारानुसार हा प्रबंध म्हणजे Mythचे dustruction करणारा ठरतो आणि तसा तो आहे असे माझे मत आहे. हा प्रबंध लिहून त्यांनी शेंडचा कापणाऱ्या आणि जाणवीं तोडणाऱ्या पेरियारांच्या कामगिरी इतकीच महत्वाची कामगिरी केलेली आहे. महाभारताचे debunking करणाऱ्या आनंद साधल्यांच्या पद्धतीपेक्षा अरुण कांबळेंची Ramayan ची debunking ची पद्धत अधिक वैशिष्टचपूर्ण आणि प्रभावी आहे. ते फक्त त्यांचेच Interpretation नाही तर इतरांचे Interpretation प्लस त्यांचे Interpretation इज इक्वल टु रामायणातील सांस्कृतिक संघर्ष हा प्रबंध आहे.

७९. ॲडेंटीटीचे भान न ठेवता लिहिलेला समीक्षा ग्रंथ म्हणजे शंकरराव खरातांचा ' दलित साहित्य प्रेरणा व प्रवृत्ती, तर ॲडेंटीटीचे भान

ठेवून लिहिलेला समीक्षा ग्रंथ म्हणजे विजय सोनवणेंचा दलित साहित्य का नको ? हा ग्रंथ आहे.

८०. अरुण कांबळेना मी विचारले तुमचे 'रामायणातील सांस्कृतिक संघर्ष, हे पुस्तक म्हणजे १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडवून आणलेल्या बौद्धधम्मक्रांतीचा एक भाग आहे, असे, माझे मत आहे हे तुम्हाला मान्य आहे काय ? यावर त्यांचे 'होय' हे उत्तर मिळाले हा होकार हिच ती बुद्धिस्ट अॅडेंटीटी. मग आंबेडकरी चळवळीस गालबोट लावणारी त्यांची दलित चळवळीची दिशाहीन उठबस आणि उठाबशा कशासाठी असा माझा त्यांना जाहीर सवाल आहे. नागडयांबरोबर उघडं होऊन नाचणारे आम्ही नाचरे नव्होत. कारण आम्हाला आंबेडकरी अॅडेंटीटीचे परिपूर्ण भान आहे. ज्यांना ते नाही त्यांना आम्ही भानावर आणणार आहोत.

८१. अर्जून डांगळे म्हणतात, "अण्णाभाऊ हे दलित जातीत जन्मले आणि मार्क्सवादी विचार घेऊन वाढले. 'जग बदल घालूनि घाव सांगून गेले मला भिमराव' हे लिहिणारे अण्णा भाऊ लाल झेंडा घेऊन हाती करायला इथे क्रांती मजुरांची पिढी नवी पाऊल टाकती !! हे सुद्धा लिहितात. मग अण्णाभाऊंना आपण नेमक्या कोणत्या तत्वज्ञानात बसविणार आहोत ?" (दलित साहित्य एक अभ्यास, निवेदन चौतिस) तर अशा हया प्रश्नात ते अडकले असून निरूत्तर झाले आहेत. दलित साहित्य कोणत्या वादात बसवावे या वैचारिक गोंधळात अडकलेले डांगळे अण्णाभाऊंना कोणत्या तत्वज्ञानात बसवावे याबाबतही भांबावून गेले आहेत. एकिकडे आंबेडकर आणि दुसरीकडे मार्क्स अशा द्विधा मनस्थितीत ते सापडले आहेत. जागतिक गप्पा मारणाऱ्या व करणाऱ्या हया दलित व पुरोगामी साहित्यिकांना हया प्रश्नाची समाधानकारक उत्तरं मिळत नाहीत. ही मोठया शरमेची गोष्ट आहे. आणि त्यामुळेच दलित वैचारिकता वैचारिक व्यभिचारास कारण ठरल्यास नवल ते काय ? ज्यांना आंबेडकरी बौद्ध बंडखोरीचे महानत्व कळले नाहीय, त्या दलित जनतेची बाजू घेणारे जगातील सारे

विचारवंत, महापुरुष, तत्वज्ञान विचार स्विकारणाऱ्या महाऱ्यानी दलित व पुरोगामी साहित्यिकांनी आधी निश्चित अशा तत्वज्ञानात बसावे आणि मग अण्णाभाऊंचा विचार करावा. तर असे हे प्रश्नांकित झालेले दलित व पुरोगामी साहित्यिक कुठे निघालेत तर 'दलितक्रांती' करायला. खरे म्हणजे जे लोक डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना समजून घेऊ शकलेले नाहीत ते इथली समाज परिवर्तनाची वैचारिकताही समजून घेऊ शकलेले नाहीत. दलित व पुरोगामी साहित्यिकांनीं डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना समजून घेतले असते तर भारतीय समाज परिवर्तनासाठी दलित जनतेची बाजू घेणारे जगातील सर्व विचारवंत आमचे आदर्श म्हणून जगभरच्या विचारवंताकडे त्यांनी घेतलेली धाव घेतली नसती व निश्चित वैचारिक अधिष्टाना अभावी त्यांची दिशाहीन झालेली वाटचाल दिशाहीन व एक ना धड भाराभर चिंध्या अशी झाली नसती.

८२. तर मुद्याचा प्रश्न असा की अण्णा भाऊंना कोणत्या तत्वज्ञानात बसविणार. या प्रश्नाचा विचार करतांना इथे हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, या देशातील कम्युनिष्ट जातीवाद आणि पोथीवाद यांच्या सीमा ओलांडू शकले नाहीत. म्हणूनच 'हि पृथ्वी शेषाच्या मस्तकावर बसली नसून दलितांन आपल्या तळहातावर पेलली आहे' अशी विज्ञाननिष्ट जाण व्यक्त करणाऱ्या अण्णाभाऊंना कम्युनिस्टांनी उपऱ्याचीच वागणूक दिली. तशी जर ती दिली नसती तर त्यांच्या जीवनाची झाली तेवढी परवड झाली नसती. त्यांच्या करूण दशेबद्दल गंगाधर पानतावणे लिहितात, " सिद्धार्थ नगरच्या आपल्या खोलीत रात्रीअपरात्री झिंगून येणाऱ्या अण्णाभाऊची दारिद्र्याने वाताहात केली. काही प्रकाशकांनीही त्यांच्या गरजेचा फायदा घेऊन लुबाडले. अण्णा भाऊंचा सतत तोल सुटत गेला. ते गेले तेव्हा त्यांच्या शेजारी कुणी कुणी नव्हते. अंथरुण नसलेल्या खाटेवर त्यांचा देह-किती तरी तास निपचित पडला होता. आयुष्यभर हे असे रखडणे सुरू होते. " (विद्रोहाचे पाणी पेटले आहे. पान ८८) अण्णाभाऊंच्या आयुष्याची शोकांतिका आपण कोणत्या तत्वज्ञानात बसविणार आहोत? मग

त्यांना तत्वज्ञानात बसविण्याचा आग्रह का ? आणि तसा प्रश्न तरी का ? तसा प्रयत्न करणे अन्यायजनक आहे. शोषितांविषयी कळवळा ही त्यांची जीवन निष्ठा होती. ती त्यांनी त्यांच्या साहित्यातून अभिव्यक्त केलेली आहे. आणि हचा जीवननिष्ठेशीच ते प्रामाणिक राहिलेले आहेत. हचा प्रामाणिकपणामुळेच आंबेडकरी लढचाचा स्विकार त्यांनी आपलाच लढा म्हणून केलेला आहे. तेव्हा त्यांना तत्वज्ञानात बसविण्याचा सवाल वाद झालेला सवाल आहे. या संदर्भात अर्जुन डांगळे व त्यांच्या सारख्यांनी राजा ढाले यांच्या १४ व्या बौद्ध साहित्य संमेलनाच्या मंचावरील अध्यक्षिय भाषणाची दखल घेतल्यास उचित ठरेल.

८३. ना घर का ना घाट का ठरलेले बाबुराव बागूल म्हणतात "प्रगत साहित्य सभेत मी होतोच. तिथेच दलित साहित्याच्या सूत्राचा आराखडा मी प्रथम वाचला त्यानंतर मी माझा हा विचार वा. ल. कुळकर्णी, अनंतराव भालेराव व पु. ल. देशपांडे यांना पत्रे लिहून कळवला. अजूनही काही लेखकांना कळविला असेल." (ऑडिट, पान १२) त्यांच्या हचा विचारातून प्रगत साहित्य परिषदेचे स्वरूप ध्येय निश्चित असे स्पष्ट होत नाही आणि तिथेच म्हणजे प्रगत साहित्य परिषदेतच त्यांनी दलित साहित्याचा आराखडा वाचला. ढालेंच्या विवेचनावरून प्रगत साहित्य परिषदेचे स्वरूप व दलित साहित्याबाबत बाबुराव बागूलांची दोलायमान मानसिकता स्पष्ट होण्यास मदत होते. ते म्हणतात, ".....बाबुराव बागूल हे महाराष्ट्र बौद्ध साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होतात तेव्हा त्यांना धर्म ही अफूची गोळी या तत्वाचा तेव्हढचापुरता विसर पडतो काय ? आणि बौद्ध साहित्य संमेलनाच्या व्यासपिठावरून बोलतात. आणि हे त्यांचे दलित साहित्य मार्क्सवादी तत्वांच्या प्रेरणेचे असतेच असते. महाराष्ट्र बौद्ध साहित्य परिषदेत काम न करता प्रगत साहित्य सभेचे अध्वर्यु असतात. म्हणजे आंबेडेकरी प्रेरणाचे साहित्यिक असण्याऐवजी मार्क्सवादी प्रेरणांच्या प्रगत साहित्य सभेला हे जवळचे मानतात. म्हणूनच दलित साहित्य संमेलनाच्या मंचावर आंबेंडकरी प्रेरणांचे शत्रू असतात. तसेच बौद्ध साहित्य

संमेलनाच्या मंचावरही आंबेडकरी प्रेरणांचे शत्रू असतात. म्हणूनच मी दलित अगर बौद्ध म्हणवून घेण्याऐवजी स्वतःला आंबेडकरी प्रेरणेचा साहित्यिक मानतो." (डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेरणेचे साहित्य पान १५०/१५१ संपा. भाऊसाहेब अडसूळ) ढालेंच्या हचा विवेचनातून बाबुराव बागूलांच्या वैचारिकतेचे व प्रगत साहित्य परिषदेचे स्वरूप स्पष्ट होण्यास मदत होते. बाबुराव बागूलांची वैचारिक वाटचाल अशी दोन्ही दलावर पाय ठेवून सुरू आहे. तर अशी ही चालू द्विअर्थाची त्यांची व इतर दलित साहित्यिकांची वाटचाल दिशाहिनता वाढविणारी ठरली आहे. एवढेच नव्हे तर बौद्ध साहित्य परिषद कमजोर करण्यास कारण ठरली आहे. दलित साहित्यिकांच्या अप्रगल्भतेचे पितळ त्यांच्याच दलित वैचारिकतेतून उघडे पडल्यास नवल ते काय ? एकीकडे म्हणायचे की "महात्मा फुले-आंबेडकरांनी ! तुमचे अकाऊन्टस ऑडिट केलेत ! ग्रंथाग्रंथाच्या पानावरले फ्रॉडस ! सगळे डिटेक्ट केलेत !" आणि दुसरीकडे जगातील सर्व विचारवंतांच्या क्रांतिकारकांच्या क्रांत्याच्या नादी लागायचे हा नादाणपणा नाही काय ; हे असले प्रगल्भ दलित साहित्यिक फुले-आंबेडकरांना कसला न्याय देणार आहेत. ते तर आंबेडकरद्रोही आहेत.

८४. दलित साहित्य व बौद्ध साहित्य संमेलनाच्या मंचावर आंबेडकरी प्रेरणेचे शत्रू वावरत असतात असे ढाले म्हणतात. आणि म्हणून ते दलित अगर बौद्ध म्हणूवून घेण्याऐवजी स्वतःला व इतरांना आंबेडकरी प्रेरणेचे साहित्यिक मानतात. तसे मानतांना आंबेडकरी प्रेरणा व बौद्ध प्रेरणा किंवा बौद्धत्व यांची त्यांनी फारकत करू नये. जी त्यांच्या वक्तव्यातून त्यांनी केली आहे. म्हणूनच दिपक सावंत विचाराते झाले आहेत. 'बौद्ध साहित्य नि दलित साहित्य या वादात काही जण चुकून आंबेडकरी प्रेरणेचे साहित्य, हा उपाय सुचवितात. मला प्रश्न पडतो, 'आंबेडकरी साहित्य' हा शब्द प्रयोग फक्त आंबेडकरांना मुक्तिदाता पण बुद्धधम्माला अप्रत्यक्षपणे टाळणारा यांच्यासाठी की, ओठावर आंबेडकरांचे नाव घेणारा नि पोटात मार्क्स बाळगणारा यांच्यासाठी' (जागद्यल पान ६ संपा. विजय पाटणकर) आणि

अप्रत्यक्षपणे राजा ढाले यांची दलित व बौद्ध या वाद विषयाला बाद ठरविण्यासाठी वापरलेली आंबेडकर प्रेरणेचे साहित्यिक ही संज्ञा बौद्धत्वाबाबत गौणत्वाचा अर्थ व्यक्त करण्यास त्यांच्या मनात नसूनही कारण ठरली आहे. आणि तरी असे म्हणणे म्हणजे परत आंबेडकर प्रेरणेला गौण लेखण्याचा प्रकार ठरतो. खरे म्हणजे आंबेडकर प्रेरणा ही बौद्ध प्रेरणा आहे. म्हणून आंबेडकर प्रेरणेचा साहित्यिक हा बौद्धच असतो. तो दलित किंवा विमुक्त किंवा भटक्या किंवा मोकाट साहित्यिक नसतो. नसावा. हे राजा ढालेंनी तमाम लोकांनी लक्षात घ्यायला हवे. आंबेडकर प्रेरणेचा साहित्यिक स्वतःला दलित म्हणवून घेत असेल तर ती त्याची अप्रगल्भता होय. अमेरिकेतील काळचा लोकांना श्वेतवर्णीयांनी निग्रो म्हणून संबोधले. आज त्याच ब्लॅक पॉवरच्या गोष्टी करणाऱ्या काळचा लोकांनी तिरस्करणीय गुलामगिरीचा अर्थ लाभलेला निग्रो शब्द त्याज्य ठरविला असून ब्लॅक हा शब्द Black is beautiful असे म्हणत स्विकारला असून त्या शब्दात स्वत्व ओतले किंवा शोधले असून त्यास सौंदर्य सूचक शब्द ठरविले आहे. भारतातील प्रस्थापित उच्चभ्रू भाषा प्रभूंनी दिलेला दलित हा तिरस्करणीय गुलामगिरीचा अर्थ सूचक शब्द आहे हे दलित साहित्यिकांनी लक्षात घेणे आणि दलितत्व त्याज्य ठरविणे आवश्यक आहे.

८५. सारा भारत बौद्धमय करण्याच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचं ध्येय होतं. हे बौद्ध, दलित व पुरोगामी साहित्यिकांना व तमाम जनतेस बौद्ध साहित्यिक व दलित साहित्यिक व आंबेडकरी प्रेरणेचा साहित्यिक उगाच असा वैचारिक दिशा भूलतेस कारण ठरणारा वादविषय होऊ नये म्हणून व बौद्ध प्रेरणा व आंबेडकरी प्रेरणांबाबत गफलत केली जाऊ नये म्हणून सारख्याच प्रेरणा असलेल्या बौद्ध साहित्यकांना बौद्ध साहित्यिकच म्हणणे व बौद्ध साहित्यिकांनी ते आग्रहाने पुढे आणणे आवश्यक आहे हे आम्ही आमच्या भूमिकेतून निर्णायकपणे सागू इच्छितो. कारण 'बुद्ध आणि त्याचा धम्म' हा ग्रंथ लिहिणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित साहित्यिक नव्हते तर बौद्ध साहित्यिक होते आणि

त्यांनी आपल्या लाखो अनुयायांसह १४ ऑक्टोबर ११५६ रोजी बौद्धधम्म-क्रांती घडवून आणलेली आहे व म्हणूनच त्यांचे अनुयायी असलेले आम्ही बौद्ध साहित्यिक म्हणतो की जे त्यांचे ध्येय तेच आमचे ध्येच आणि त्या ध्येयानुसार आम्हाला हा देश उन्नतीप्रत नेतांना भौतिकवादी, विज्ञाननिष्ठ बुद्धिवादी करावयाचा आहे.

८६. आंबेडकर अनुयायांना बदनाम करण्यासाठी तर्कविसंगत विचार मांडले जात आहेत. तसे करण्यासाठी बाबुराव बागूलांनी राजा ढालेंविरोधी टिकेचा बिगूल वाजविला आहे. तो वाजवितांना हे आपण ऑगस्ट १९७६ ला प्रसिद्ध होणाऱ्या 'ऑडिट' काव्यसंग्रहाच्या प्रस्तावनेत छापत आहोत हे ते विसरले होते काय ? ऑगस्ट १९७६ पर्यंत ढाले काय त्यांच्या जुन्या मित्रातच होते काय ? खरे म्हणजे ढाले १९७६ दरम्यान त्यांच्या जुन्या मित्रांत नव्हते आणि असले तरी त्यांची वैचारिकता आंबेडकरी ध्येयवादाचे महानत्व व्यक्त करीत नव्हती का? ऑगस्ट १९७६ पर्यंत त्यांनी चळवळीच्या नि साहित्याच्या संदर्भात बजावलेली भूमिका आणि कामगिरी बाबुराव बागूलांना माहीत नव्हती का ? पण हे लक्षात न घेता जुन्याचं सोनं करीत ते सोनं आंबेडकरी आंदोलन व आंदोलकांना बदनाम करण्यासाठी, त्यांचा बुद्धिभेद करण्यासाठी वापरतात. ढालेंच्या महाराष्ट्र बौद्ध साहित्य संमेल-नाच्या अध्यक्षिय भाषणानंतर पाच महिन्यांनी म्हणजे ऑगस्ट १९७६ मध्ये ते म्हणतात, 'आजच्या साहित्यावरोबरच राजकारणावर अर्थकारणावर समाजवादावर चर्चा चालत. अस्पृश्यता विषमता हे तर असेच आणि हे न आवडून ढाले परत त्यांच्या जुन्या मित्रात गेले.' (ऑडिट–प्रस्तावना) एवढेच ते ढालेंविषयी लिहितात पण त्यांना काय आवडत होते याबाबत काही सांगत नाहीत, ते त्यांनी सांगायला नको होते काय ? तसे केले असते तर ढालेच्या वैचारिकतेबाबत चार ओळी परखडपणे अधिक लिहिल्या असल्या तर जुन्या मित्रात जाण्याबाबत जो टिकेचा सूर बागूल काढतात तो बसूर ठरला नसता त्याला भक्कमपणा आला असता. पण तसे त्यांनी केले नाही.

मग आम जनतेने ढालेंच्या वैचारिकतेबाबत बाबत बाबूराव बागूल जो नकारात्मक सूर काढताहेत त्यावर विसंबून रहावे काय ?

४७. ढालेंना राजकारण आवडत नव्हते तर काय छिनाल मारुती आवडत होता का ? अर्थकारण आवडत नव्हते तर काय गांडुचा बगीचा आवडत होता काय ? अस्पृश्यता विषयी चर्चा आवडत नव्हत्या तर काय 'फॉकलंड रोड' आवडत होता काय ? समाजवाद आवडत नव्हता तर काय 'गायलंड' रोड आवडत होता काय ? विषमतेविषयी चर्चा आवडत नव्हत्या तर काय ग्रँट रोड आवडत होता काय? जागतिक विषयावरील आंतरराष्ट्रीयगप्पा आवडत नव्हत्या तर काय फोरासरोड आवडत होता काय ? आम्हाला हे सारे सटसटणारे राडेबाज रोड छीनाल मारुतीसह माहित आहेत ते का ? इच्छुकांनी आमचे 'ड्रॅगन पोएटी' हे पुस्तक अवश्य वाचावे. तर मुद्याचा प्रश्न असा की राजकारण अर्थकारण, समाजवाद, अस्पृश्यता, विषमता यावरील चर्चा बाबूराव बागूल म्हणतात, राजा ढालेंना आवडत नव्हत्या. मग त्यांना काय आवडत होते ? गारुड्याचा खेळ की खेळातील गोटचा की गोटचांचा खेळ की खेळखंडोबा की खंडोबाचा खेळ ? ऑगस्ट १९७६ मध्ये तेच ते जुन्या मित्रात जाण्याचं तुणंतुणं जे ते वाजवताहेत खरे म्हणजे ते वाजविण्याची काही आवश्यकता होती का ? तर त्यांनी असं का करावं. असा आमचा त्यांना जाहिर सवाल आहे. राजा ढालेंनी १४ व्या महाराष्ट्र बौद्ध साहित्य संमेलनाच्या मंचावरून बाबूराव बागूलांना जे झापले आहे, त्या झापण्याचा वचपा काढण्याचा तर हा प्रकार नसावा ना अशी ही शंका आमचा मनात जी आहे ती आम्ही जाहीर करीत आहोत.

० ० ०

८८. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून प्रेरणा घेऊन साहित्यातून चळवळ व चळवळीतून साहित्य निर्मिती करणाऱ्यांच्या वाटचाला विभक्ती-करणाची शोकांतिकाच का यावी ही अंतर्मूख करणारी बाब आहे.

८९. सहानुभूतीपूर्वक परिवर्तनाचा विचार न करता दलितांमध्ये सतत विघटन आणि दुर्बलता वाढविण्याची भूमिका प्रस्थापितांनी घेतल्यामुळे हे घडून आले आहे. तमाम जनतेने धम्म, सधम्म, अधम्म समजून न घेता त्याबाबत उदासिनता बाळगल्यामुळे हे घडून आले आहे. सुशिक्षित वर्ग सामाजिक दायित्वाबाबत अंगचोर भूमिका बजावत असल्यामुळे हे घडून आले आहे. अगणित नेतृत्वामुळे हे घडून आले आहे. नेतृत्वात ऐक्य नसल्या-मुळे हे घडून आले आहे. नेतृत्वावद्दल जनतेत विश्वास नसल्यामुळे हे घडून आले आहे. जनतेत विश्वास निर्माण न करू शकलेल्या नेतृत्वामुळे हे घडून आले आहे. नैतिक व वैचारिक नेतृत्वासाठी आवश्यक त्यागाची जाण नसल्यामुळे हे घडून आले आहे.

अखिल भारतीय नेतृत्व नसल्यामुळे व विश्वास कोणत्या नेतृत्वावर टाकावा याबाबत जनता भांबावून गेल्यामुळे हे घडून आले आहे. आपण म्हणजे महापुरुष, प्रति आंबेडकर असे स्वतःस समजणाऱ्यांचा सुळसुळाट झाल्यामुळे हे घडून आले आहे. इतिहासाचे नीट अवलोकन करायचे

नाही आणि अध्वर्यु म्हणून मिरवायच्या हावेमुळे कित्येकांना अर्धांगवायु झाल्यामुळे हे घडून आले आहे. विचार न करता विरोधासाठी विरोध करण्याची प्रवृत्ती बळावल्यामुळे हे घडून आले आहे. नावावर एकही वैचारिक पुस्तक नाही आणि अक्कल झाटभर पण विचारवंत म्हणून मिरविण्याची हाव बळावल्यामुळे हे घडून आले आहे. वैयक्तिक द्वेषभावामुळे विभक्तिकरणातील सातत्य कायम, म्हणून हे घडून आले आहे. नको त्या बाबीला अवास्तव महत्व देण्यात आल्यामुळे व कोणत्या बाबीला किती महत्व द्यावे, या विषयी मूल्यमापनाचे भान नसलेल्या नेतृत्वामुळे हे घडून आले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुतळ्यांपेक्षा ग्रंथालये उभी करण्याची आवश्यकता सांगितली पण पुतळेच उभे करण्यात धन्यता मानणाऱ्या नेतृत्वामुळे हे घडून आले आहे. सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठेचा उपयोग प्रस्थापितांनी-कार्यकर्त्यांना विकत घेण्यासाठी केल्यामुळे आणि कार्यकर्ते विकल्या जात असल्यामुळे हे घडून आले आहे. सत्ता काबीज करण्यासाठी एकाच पार्टीचे चार चार उमेदवार एकाच मतदारसंघात 'डिपॉझिट' जप्त होण्यासाठी उभे केले किंवा राहिल्यासुळे हे घडून आले आहे. भाषा एक पण जाती अनेक त्यामुळे ऐक्य नाही म्हणून हे घडून आले आहे. रंडीबाज राजकारणी प्रवृत्तीमुळे हे घडून आले आहे. नेते व जनता यांच्यात सतत अविश्वासाची भावना असल्यामुळे हे घडून आले आहे. दलितांच्या उन्नतीसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनाविरोधी प्रवृत्ती व त्या त्यांच्याप्रत पोहचविण्यास असमर्थ ठरलेल्या नेतृत्व व नोकरशाहीमुळे हे घडून आले आहे.

संघटनात्मक कार्य करतांना कार्यकर्त्यांनी 'अमिबा पद्धत' स्विकारली आणि एकमेकांच्या विरोधी गुरगुरणारे वाघच वाघ निर्माण झाल्यामुळे हे घडून आले आहे. जनतेत ऐक्य आणि ऐक्यामुळे येणारा दरारा नसल्यामुळे हे घडून आले आहे. मूलभूत प्रश्नावर चळवळ चालविण्यापेक्षा भावनिक प्रश्नालाच अवास्तव महत्व दिल्यामुळे हे घडून आले आहे. बुद्धधम्माबाबत अप्रगल्भ पोथीवादीदृष्टी बाळगल्यामुळे व अर्ध्वे जग मार्क्सवादाने काबीज केले आणि मार्क्सवादास पर्यायी व त्यापेक्षा योग्य आणि गतिशील तत्वज्ञान

म्हणून दिलेला बौद्ध धम्म जनतेस पटवून जनचळवळी घडवून आणण्यास कार्यकर्त्यातील असमर्थतेमुळे हे घडून आले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडवून आणलेली बौद्धधम्मक्रांती कालबाह्य ठरविण्याच्या प्रस्थापितांनी चालविलेल्या प्रयत्नास आंबेडकर अनुयायातील गद्दार लोक बळी पडल्यामुळे हे घडून आले आहे. साहित्याच्या क्षेत्रात सुद्धा गोंधळ पर्यायाने मोनोपॉली त्यामुळे हे घडून आले आहे.

९०. ज्या ज्या मुळे आंबेडकरी आंदोलनाचा शक्तिपात होत आला त्या त्या बाबीबाबत public opinion ची आज गरज आहे. सत्ता काबीज करण्यासाठी पाच वर्षानंतर सुरू होणाऱ्या मतपेटीच्या युद्धाची तयारी आतापासूनच आवश्यक आहे. आता जनतेनेच निर्णय घेऊन जनचळवळीची दिशा निश्चित करायची आहे. त्या दिशेने वाटचाल करण्यास समर्थ नेतृत्व जनतेनेच निर्माण करायचे आहे. जनतेने अंतर्मुख होण्याची वेळ कधीच आलेली आहे. जनता गाफील राहली तर सर्वनाश अटळ आहे. हचा सर्वनाशाची मुळं साहित्यातून जोपासली जातात हे ही लक्षात घेणे आवश्यक आहे. वैचारिक गाफीलतेमुळे बुद्धिभेदास कारण ठरणारे साहित्य आंबेडकरी प्रेरणेचा उदोउदो करीत आंबेडकरी प्रेरणेलाच विरोध करीत विकसित होते. तेव्हा त्याबाबतही दक्षता आवश्यक आहे. अशा दक्षतेतून दिसून येणारा आंबेडकरद्रोह पुढील प्रमाणे आहे.

९१. दलित साहित्यिकांना आपण काय बोलतो लिहतो आणि करतो याचे भान नसल्याचेच त्यांच्या वेळोवेळीच्या कर्तृत्वावरून दिसून येत आहे. आणि बौद्धत्वाबाबतही त्यांनी गंगाजमनी भूमिकाच घेतलेली आहे. कारण बुद्धाने घडविलेल्या इतिहासाचा त्यांचा अभ्यास नाहीय आणि म्हणून ते लपंडाव खेळण्यातच धन्यता मानताहेत. त्यामुळे समाजाचे अपरिमीत नुकसान ते करीत आहेत. जनतेची दिशाभूलता वाढवित‌ाहेत. असे करतांना प्रा. यशवंत मनोहर म्हणतात, " दलित साहित्य केवळ बुद्ध धर्मियांचे नाही. ते व्यक्तिपुजकही नाही. दलित साहित्य क्रांतिधर्मियांचे आहे. " (दलित साहित्य सिद्धांत आणि स्वरूप पान २८) असे त्यांनी म्हणणे साहजिकच

आहे. कारण दलितपण अनेक क्रांतिकारकांनी स्विकारलेले आहे. अनेक क्रांतीकारकांनी दलितपण स्विकारल्यामुळे ते दलित साहित्यिकांनी स्विकारलेले आहे. मग दलित साहित्य क्रांतिधर्मियांचे ठरणार नाही तर काय बौद्ध धर्मियांचे ठरणार आहे.

प्रामुख्याने विद्रोही साहित्य निर्मिती बौद्धांनीच केलेली आहे. पण विद्रोही साहित्य दलित ठरवून वर ते क्रांतिधर्मियांचे ठरवून आंबेडकरांचा बुद्धमार्ग चुकीचा आणि कालबाह्य ठरविण्याचा हा प्रयत्न म्हणजे एक षडयंत्र होय. ह्या षडयंत्राची बाजू घेणारे अर्जुन डांगळे म्हणताहेत, ' दलित साहित्याची चळवळ ही केवळ (नव) बौद्धांचीच न राहता तिची व्यापकता वाढवायला हवी, (दलित साहित्य एक अभ्यास) दलित शब्दाभोवती मोहमय मायाजाल निर्माण करण्यावावत तथाकथिक साहित्यिक सतत प्रयत्नशील राहलेले आहेत. आणि त्या शब्दाचा अर्थ एवढा व्यापक करण्याचा प्रयत्न केला जात आहे की बुद्ध बौद्धत्व आणि बौद्धधम्मक्रांतीला तो कसा मारक ठरेल याचीच काळजी तसे करीत घेण्यात आली व येत आहे. आणि काही कच्ची मडकी हाताशी धरून प्रस्थापितांनी दलित नावाचा विचित्र प्रवाह टिकविण्याचाच सतत प्रयत्न चालविलेला आहे. ' मेहनत करे मुर्गा और वैदा खाये फकिर ' ह्या म्हणीतील अर्थाप्रमाणेच अशी परिस्थिती निर्माण केल्या गेली आहे. कतृत्व बौद्धांचे पण नाव आणि मिरवणूका मात्र इतरांच्या असा प्रकार जो ठरविल्या गेला तो आता चालणार नाही.

९६. प्रा. यशवंत मनोहर व अर्जुन डांगळेंनी वर जे बौद्धत्वाबावत तर्कविसंगत विचार मांडले आहेत तो प्रकार म्हणजे मुर्खपणा होय. ह्या लोकांना वैचारिक पंढत्व आलेलं आहे आणि पंढ कधीही बंड करीत नसतो आणि तो जे करतो ते वाझं असतं हे दलित वैचारिकतेचे मूल्यमापन करतांना लक्षात घेणे आवश्यक आहे.

९३. बाबुराव बागूल म्हणतात, ' साहित्य कधी दलित नसते आणि साहित्याचा नायक होणारा माणूसही दलित नसतो. हे ठाऊक असूनही दलित साहित्य हे नाव घेतले आहे.' (दलित साहित्य आजचे क्रांतीविज्ञान पान ३४)

ह्या त्यांच्या विचारातून अर्थाचा बेअर्थ आणि बेअर्थाला अर्थपुर्णत्व देण्याची त्यांची चलाखी स्पष्टपणे दिसून येते. साहित्य आणि साहित्याचा नायक होणारा माणूस दलित नसतो हे त्यांना मान्य आहे आणि तरीही त्यांनी साहित्याला आग्रहपूर्वक दलित हे नाव अगदी अट्टाहासाने स्विकारले आहे. ह्या अट्टाहासातून 'गिरा तो भी टांग उपर' किंवा 'मेरी मुर्गी एक ही टांग' अशा मनोवृत्तीच्या माणसासारखी त्यांची अवस्था असल्याचे दिसून येते. एवढ्यावरच ते थांबत नाहीत तर दलितत्व का स्विकारले याबाबत स्पष्टीकरण करतांना म्हणतात, 'बुद्धाने जसे दुःख स्विकारले अनेक क्रांतिकारांनी दलितपण स्विकारले तसे दलित साहित्याने दलितत्व स्विकारले आहे.' (दलित साहित्य आजचे क्रांतीविज्ञान पान २८) असे म्हणणे कितपत योग्य आहे. बुद्धाचा दुःख निवारणाचा मार्ग न स्विकारता ज्या दुःखाच्या निवारणासाठी त्याने त्याग केला तेच दुःख त्यांनी आदर्श या अर्थाने स्विकारणे होते का? दुःख निवारण करणे म्हणजे दुःख स्विकारणे करणे होते काय? विचार मांडण्याची ही कोणती तार्किक पद्धती आहे? घोळ निर्माण करण्यासाठीच अशी विधानं मांडली जातात ना? असे करून दलित साहित्यिकांना नेमके काय अभिप्रेत आहे? की बुद्ध तत्वज्ञान बदनाम करण्याचा त्यांचा विचार आहे? इथे हे लक्षात घेणे आवश्यक आहे की दलित साहित्यिकांना बुद्धाचा पर्यायाने डॉ. आंबेडकरांचा मार्ग मान्य नाही. ते फक्त ते जे काही करतील ते कसे योग्य आहे हे पटवून देण्यासाठी बुद्ध, कबीर, फुले, आंबेडकर यांच्या नावाचा वापर करतात. आपण दलितपण का स्विकारले हे स्पष्ट करण्यासाठी ते बुद्धाचा नि अनेक क्रांतिकारकांचा हवाला देतात. बुद्धाने दुःख स्विकारले म्हणून आम्ही दलितपण स्विकारले असे ते म्हणतात. पण एवढ्यावरच ते थांबत नाहीत तर, 'गौतम बुद्धाला दुःख, दैन्य, दास्य दिसले. अन् एक महान तत्वज्ञान, एक जीवन मार्ग जगाला मिळाला... (दलित साहित्य आजचे क्रांतीविज्ञान पान १३६) असेही म्हणतात. आणि मग बुद्धापासून त्याचा महान मार्ग न स्विकारता काय स्विकारतात तर दुःख, कशासाठी तर आपण दलितपण का स्विकारले हे स्पष्ट करण्यासाठी याला म्हणतात चलाखी अक्कलहुशारी.

९४. एकीकडे 'गौतम बुद्धाला दुःख, दैन्य, दास्य दिसले...' असे ते म्हणतात आणि दुसरीकडे 'बुद्धाने दुःख देणारा दाखविला नाही...' असेही म्हणतात. याचा नेमका अर्थ काय घ्यायचा. बुद्धाला फक्त दुःख, दैन्य, दास्य दिसले पण ते देणारा दिसला नाही असे समजायचे काय ? मग बुद्धाने जर दुःख देणारा दाखविला नाही तर मग दुःख निवारणाचा महान मार्ग कसा सांगितला ? खरे म्हणजे दुःख देणारा दिसल्याशिवाय निवारणाचा मार्ग सांगता येईल काय ? म्हणजे दुःख आणि ते दुःख देणारा हयांचे सम्यक ज्ञान बुद्धाने प्राप्त केले होते. त्याशिवायच का त्याच्या धम्माचा प्रसार जगभर झाला आहे ? दलित साहित्यिकांच्या विचारातील विसंगतीमुळे त्यांची दोलायमान मानसिकताच सूचीत होते. कुठे काय बोलावे किंवा लिहावे याचे त्यांना भान राहत नाही किंवा ते ठेवत नाहीत. म्हणून त्यांच्या दलित विद्रोहाची टोटल फसगत झालेली आहे.

९५. जे दलितत्वाबाबत तेच सम्यक परिवर्तनाबाबत सम्यक परिवर्तना बाबत आहे. सम्यक परिवर्तन व सम्यक क्रांतीबाबत बाबुराव बागूल म्हणतात, 'भारतातील प्रस्थापित साहित्य हे हिंदु साहित्य आहे. आणि सम्यक परिवर्तन करू शकणारी विज्ञान आणि समाजवाद सहजपणे स्विकारू शकणारी भारतातील क्रांतीकारक ताकद दलित समाजच आहे. दलित हे विशेषण सम्यक क्रांतीचे नाव आहे. क्रांतीचा साक्षात्कार आहे. (दलित साहित्य आजचे क्रांतिविज्ञान पान २९) दलितत्वाबाबत त्यांनी केलेली फसगत सम्यकत्वाबाबतही करताहेत. सम्यक परिवर्तन, सम्यक क्रांती आली कुठून ? कुणाच्या विचाराची ही देण आहे ? हया प्रश्नाचा जसजसा आपण विचार करू लागतो तसतसे आपण बुद्ध तत्वज्ञानाजवळ जाऊ लागतो. सम्यकत्वाची देण कुण्या दलित साहित्यिकाची वा समांतर साहित्यवाद्याची नसून ती बुद्धाची देण आहे हे लक्षात येते. सम्यक परिवर्तन घडवून आणण्यासाठी बुद्ध आयुष्याच्या अखेर पर्यंत मार्गक्रमण करीत राहिला. त्यानेच ती जाण, तो विचार, ते तत्वज्ञान, जगाला दिले आहे ते जगाने मान्य केले, स्विकारले, प्रस्थापित केले हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

९६. सम्यक्त्वाचा विचार काही आभाळातून पडला नाही. तो बुद्ध तत्वज्ञानाचाच एक भाग आहे हे दलित साहित्यिकांना मान्य दिसत नाही, आणि म्हणून ते सम्यक्त्वाचे परखड नि स्पष्ट विवेचन न करता सम्यकत्वास वेवारस ठरवताहेत किंवा तो आपल्याच बुद्धिमतेचा तेजस्वी अविष्कार आहे अशा तोऱ्यात त्याबद्दल विश्वव्यापी अर्थाने बोलत असतात असा आमचा त्यांच्यावर आरोप आहे.

९७. नवाकाळकर्ते निळकंठ खाडीलकर लिखित प्रॅक्टिकल सोशॅलिझमचा पुरस्कार आणि प्रचार करताना बाबूराव बागूल म्हणतात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ' स्टेटस अँण्ड मायनॉरिटीज ' व ॲनिहिलेशन ऑफ कास्ट ' हचा पुस्तकांची दखल घेणे आवश्यक आहे. त्यांना बुद्ध ॲण्ड हिज धम्म 'हचा ग्रंथाची का आठवण होत नाही. खरे म्हणजे त्यांनी हा ग्रंथ घ्या अन तो ग्रंथ घ्या अशी भाटगीरी करण्याची काहीही आवश्यकता नाही. आणि तशी भाटगीरी आम्हीही करीत नाही. आणि करणार नाही. जोपर्यंत ते दलित भूमिका घेऊन आहेत तोपर्यंत ते परिवर्तनावावत काहीही साध्य करू शकणार नाहीत.

० ० ०



९८. समाज परिवर्तनाची वैचारिकता प्रस्थापित समाज सहजासहजी मान्य करीत नसतो. आणि ती मान्य केली तरी त्याप्रमाणे तो वागेलच याची शास्वती नसते. म्हणून सांस्कृतिक चळवळ सातत्याने सुरू ठेवणारी सक्रिय आघाडी आवश्यक असते.

९९. प्रस्थापित समाज रंजनप्रधान भोगवादी साहित्याच्या निर्मितीतून सतत चालना देऊन दलित, शोषित, पिडीत, उपेक्षित, सर्वहारा, कष्टकरी, अनुसूचित जाती, जमाती, विमुक्त, भटक्यांच्या जीवन मरणाच्या समस्यांकडे दुर्लक्ष करीत आलेला आहे. म्हणून त्यांच्या झुंडी त्याच आदिम अवस्थेत जगत आहेत. म्हणूनच समाज परिवर्तनाआड येणारं रंजनप्रधान भोगवादी साहित्य कितीही कलात्मक असले तरी ते भर चौकात जाळून टाकण्याच्या लायकीचे असते. साहित्याच्या क्षेत्रातील ह्या व्यभिचाराच्या षडयंत्राचे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना पुरेपुर भान होते. म्हणूनच परिवर्तनासाठी त्यांनी दिलेली जाण आणि जबाबदारी लक्षात घेणे आवश्यक आहे. त्या जबाबदारीची जाणीव करून देतांना त्यांनी सांगितले आहे, 'आधुनिक युगातील सामाजिक व राजकीय संघटनेबद्दल ज्यात निश्चित असे मूलभूत विचार मांडण्यात आलेले आहेत अशा कमीतकमी चार तरी ग्रंथाशी श्रमिकांचा परिचय असायला हवा. हे चार ग्रंथ म्हणजे रूसोचा सामाजिक करार, मार्क्सचा कम्युनिस्ट जाहिरनामा, पोप तेराओ लिओ यांची श्रमिकांच्या

परिस्थिती संबंधाने उपदेश पत्रके आणि जॉन स्टुअर्ट मील यांचे स्वातंत्र्या-संबंधी विचार, या विचारधनाकडे श्रमिकांनी जेवढे लक्ष द्यायला हवे होते तेवढे कधीच दिलेले नाही. याऐवजी प्राचिन राजे-राण्यांच्या कल्पित व अतिरंजित अशा कथा कहाण्या वाचण्याचे व्यसन श्रमिक वर्गाला लागले आहे. (भाषणे खंड. संपा: मा. फ. गांजरे) पण हया विचारधनाकडे अजुनही श्रमिक वर्गाचेच काय पण कार्यकत्याचे सुद्धा लक्ष गेलेले दिसत नाही. अगदी वर वर तुकाबाई बेंबीला धका नाही असे त्यांचे आपमतलबी दिशाभूल जनक कार्य सुरू असते.

१००. कलेसाठी कला की जीवनासाठी कला अशा वाद विषयाचे वादळ पांढरपेशी सहित्यिकांनी निर्माण केले, रंगविले आणि आपला कार्यभाग साधून घेतला. कलेसाठी कला मानून साहित्य निर्मिती करणारांनी व्यभिचारी साहित्य निर्मितीबाबत सातत्य ठेवून उच्चांक गाठला आहे. तर जीवनासाठी कला मानून भलत्याच गोष्टीला जीवन समजून कलानिर्मिती करणारांची कला अंतरीच्या नानाकला दाखवत समाजपरिवर्तनाबाबत वांझ ठरली आहे. आणि अशा साहित्य निर्मितीतून प्रस्थापितांनी सांस्कृतिक चळवळीच्या हत्याराची प्रभावशिलता बोथट करण्याची प्रक्रिया सातत्याने सुरू ठेवली आहे.

१०१. सरड्या सारख्या रंग बदलणाऱ्या हया पांढरपेशी साहित्यिकांनी वेगळाच वाद निर्माण करण्याचा प्रयत्न चालविलेला आहे. तो म्हणजे साहित्याबाबत बांधिलकी नको तर सामिलकी हवी. आणि सामिलकीची भूमिका स्विकारून त्यांनी षंढ साहित्यनिर्मिती सुरू ठेवली असून ते बांधिलकीला गौण लेखित आहेत. कारण त्यांचा आरोप असा की बांधिलकीमुळे साहित्य साचे बद्ध ठरते. खरे म्हणजे त्यांना परिवर्तन नको असते. म्हणून परिवर्तनाचा विचार मांडणाऱ्या साहित्याविरोधी त्यांची ओरड सुरू असते. म्हणूनच परिवर्तनाची बांधिलकी स्विकारणाऱ्या साहित्यिकांना ते वेठीस धरण्याच्या प्रयत्नात असतात, बांधिलकीला त्याज्य ठरवित. विद्रोही साहित्याला

ओंगळ आणि भोंगळ ठरविण्याचे हे त्यांचे षडयंत्र आहे. ते ज्ञान पालख्या काढतात आणि त्यातून ज्ञानेश्वरीसह बलुतं व उपरा सारखी पुस्तकं मिरवतात. यापुढे त्यांची मजल नाही. संपले त्यांचे समाजकार्य वारे हयांच्या दिंड्या अन् ज्ञानपालख्या आणि हेच समुद्रात लघवी करण्याची किंवा लघवी करून समुद्राची उंची वाढविण्याची नस्ती उठाठेव करण्याचा नादाणपणा करीत असतात. ही हयांची साहित्यातील सामिलकी.

खरे म्हणजे अशा सामिलकीचा निषेध करणे आणि दुःख दैन्याने ग्रासलेल्या जनतेच्या हितासाठी समुद्रालाही आग लावण्याची धमक ठेवून साहित्यातील बांधिलकी प्रकर्षाने पुढे आणणे आवश्यक आहे. म्हणूनच अंतिम विजयासाठी लोकलढ्यातील अंतर्गत आणि बाह्य हितशत्रूंविषयी दक्षता आवश्यक असते. सामिलकीवाल्यांनीच विनायकाला आठ ठिकाणी वाकवून अष्टविनायक ठरविला आणि चौऱ्यांशी आसनात भोगला. मग त्यांनी दलितांना अठरापगड जातीत भरकटत ठेवल्यास नवल ते काय ? आणि जीवनवादी भूमिका घेणाऱ्या वि. स. खांडेकरांनी रतीचा अग्नी पेटतां ठेवत बायका झवत सुटलेला ययाती शारदेच्या मंदिरात आणून काय साध्य केले. तर ज्ञानपिठ अकादमीनं त्या ययातीला पारितोषिकासाठी अलगद उचलून आपली बटिक अवस्थाच जाहिर करावी ना. अरेरे तुर्त पुरे. तर मिस्टर प्रकाश सावरकर यांनी समस्त स्त्री जातीचा अपमान करणारी सौभाग्यकांक्षिणी उर्फ निम्फोमेनिया हि कादंबरी लिहून काय साधले आहे. दिवाळखोरीच ना.

१०२. परिवर्तनाची प्रेरणा खंडित करण्याच्या हेतूने प्रस्थापित समाज भाषांतर आणि अनुवादातून हेच करीत आला आहे. याचे उदाहरण म्हणजे माधव मनोहर इंग्रजीतील की कादंबरी किल्ली म्हणून मराठीत आणतात आणि शय्यागृहाची किल्लीच मराठी जनतेच्या हाती देत असतात. भोगवादी साहित्याचे हयांनी डोंगर उभे केले आहेत परिवर्तनाच्या विरोधात. एक आपण इथे 'ओपन' केला आहे आणि 'क्लोज' मध्ये किती तरी आहेत. तुर्त त्यांचा उल्लेख न केलेला अधिक उत्तम.

१०३. चातुवर्ण्य देवाने निर्माण केले आहे अशी थाप देऊन ते टिकविण्यासाठी शेकडो वर्षांपासून जातीवादी साहित्य सातत्याने लिहिले गेले आणि रामायण महाभारतासारखी महाकाव्ये जातीवादाने कलंकित केली गेली. देवाच्या नावात जात गोवून देवालाही जातीबद्ध करण्यात आले आणि माणसाच्या नावातूनच ती जाहीर करण्यात आली. म्हणून माणसाच्या नावातूनच न सांगता ती जाहीर होते. देवाच्या नावात जात आणि गळ्यात जानवी ओवल्यामुळे देवपण ज्याला म्हणतात तेच माणूस हरवून बसला. म्हणून ज्या दगडावर कुत्र्याने लघुशंका केली त्या दगडाचीच पुजा करण्याइतपत माणूस गाढव केला गेला. मानसाचे गाढवीकरण करणाऱ्या विषमतावादी स्थितीवादी रंजनप्रधान भोगवादी साहित्याचे आज विध्वंसन करणे आवश्यक आहे.

१०४. हत्यार ज्या न्याय्य हेतूसाठी असते त्यासाठीच साहित्याची निर्मिती करणे अत्यावश्यक आहे.

१०५. १४ आक्टोबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडवून आणलेल्या बौद्धधम्मक्रांतीचा उद्देश समाजातील आमुलाग्र परिवर्तनाशी निगडीत आहे. समाज परिवर्तनाची ही प्रेरणा बुद्धिवादाचा पुरस्कार करणारी आहे. बुद्धिवादाचा वारसा बुद्धाने मानवजातीस दिलेला आहे. म्हणून बुद्धिवाद बुद्धाच्या नावानं ओळखला जातो. जे बौद्ध ह्या नावाला बिचकतात आणि बौद्ध हे नाव संकूचित आणि जातीबद्ध करू पाहतात त्यांना इतिहासाचे अवलोकन नाही असेच म्हणणे भाग पडते. आणि ज्यांना इतिहासाचे अवलोकन नसते ते इतिहास घडवू शकत नसतात. बुद्ध वा बौद्ध ह्या नावाचा आणि बौद्धधम्मक्रांतीचा इतिहास विसरून जे अकर्मण्य भूमिका स्विकारतील त्यांचा नाश अटळ आहे. जसा दलित भूमिका स्विकासणाऱ्यांचा झाला.

१०६. बौद्धधम्माचा इतिहास म्हणजे एक तृतीयांश मानवजातीचा गेल्या अडीच हजार वर्षांतल्या सुधारणेचा इतिहास आहे. सामाजिक बंडखोरी, ह्या इतिहासाचा अविभाज्य असा भाग आहे. सामाजिक दयित्व

हे त्या बंडखोरीचे स्वत्व आहे. म्हणून विषमतेविरूद्ध आक्रमकता ही त्या बंडखोरीची निर्णायक भूमिका आहे.

० ० ०

१०७. जगातील सर्वांत मोठी लोकशाही असलेला हा देश आहे. आशिया खंडातील सुशिक्षितांच नबंर एकचं शहर या देशात आहे. आणि याच देशात आशिया खंडातील सर्वांत मोठी झोपडपट्टी आहे. औद्योगिक पट्टीसुद्धा आणि सर्वात जास्त चलचित्रपट तयार करणारा व कोट्यावधी रुपये सर्वसामान्य जनतेच्या गरजांशी व समस्यांशी संबंध नसलेल्या हच्या अनप्रॉडॉक्टीव्ह धंद्यात उधळणारा जगातील प्रथम क्रमांकाचा हाच गरीब देश आहे. कसलेही क्रांतीकारी ध्येय नसलेल्या आणि जे आहे त्याबाबत बेजबाबदार असलेल्या नोकरशाहीकडून पान खाऊन थुंकावे तशा पंचवार्षिक योजना राबविल्या जात आहेत. म्हणून हा देश श्रीमंत असूनही गरीबी न हटता गरीब लोकच इथे सातत्याने राहताहेत. तिसऱ्या जगात जमा झालेला हा देश आहे.

१०८. अशा हच्या देशात १९२० सालापासून जी कम्युनिस्ट जाणीव मांडल्या जाऊ लागली ती अर्धे जग मार्क्सवादाने पादाक्रांत करूनही येथे का रुजली नाहीय ? लेनिनच्या भाकिताप्रमाणे मास्कोमार्गे पेकिंगला पोहचलेली ही जाणीव वॉशिंग्टनला पोहचण्याअधीच कलकत्त्यात का आचके खात आहे ? आणि अशावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कम्युनिझमला पर्याय सांगितलेला बौद्धधम्म भारतीय जनता समजून का घेत नाही ? आणि घेणार आहे की नाही ?

१०९. बौद्धधम्माची मिमांसा पारंपारिक धर्म विषयक अर्थानुसार करणे चूक आहे. मार्क्सवादाशी तुल्यबळ आणि त्याहीपेक्षा गतिशील असे ते तत्वज्ञान आहे. आणि त्या तत्वज्ञानाची मिमांसा करतांना याचे भान ठेवणे आवश्यक आहे. आणि नुसती मिमांसा कामाची नाही तर त्यानुसार चळवळही आवश्यक आहे. हच्या दृष्टिने मिमांसा व चळवळ याबाबत आंबेडकर अनुयायात सारा उजेडच आहे. अंतर्गत विरोधासाठी गटतट आहेतच. रशियात

कामगारांनी कम्युनिस्ट क्रांती घडवून आणली आणि चीनमध्ये शेतकऱ्यांनी तर लोकशाही मार्गाने मतपेटीतून कम्युनिस्ट पार्टी सत्तेवर आणणारा जगातील हाच एकमेव देश आहे. केरळ व बंगाल प्रांतांच्या कम्युनिस्ट पार्टीचा इतिहास जाहीर आहे. आणि आंबेडकर अनुयायांची एकीकरण करण्यातच एक पिढी बरबाद होते. आणि तरीही बोंब. मग ध्येय साध्यतेबाबत बोलायलाच नको.

शत्रू आणि मित्र ओळखण्याबाबत हे अपयशी ठरले आहेत. आणि परिवर्तनाचा विचार करणाराशीच हयांनी हाडवैर सुरू ठेवले आहे. आणि सुशिक्षित वर्ग गेंड्याची कातडी पांघरून आंबेडकरद्रोह करीत वावरत आहे. प्रतिगामी जनतेने दलितांच्या विरोधी छोट्या छोट्या कारणांमरून हैदोस मांडला आहे. माणसं जिवंत जाळली जात आहेत. संसार उध्वस्त केले जात आहेत. रोम जळत असतांना फिडल वाजवीत बसलेल्या निरो प्रमाणे हे दलितांचं सर्वस्व धोक्यात असतांना एकिकरण करण्यातच मग्न आहेत. आणि चक्क एकिकरणासाठी चळवळ चालवित आहेत. हयांची किव करावी तेवढी थोडीच आहे. हयांचा कुठं घोळ नाही म्हणून साहित्यात नसेल, तेव्हा इथंही बोंब. परिवर्तनाच्या विचाराने प्रेरित प्रवृत्ती आणि चळवळींनी काळाची पावलं ओळखून वाटचाल करणे आवश्यक आहे.

११०. आंबेडकरी आंदोलनातील सध्याचे नेतृत्व जनतेच्या मूलभूत प्रश्नावर चळवळ न चालविता नको त्या प्रश्नाला अवास्तव महत्व देत समाजाची दिशाभूल करीत आहे. असे करीत आधी राजकीय की सामाजिक चळवळ हया वादाप्रमाणे आधी सामाजिक की आर्थिक चळवळ हया वादातच चळवळी विघटीत केल्या जात आहेत आणि हया घोळातच सर्व नेतृत्व भरकटत असून समाज त्याच सामाजिक व आर्थिक हलाखित जीवन जगत आहे. चळवळ चालवितांना आर्थिक व सामाजिक हया एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत हे लक्षात घेणे आवश्यक आहे. अन्यथा आंबेडकर अनुयायांच्या चळवळी गर्भातच अर्थात मतपेटीतच नष्ट होण्याची अधिक शक्यता आहे आणि त्यांना कम्युनिस्ट किंवा डाव्या चळवळींना दुर्लक्षून पुढे

वाटचाल करता येणार नाही किंवा वाटचाल कठीण होऊन बसेल, हे ही तेवढेच खरे आहे. कारण मतपेटीवर विश्वास नसलेले कम्युनिस्ट मतपेटीच्या मार्गाने सत्ता काबिज करीत आहेत. आणि हे हरामखोर एकाच मतदार संघातून चारचार उमेदवार उभे करून जनतेचा विश्वासघात करीत आहेत. गांडीवर लाथा बसतील तेव्हा हयांच्या डोक्यात उजिएड पडेल आणि हयांना आंबेडकर कळेल अशीच एकून सध्याच्या नेतृत्वाची लक्षणं दिसत आहेत.

१११. हिमालया पलिकडे उलथापालथ सुरू आहे आणि आम्ही मात्र अर्थाचा बेअर्थ करीत गाढ झोपेत आहोत अर्थातच अनर्थ आपल्या सभोवती पिंगा घालीत असल्यास नवल ते काय ?

० ० ०

संदर्भसूची

१) दलित साहित्य आजचे क्रांतीविज्ञान, संपा. मधुकर नाकसांडे
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे खंड १ संपा. मा. फ. गांजरे
३) दलित साहित्य एक अभ्यास, संपा. अर्जुन डांगळे
४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बहिष्कृत भारतातील अग्रलेख संपा. रत्नाकर गणवीर
५) ऑडिट, प्रल्हाद चेंदवणकर
६) उत्थानगुंफा, प्रा. यशवंत मनोहर
७) होल्गा जेव्हा लाल होते (लेनिन) ले. वि. स. वाळिंबे
८) कम्युनिस्ट जाहिरनामा कार्ल मार्क्स
९) जातीभेद निर्मूलन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनु. मा. फ. गांजरे
१०) बुद्धधम्म आणि धम्माचे भवितव्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अनु. रत्नमित्रा गणवीर
११) दलित साहित्य सिद्धांत आणि स्वरूप, प्रा. यशवंत मनोहर
१२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेरणेचे साहित्य संपा. भाऊसाहेब अडसूळ.
१३) साम्यवाद आणि क्रांती, अनु. नाना जोशी
१४) निळीपहाट प्रा. रा. ग. मजाधव
१५) म. फुले समग्र वाङ्मय संपा. किर/मालशे
१६) कऱ्हेचे पाणी खंड ४ आचार्य प्र. के. अत्रे
१७) तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी लेखग्रसंह भाग १ संपा. मधुकाका

१८) विचारयुगाचे प्रणेते संपा. गंगाधर पानतावणे
१९) दलित साहित्य का नको ? विजय सोनवणे
२०) बुद्ध आणि त्याचा धम्म ले. बी. आर. आंबेडकर
अनु. तळवटकर/रेगे/चिटणीस
२१) कोठे आणि कधी तरी सुधीर फडके
२२) विद्रोहाचे पाणी पेटले आहे. ले. गंगाधर पानतावणे
२३) जागद्यल (अनित्यकालीक) संपा. विजय पाटणकर
२४) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे चरित्र खंड २.
ले. चा. भ. खैरमोडे

० ० ०

REFBK-0024821



"डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घडवून आणलेली बौद्धधम्माची चळवळ ही अखिल मानव जातीच्या पुनरूत्थानाची आंतरराष्ट्रीय चळवळ असून राष्ट्रीय जाणीवेतून ती विकसित होत जाते. राष्ट्रीय जाणीवेतून विकसीत होणारे तिचे परराष्ट्रीय धोरण आंतरराष्ट्रीय घडामोडी बाबत जेवढे महत्वाचे आहे, तेवढेच ते राष्ट्रा-तंर्गत घडामोडीबाबत भारतीय राष्ट्राच्या विकासासाठी महत्वाचे आहे. हे लक्षात घेणे अत्यंत आवश्यक आहे."

ड्रॅगन प्रकाशन वितरण